## दिल्लीत खासदारांच्या अपार्टमेंटला आग

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १८ :
दिल्लीतील बीडी रोडवरील खासदारांसाठी बांधलेल्या कावेरी अपार्टमेंटमध्ये शनिवारी दुपारी आग लागली. अनेक खासदार आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांचे तिथे अपार्टमेंट आहेत. घटनेची माहिती मिळाल्यावरही, अग्निशमन दलाला घटनास्थळी पोहोचण्यास उशीर झाल्याचा आरोप रहिवाशांचा आहे. आगीचा फटका चौथ्या मजल्यापर्यंतच्या अपार्टमेंटना बसल्याचे वृत्त आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की दुपारी १:२२ वाजता आगीची माहिती मिळाली. त्यानंतर अग्निशमन दलाच्या सहा गाड्या घटनास्थळी पाठवण्यात आल्या आणि सध्या आग विझवण्याचे काम सुरू आहे.


नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १९८ * * नागपूर * रविवार, दिनांक १९ ऑक्टोबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त








## थोडक्यात..

### बिहारच्या सत्तेचा निर्णय घुसखोर करणार नाही

■ नवी दिल्ली : बिहार विधानसभा निवडणुकीबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, महाआघाडीने जागा किंवा नेता निश्चित केलेला नाही. बिहारमधील जनता राहुल गांधींना विसरली आहे. भाजपा निवडणूक आयोगाच्या एसआयआरच्या निर्णयाचे स्वागत करते. एसआयआर देशभरात लागू केला पाहिजे. एनडीएमध्ये कोणतेही मतभेद नाहीत.



घुसखोर देशात मतदान कसे करू शकतात? परदेशी नागरिक बिहारचे भवितव्य ठरवतील का? आम्ही अशा लोकांना निवडकपणे देशातून हाकलून लावू. एनडीए बिहारमध्ये सरकार स्थापन करेल, असेही शहा म्हणाले.

### जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा मिळायला हवा

■ श्रीगनर: जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी शुक्रवारी राज्याचा दर्जा पुनर्संचयित करण्याची मागणी केली. मोदी सरकारने कधीही भाजप सत्तेत आल्यासच राज्याचा दर्जा दिला जाईल असे म्हटले नव्हते, असे त्यांनी म्हटले. त्यांनी केंद्र सरकारला त्यांचे वचन पूर्ण करण्याचे आणि शक्य तितक्या लवकर राज्याचा दर्जा बहाल करण्याचे आवाहन केले. ओमर म्हणाले, ते राज्याच्या दर्जाबाबत भाजपशी तडजोड करणार नाहीत. ते म्हणाले की, जेव्हा कलम ३७० रद्द करण्यात आले तेव्हा संसदेने तीन टप्पे आखलेः पहिले सीमांकन, नंतर निवडणुका आणि शेवटी राज्यत्व. सीमांकन आणि निवडणुका पूर्ण झाल्या आहेत, परंतु अद्याप राज्यत्व मिळालेले नाही.



# मतदार यादीतील घोळ तपासा!

### निवडणूक आयुक्तांचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश : महाविकास आघाडी आणि मनसेच्या प्रयत्नांना यश

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :
महाराष्ट्रातील मतदार यादीत घोळ असल्याचा आरोप करण्यात आल्यापासून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. महाविकास आघाडी आणि मनसेच्या नेत्यांनी सलग दोन दिवस निवडणूक आयोगावर प्रश्नांची सरबत्ती केल्यानंतर अखेर मुख्य निवडणूक आयुक्त चोक्कलिंगम यांनी जिल्हाधिकाऱ्यांना मतदार यादीत घोळ तपासण्याचे आदेश दिले आहेत.

गेल्या अनेक महिन्यांपासून राज्यात मतदार यादीतील अनेक त्रुटी आणि घोळ समोर आले आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी याचा उल्लेख करत महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये मतदार यादीत घोळ असल्याचे ठळकपणे दाखवले. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी आणि मनसेचे नेते आयोगाशी भेट घेऊन पुरावे सादर करत होते. या पुराव्यांमध्ये एकाच घरात शेकडो नावे नोंदलेली असल्याचा उल्लेख होता.

नागपूरमध्ये एकाच घराच्या पत्त्यावर २०० मतदार असल्याचे गंभीर आरोप विरोधकांनी केले होते. यासह, जयश्री मेहता या महिलेसाठी दहिसर, चारकोपसह एकूण चार ठिकाणी मतदान नोंदले गेले होते, तर मोहन नंदा बिलवा या महिलेसाठी मतदार यादीत तीन ठिकाणी नाव असल्याचा दावा करण्यात आला होता. या सर्व पुराव्यांनंतर आयोगाचे अधिकारी काही काळ निरुत्तर झाले, पण अखेर जिल्हाधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले गेले आहेत.



मुख्य निवडणूक आयुक्तांनी स्पष्ट केले की, एकाच मतदारसंघात एकाच महिलेसाठी अनेक नावे असल्यास चौकशी करून दोषी अधिकारी असल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत आणि दिवाळीनंतर हा अहवाल मिळण्याची शक्यता आहे. अहवाल आल्यानंतर विरोधकांना त्याची प्रत उपलब्ध करून दिली जाईल.

**राज ठाकरे यांनी दिले होते पुरावे**

राज ठाकरेंकडून करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, मतदार यादीत त्रुटी सुधारल्या शिवाय निवडणुका घेऊ नयेत. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतरही अनेक मतदारांची नावे असून त्याचबरोबर फोटो नसणे, मुलांच्या वयापेक्षा वडिलांचे वय कमी असणे, या प्रकारच्या त्रुटी लक्षात आल्या आहेत.

यासह, खोट्या यादीतील नावे माध्यमांवर आल्यावर गायब होणे, नवीन नावे टाकली जाणे याची माहिती निवडणूक आयोगाला न मिळणे, हे देखील विरोधकांकडून गंभीर आरोप म्हणून मांडले गेले आहेत. महाविकास आघाडीच्या शरद पवार, उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड या नेत्यांनी निवडणूक आयोगाशी भेट घेतली आणि यादीतील त्रुटी स्पष्ट करून त्यावर कार्यवाही करण्याची मागणी केली. राज ठाकरे यांनीही या संदर्भात विशेष भूमिका बजावली आणि निवडणूक आयोगाने स्थानिक तसेच केंद्रीय यंत्रणांसह एकत्रित तपासणी करावी, अशी मागणी केली.

# घाटात उलटले वाहन आठ जण ठार!

### यात्रेहून परतताना काळाचा घाला

■ वृत्तसंस्था, नंदुरबार, दि. १८ :
धनत्रयोदशीनिमित्त जिल्ह्यातील अस्तंबा पर्वतावर भरणाऱ्या यात्रेहून परतणाऱ्या एका खासगी मालवाहू वाहनास नंदुरबार जिल्ह्यातील चांदशैली घाटात शनिवारी अपघात झाला. या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला असून हा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील सातपुडा रांगेत चार हजार फुट उंच पर्वतावर अस्तंबा ऋषी नावाने स्थान आहे. दरवर्षी धनत्रयोदशीपासून दोन दिवस हजारो भाविक अस्तंबाच्या यात्रेसाठी मार्गस्थ होतात. जवळपास ४३०० फुट उंचीवर वसलेल्या शूलपाणीच्या झाडीमधल्या डोंगराच्या माथ्यावर मध्य प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्रातील भाविक येतात.

शिखरावर एक शिळा आहे. त्याची भाविक पूजा करतात. दिवाळीच्या पर्वात यात्रेसाठी भाविकांच्या जत्थेच्या जत्थे रवाना होतात. तळोदा शहरातून कोठार-देवनदी-असली-नकट्यादेव- जुना अस्तंभा-भीमकुंड्या या मार्गाने चालत यात्रेला जातात. या ठिकाणी डोंगरावर येणारी रोषा ही वनस्पती तोडून बरोबर घेतात. आदिवासी बांधव तळोदा येथे एकत्र येऊन ढोल-ताश्यांच्या गजरात मिरवणूक काढतात.

शनिवारी पहाटे धनत्रयोदशीनिमित्त भाविकांना घेऊन एक खासगी मालवाहू वाहन निघाले. सकाळी नंदुरबार जिल्ह्यातील चांदशैली घाटात वाहन आले असता चालकाचे नियंत्रण सुटले आणि वाहन उलटले. या वाहनात सुमारे ४० भाविक होते. वाहनाखाली अनेक जण दबले गेले. या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला आहे. अनेकजण जखमी झाले आहेत.

गंभीर जखमींना नंदुरबार जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काही जखमी तळोदा उपजिल्हा रुग्णालयात दाखल आहेत. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरु केले. मयत आणि जखमींपैकी अनेक जण नंदुरबार जिल्ह्यातील भुराटी आणि शहादा तालुक्यातील वैजाली येथील रहिवासी आहेत. जखमींपैकी अनेकांची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. दरम्यान, या अपघातामुळे परिसरात शोककळा पसरली असून, पोलीस तपास करीत आहेत.

# बांगलादेशी घुसखोरी रॅकेटचा पदार्फाश

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :
महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये बांगलादेशी नागरिकांच्या बेकायदेशीर वास्तव्याचा मुद्दा चांगलाच गाजत असताना, मुंबई पोलिसांनी गोवंडी परिसरात मोठी कारवाई करत एक धक्कादायक प्रकरण उघडकीस आणले आहे.

बांगलादेशातून आलेली आणि ज्योती माँ या नावाने ओळखली जाणारी किन्नर गुरू बाबू खान हिला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे बांगलादेशी घुसखोरी रॅकेटचा पदार्फाश झाला आहे.

भाजप नेते व माजी खासदार किरीट सोमय्या यांनी राज्यातील विविध शहरांतील बेकायदेशीर बांगलादेशी नागरिकांविरोधात जोरदार भूमिका घेतली आहे. त्यांनी पोलिसांना थेट सूचना देऊन कारवाईची मागणी केली होती. दिवाळीच्या काळातच ही मोठी कारवाई झाल्यामुळे खळबळ उडाली आहे.

बाबू खान हिची मुंबई उपनगरांत बऱ्याच ठिकाणी संपत्ती असल्याचे तपासातून समोर आले असून तिच्या नावावर जवळपास २० घरे असल्याचे तपासात उघड झाले आहे. तसेच तिचे २०० पेक्षा अधिक भक्त असल्याची माहितीही समोर आली आहे. गोवंडीतील शिवाजीनगर भागात ती बांगलादेशातून आलेल्यांना राहण्याची जागा पुरवायची. स्थानिक नागरिकांनी याविषयीची माहिती गोवंडीतील शिवाजीनगर पोलिसांना दिली. पोलिसांना माहिती पडताळून बाबू खान हिला अटक केली. पोलिसांनी तपासणी केली असता, कागदपत्र बनावट असल्याचे निष्पन्न झाले.

बाबू खान उर्फ ज्योती माँ हे एक मोठे बेकायदेशीर रॅकेट चालवत होती. पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद सीमेवरून ती अवैधमार्गाने बांगलादेशी नागरिकांना देशात आणायची. त्यानंतर त्यांना कोलकात्यात काही दिवस थांबवून बनावट शाळेचे दाखले, जन्म दाखले बनवले जायचे. ही बनावट कागदपत्रे तयार झाल्यावर त्यांना मुंबईत आणले जायचे आणि गोवंडी भागात आश्रय दिला जायचा.

# मुंडेंवर करुणा शर्माचे गंभीर आरोप

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :
माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या मेहुणीसोबत म्हणजे माझ्या बहिणीसोबत गैरकृत्य केले. माझी आई या प्रकरणी पोलिसांत तक्रार करणार होती. पण तिच्यावरही मोठा दबाव टाकण्यात आला. यामुळे तिलाही आत्महत्या करावी लागली, असा आरोप धनंजय यांच्या पत्नी असल्याचा दावा करणाऱ्या करुणा शर्मा मुंडे यांनी केला आहे. त्यांच्या या आरोपामुळे धनंजय मुंडे यांचा पाय आणखीनच खोलात जाण्याची भीती निर्माण झाली आहे.



करुणा शर्मा यांनी शनिवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधला. त्यात त्यांनी वरील आरोप केला. त्या म्हणाल्या, धनंजय मुंडे यांनी माझ्या बहिणीसोबत गैरकृत्य केले. त्यानंतर माझ्या बहिणीने तिच्यासोबत घडलेला प्रसंग घरात सांगितला.

# ढाका विमानतळावर आग



**सर्व आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द**

**प्रवाशांची तारांबळ**

■ वृत्तसंस्था, ढाका, दि. १८ :
बांगलादेशची राजधानी ढाका येथील हजरत शाहजलाल आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कार्गो क्षेत्रात आज दुपारी भीषण आग लागली. आग इतक्या वेगाने पसरली की विमानतळ अधिकाऱ्यांना सर्व उड्डाणे तात्काळ थांबवावी लागली.

विमानतळाच्या गेट क्रमांक ८ जवळील कार्गो गावात दुपारी २:३० च्या सुमारास आग लागली, असे अग्निशमन दलाने सांगितले. आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झालेली नाही, परंतु कार्गोचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे. जाड काळ्या धुरामुळे आजूबाजूच्या परिसरातील हवा प्रदूषित झाली. तज्ञांचे म्हणणे आहे की, त्यात विषारी वायू असू शकतात, ज्यामुळे जवळपासच्या लोकांना श्वसनाचे त्रास होऊ शकतात. यंत्रणेने आजुबाजूचा परिसर रिकामा केला आहे.










# नाशिक विभागासाठी १४७४ कोटींची मदत जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १८ :

सप्टेंबरमध्ये राज्यातील विविध जिल्ह्यांत अतिवृष्टी व पूरामुळे शेती पिकांच्या झालेल्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी साडेतेहतीस लाखहून अधिक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना ३२५८ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यात नाशिक विभागातील सुमारे १५ लाख ८० हजार नुकसानग्रस्तांना साडेअकरा लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांच्या नुकसानीपोटी १४७४ कोटी रुपयांची मदत मिळणार आहे

राज्य शासनाने दिवाळीपूर्वी मदतीची रक्कम नुकसानग्रस्तांना देण्याचे आश्वासित केले होते. धनत्रयोदशीच्या दिवशी सकाळीच हे आदेश निर्गमित करण्यात आले. सप्टेंबरमधील शेती पिकांच्या नुकसानीचे जिल्हा प्रशासन व कृषी विभागाने युद्ध पातळीवर पंचनामे केले . अंतिम पंचनामे झाल्यानंतर विभागीय आयुक्तांमार्फत निकषानुसार निधी मागणीचे प्रस्ताव सादर झाले होते. राज्यात २७ लाख ५९ हजार क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. निश्चित केलेल्या दरानुसार राज्यातील ३३.६५ लाख शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने ३२५८ कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. चालू हंगामात यापूर्वी शेती पिकांच्या



नुकसानीसाठी वितरित केलेल्या मदतीचा या प्रस्तावांतर्गत मागणी करण्यात आलेल्या निधीचा समावेश नाही, याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले आहे. लाभार्थ्यांना मदत देताना द्विरुक्ती होणार नाही, याची तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयांनी काळजी घ्यावी, असेही सूचित करण्यात आले आहे.

सरकारच्या निर्णयानुसार नाशिक विभागातील सुमारे १५ लाख ७९ हजार २३९ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे. यामध्ये नाशिक जिल्ह्यातील (४०९४०४), धुळे (१६३५७), नंदुरबार (९३१), जळगाव (३२५३५९) आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील (८२७९१८) बाधित शेतकऱ्यांचा समावेश आहे. विभागात तब्बल ११ लाख ५० हजार ३०१ क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते. यात अहिल्यानगरला सर्वाधिक फटका बसला. या जिल्ह्यात सहा लाख हेक्टर क्षेत्रातील पिकांच्या नुकसानीपोटी ८३६ कोटी, नाशिकमध्ये २.८८ लाख हेक्टर (३१७ कोटी), जळगाव जिल्ह्यात २.४७ लाख हेक्टर (२९९ कोटी), धुळे जिल्ह्यात ११ हजार ५९४ हेक्टर (१० कोटी) आणि नंदुरबार जिल्ह्यात ४४५ हेक्टर (५३ लाख) अशी एकूण १४७४ कोटींची मदत वितरित केली जाणार आहे.

# शिवसेनेचे माजी नगरसेवक उमेश बोरगावकरांवर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, कल्याण, दि. १८ :

कल्याण शहरातून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक उमेश बोरगावकर यांच्या गाडीवर अज्ञात इसमांकडून भीषण हल्ला करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार कार्यालयासमोर सुरू असलेले भांडण सोडवून जखमी व्यक्तीला रुग्णालयात नेत असताना हा हल्ला करण्यात आला. दगडफेकीत बोरगावकर यांच्यासह ज्ञानेश्वर सपाट आणि ओंकार सपाट हे दोघे जखमी झाले आहेत.

हा हल्ला इतका तीव्र होता की, कारवर मोठे मोठे दगड फेकून मारण्यात आले. यामुळे कारच्या खिडक्यांच्या काचा आणि मागील बाजू पूर्णपणे चक्काचूर झाली आहे. कारमधील आसनांवर सर्व काचा विखुरल्या होत्या आणि मोठे दगडही गाडीच्या सीटवर पडलेले दिसून आले.



कार्यालयासमोर सुरू असलेले भांडण सोडवून जखमी तरुणाला रुग्णालयात नेत असताना हा हल्ला झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

# ट्रॅक्टर अंगावर पडून एका तरुणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, हिंगोली, दि. १८ :



एक जण गंभीर जखमी
कांडली फाटा शिवारातील घटना

हिंगोली जिल्ह्यातील आखाडा बाळापूर जवळील कांडलीफाटा शिवारात पायी जाणाऱ्या तरुणांच्या अंगावर ट्रॅक्टर उलटल्याने एक जण ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी ता. १८ दुपारी घडली आहे. जखमीला उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले आहे. या अपघातामुळे कांडली गावावर शोककळा पसरली आहे. याबाबत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कळमनुरी तालुक्यातील कांडली येथील विश्वनाथ पतंगे (१७) व त्याचा मित्र कुणाल पानपट्टे (१८) हे दोघे आज दुपारच्या सुमारास कांडलीफाटा शिवारातून पायी जात होते. यावेळी आखाडा बाळापूरकडून कांडलीकडे जाणाऱ्या ट्रॅक्टरचे अचानक टायर फुटले. या अपघातामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर बाजूने जाणाऱ्या विश्वनाथ व कुणाल यांच्यावर अंगावर कोसळले या अपघातात दोघेही ट्रॅक्टरखाली दबल्या गेले.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर आखाडा बाळापूर पोलिस ठाण्याचे निरीक्षक विष्णुकांत गुट्टे, जमादार पंढरी चव्हाण, प्रशांत शिंदे, शिवाजी पवार, अमोल अडकिणे, गावकरी राहुल उर्फ पिंटू पतंगे व इतर गावकऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिस व गावकऱ्यांनी दोघांनाही आखाडा बाळापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र विश्वनाथ यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहिर केले. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या कुणाल याच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले आहे.

दरम्यान, मयत विश्वनाथ हा एकुलता एक मुलगा होता. मयत विश्वनाथ याच्या पश्चात आई, वडिल असा परिवार आहे. या अपघाताच्या घटनेमुळे गावावर शोककळा पसरली आहे. याप्रकरणी सायंकाळी उशीरापर्यंत आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात नोंद झाली नाही.

# व्हॉईस ऑफ मीडियाचा अभिनव उपक्रम

## राज्यातील आठ हजार पत्रकार आणि अकरा हजार कुटुंबीयांचा विमा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :

राज्यातील पत्रकारांच्या हितासाठी काम करणाऱ्या व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरमने पुन्हा एकदा इतिहास रचला आहे. संस्थेने मागील तीन महिन्यांत राज्यभरातील तब्बल ८ हजार पत्रकार आणि त्यांच्या ११ हजार पत्रकार कुटुंबीयांचा आरोग्यविमा काढून पत्रकार सुरक्षेच्या दृष्टीने एक नवा आदर्श निर्माण केला आहे. यासोबत पत्रकार यांच्यासी १८ हजार जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.

व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरमच्या पंचसूत्रीमध्ये पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांचे आरोग्य हा महत्त्वपूर्ण विषय आहे. पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या नियमित आरोग्य तपासणीसह गंभीर आजार, मोठ्या शस्त्रक्रिया आणि आपत्कालीन परिस्थितीत मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या कामगिरीबाबत आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी सांगितले की, व्हॉईस ऑफ मीडियाचा सदस्य असणाऱ्या प्रत्येक पत्रकाराला आम्ही राज्यभरात मोफत आरोग्य सेवा देत आहोत. त्यांच्या परिवारातील प्रत्येक सदस्याला कोणत्याही मोठ्या दवाखान्यात आवश्यक ते उपचार मिळतील, याची आम्ही जबाबदारी घेतली आहे.

डॉ. शेटे पुढे म्हणाले की, मागील दोन वर्षांत आम्ही पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्य सेवेसाठी १० कोटी रुपयांहून अधिक रक्कम थेट रुग्णालयांच्या खात्यात जमा केली आहे. त्यातून पत्रकारांचे उपचार, औषधोपचार आणि आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्या गेल्या आहेत.

या उपक्रमात प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, महासचिव दिगंबर महाले, कार्याध्यक्ष विजय चोरडिया, मनीष खाटीक, उपाध्यक्ष अजितदादा कुंकूलोळ, सर्व विंगचे प्रमुख अमोल मतकर तसेच कार्यकारिणीतील सर्व पदाधिकारी आणि जिल्हा-तालुका स्तरावरील समन्वयकांनी विशेष पुढाकार घेतला. राज्यातील विविध ठिकाणी आरोग्य कॅम्प आयोजित करण्यात आले. अनेक पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांना याचा थेट लाभ मिळाल्याचे उदाहरण राज्यभर दिसून आली आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्य कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले की, व्हॉईस ऑफ मीडियाच्या शिफारशीवरून दररोज ५ ते ६ पत्रकारांच्या आरोग्य प्रकरणांचा आम्ही निपटारा करतो. पत्रकार ही सामाजिक संपत्ती आहे, त्यांचे आरोग्य आणि सुरक्षा हे आमचे प्राधान्य आहे.

या विमा उपक्रमात भारतीय पोस्ट विभागानेही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या संदर्भात पोस्ट विभागाचे वरिष्ठ अधिकारी संजीव भरद्वाज यांनी सांगितले की, एखाद्या संस्थेने इतक्या मोठ्या प्रमाणात आपल्या पदाधिकारी आणि सदस्यांचा विमा काढणे ही पहिलीच घटना आहे. आम्हाला अभिमान आहे की व्हॉईस ऑफ मीडियाने सामाजिक जबाबदारीचा आदर्श निर्माण केला आहे.

आरोग्य विंगचे प्रमुख भीमेश मुतुला यांनी माहिती दिली की, मोठ्या आजारांचे लवकर निदान करून त्यावर उपचार सुरू करण्याचे आमचे प्रयत्न आहेत. पुढील महिन्यात राज्यातील २३० तालुक्यांमध्ये आरोग्य कॅम्प आयोजित केले जातील. व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरमच्या या उपक्रमामुळे राज्यातील हजारो पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांना सुरक्षिततेचा आणि आरोग्यसेवेचा मजबूत आधार मिळाला आहे.

# ४७ अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी, शिर्डी, दि. १८ :

साईबाबा संस्थानच्या विद्युत विभागात मोठ्या प्रमाणात 77 लाख रुपये किंमतीचे विद्युत साहित्य चोरीला गेल्याप्रकरणी शिर्डी पोलिसांनी एक महत्त्वाची कारवाई केली आहे. या प्रकरणी संस्थानचे 47 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी 2022 साली संस्थानच्या विद्युत विभागात चोरटा व गैरव्यवहार झाल्याबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर शिर्डी पोलिसांनी तपास सुरू केला आणि या प्रकरणात चोरीची पुष्टी केली. पोलिसांच्या प्राथमिक तपासात तब्बल 77 लाख रुपये किंमतीच्या विद्युत साहित्याचा अपहार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. चोरी झालेल्या साहित्यामध्ये विविध इलेक्ट्रिकल उपकरणे आणि अत्याधुनिक यांत्रिक वस्तूंचा समावेश आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या 47 कर्मचाऱ्यांमध्ये विभाग प्रमुख, अभियंते, सहाय्यक कर्मचारी आणि इतर संबंधित अधिकारी यांचा समावेश आहे.

संजय काळे यांच्या तक्रारीनंतर या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता पोलिसांनी चौकशी सुरू केली होती. या चौकशीत काही महत्त्वाच्या कागदपत्रांची गहाण आणि आंतरसंबंधी लीड्स समोर आली, ज्यामुळे विद्युत विभागातील चोरीचा मोठा नेटवर्क उघडकीस आला. प्राथमिक तपासानुसार, संबंधित कर्मचाऱ्यांनी आपापसांत संगठितपणे चोरी केली असून, काही साहित्य विकले देखील आहे. साईबाबा संस्थान प्रशासनात या घटनेने मोठी खळबळ माजली आहे. संस्थानच्या प्रशासनाने तात्काळ या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विरोधात कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

# जेल फार्मा कंपनीत भीषण आग

■ महासागर प्रतिनिधी, कोपरखैरणे, दि. १८ :

नवी मुंबई एमआयडीसीत आगाच्या दुर्घटनांचे सत्र सुरूच आहे. गुरुवारी रात्री रबाळे एमआयडीसीतील जेल फार्मा ही कंपनी आगीत भस्मसात झाली. रात्री दोन वाजता लागलेल्या आगीवर सोळा तासांच्या प्रयत्नानंतर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमनदलास यश मिळाले आहे. आगीत कोणतीही जीवीतहानी झाली नसली तरी कंपनीचे मोठे नुकसान झाले आहे.

# सांगलीत शरद पवार गटाकडून काळी दिवाळी



■ महासागर प्रतिनिधी सांगली, दि. १८ :

अतिवृष्टी व पूरग्रस्तांसाठी राज्य सरकारने जाहीर केलेली मदत फसवी असल्याच्या आरोप करत राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) पक्षाच्यावतीने काळी दिवाळी साजरी करण्यात आली. पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मौन पाळत सरकारचा निषेध नोंदवला. राज्यात अतिवृष्टीमुळे चौफेर नुकसान झाले आहे, कधी नव्हे असे नैसर्गिक संकट आल्यामुळे राज्यातील बळीराजा पूर्णत उद्धवस्त झाला आहे. झोपलेल्या सरकारला जागे करण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली नाशिक येथे भव्य मोर्चा काढून राज्यात सरसकट कर्जमाफी व ओला दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करण्याची मागणी सरकारकडे व्यक्त केली होती. मात्र, महायुती सरकारने घाईघाईत ३६ हजार ५०० कोटींची फसवी मदत जाहीर केली आहे.

सरकारने बळीराजाच्या डोळ्यात धुळफेक करून ही फसवी मदत दिलेली आहे. त्याचा पक्षाच्यावतीने निषेध करण्यात आला. शासनाने ही फसवी मदत करण्यापेक्षा तातडीने सरसकट कर्जमाफी करून, ओला दुष्काळ जाहीर करावा, हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी, अशी मागणीही करण्यात आली.

# पठाणवाडीत भीषण आग

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :

मालाड येथील पिंपरीपाडा परिसरातील पठाणवाडीत शुक्रवारी सायंकाळी लागलेल्या आगीचे शनिवारीही तांडव सुरू होता. शनिवारी सकाळपासून अग्निशमन दलाचे मदतकार्य घटनास्थळी मदतकार्य सुरू होते. या भीषण आगीत मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जावान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मदतकार्य हाती घेतले. आगीची तीव्रता सातत्याने वाढत होती. त्यामुळे निर्माण होणाऱ्या धुरामुळे अग्निशमन दलाच्या जवानांना आग विझवताना अडचणींचा सामना करावा लागला. आगीची तीव्रता वाढत असल्याचे लक्षात येताच शनिवारी दुपारी १.०३ च्या सुमारास आगीला क्रमांक २ ची वर्दी देण्यात आली. या आगीत स्टीलचे रॅक, लाकडी सामान, स्टीलचे कपाट, चित्रपटाच्या चित्रिकरणासाठी वापरलेले जाणारे विविध सामान, दुग्धव्यवसायाशी संबंधित विविध सामान, कार्यालयीन कागदपत्रे, वातानुकूलित यंत्रणा, पंखे, संगणक आदी विविध सामान जळून खाक झाले.

# थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र अभियानासाठी अभिनेता जॅकी श्रॉफ होणार सदिच्छादूत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

थॅलेसिमिया आजाराबाबत नागरिकांमध्ये जागरुकता करण्यासाठी राज्य सरकारने थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र अभियान हाती घेतले आहे. या अभियानासाठी सदिच्छादूत म्हणून हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ यांची नियुक्ती करण्याचा सरकार विचार करीत आहे. यासंदर्भात जॅकी श्रॉफ यांनी नुकतीच आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेतली.

थॅलेसिमिया या रक्ताच्या अनुवांशिक आजाराबाबत समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी सरकार विविध उपक्रम राबवीत आहे. त्यानुसार थॅलेसिमियामुक्त महाराष्ट्र अभियान सरकारकडून हाती घेण्यात आले आहे. थॅलेसिमिया या गंभीर आजारावर मात करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी, सेवाभावी संस्था, संघटना, प्रतिष्ठित नागरिक आणि वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ यांनी एकत्र येऊन कार्य करणे अत्यावश्यक आहे. या अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त व्हावे आणि या आजाराविषयी सर्वसामान्यांमध्ये अधिक व्यापक जनजागृती करावी, यासाठी सरकारकडून प्रयत्न करण्यात येत असल्याचे प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

जॅकी श्रॉफ गेल्या काही वर्षांपासून विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून थॅलेसिमिया



विषयावर सातत्याने कार्यरत आहेत. या आजाराविषयी समाजात जनजागृती करण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत. तसेच जॅकी श्रॉफ यांना यासंदर्भात शासनाला सहकार्य करण्याची इच्छा आहे.

त्यामुळे त्यांनी शुक्रवारी काश आबिटकर यांची मंत्रालयात सदिच्छा भेट घेतली. राज्य शासनाच्या थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र अभियानासाठी जॅकी श्रॉफ यांची सदिच्छादूत म्हणून नियुक्ती करण्याबाबत या भेटीत अनौपचारिक चर्चा झाली. यावेळी राज्य रक्त संक्रमण परिषदेचे डॉ. पुरुषोत्तम पुरी, उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, गजेन्द्रराज पुरोहित आणि इतर वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# पुढील तीन दिवस पावसाचा अंदाज

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :

राज्यात सध्या उन्हाचा कडाका, उकाडा आणि ढगाळ वातावरणही अनुभवयाला मिळत आहे. दरम्यान, हवामान विभागाने पुढील दोन दिवस कोकणासह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पवसाचा अंदाज व्यक्त केला आहे. एकीकडे पावसाची शक्यता असताना सांताक्रूझ येथे शुक्रवारी ३७ अंश सेल्सिअस कमाल तापामानाची नोंद झाली. संपूर्ण राज्यात शुक्रवारी सांताक्रूझ येथे सर्वाधिक तापमान नोंदले गेले. मोसमी पावसाने शुक्रवारी संपूर्ण देशातून माघार घेतली. याचबरोबर दक्षिण भारतात ईशान्य मोसमी वारे सक्रिय झाल्याचे हवामान विभागाने जाहीर केले. राज्यातून मोसमी पावसाने माघार घेतल्यानंतर तापमानात वाढ झाली आहे. अनेक भागात ३४ ते ३६ अंशादरम्यान तापमानाची नोंद झाली आहे. त्यामुळे असह्य उकाडा सहन करावा लागत आहे. सांताक्रूझ येथे शुक्रवारी सर्वाधिक तापमानाची नोंद झाली. तेथे ३७ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले. ते सरासरीपेक्षा अधिक होते. ऑक्टोबरमध्ये कमाल तापमान साधारण ३३ अंश सेल्सिअस इतके अपेक्षित असते. यापूर्वी २०२३ मध्ये ३७.४ अंश सेल्सिअस, २०१८ मध्ये ३८ अंश सेल्सिअस, २०१५ मध्ये ३८.६ अंश सेल्सिअस आणि २०१४ मध्ये ३७.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. दरम्यान, पुढील दोन दिवस तापमानातील वाढ कायम राहण्याचा अंदाज आहे.

समुद्रावरून येणारे वारे उशिरा वाहत असल्यामुळे मुंबईच्या तापमानात वाढ झाल्याचे हवामान विभागाने सांगितले. एकीकडे तापमानाचा पारा चढा असताना राज्यातील काही भागात पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पुढील दोन दिवस पावसाची शक्यता आहे. या कालावधीत काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या सरी बरसतील. अरबी समुद्रात लक्षद्वीप बेटाजवळ चक्राकार वारे वाहत आहेत. त्यांची दिशा दक्षिणेकडे झुकलेली आहे. त्यामुळे शनिवारी लक्षद्वीप परिसरात केरळ-कर्नाटक किनाऱ्यालगत कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची शक्यता आहे.

# धोरण जागरूकता वृद्धीसाठी टाटा संस्थेच्या विद्यार्थ्यांचा पुढाकार

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :

टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या एमए पब्लिक पॉलिसी आणि एलएलएम इन सोशल पॉलिसीच्या विद्यार्थ्यांनी धाराशीव-तुळजापूर प्रदेशात डॉ. देवकुमार जेकब यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण समुदायांशी संवाद साधला, कल्याणकारी योजना आणि मूलभूत सुविधांमध्ये प्रवेश सुधारण्यात सार्वजनिक धोरणाची महत्त्वाची भूमिका अधोरेखित केली. परस्परसंवादी सत्रे, गाव बैठका आणि सहभागी सर्वेक्षणांद्वारे, विद्यार्थ्यांनी ग्रामीण विकासाचे निकाल कसे वाढवू शकतात हे दाखवून दिले.

गोंधळवाडी येथे आयोजित जन सुनवाई (सार्वजनिक सुनावणी) हा या सरावाचा एक महत्त्वाचा टप्पा ठरला. या सुनावणीमुळे नागरिकांना त्यांचे सार्वजनिक सेवा हक्क थेट वापरण्यास आणि प्रशासनाला जबाबदार धरण्यास सक्षम केले. गावकऱ्यांनी मद्यपान आणि अनियमित वीजपुरवठा यासारखे गंभीर सामाजिक प्रश्न मांडले. यामुळे



विद्यार्थ्यांना धोरण बदलण्यासाठी लोकसहभाग आणि पारदर्शक प्रशासनाचे महत्त्व स्पष्ट झाले. जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीमुळे जमिनीवरील समस्या प्रशासनाच्या सर्वोच्च स्तरावर थेट मांडण्याची संधी मिळली. पिकांचे नुकसान भरपाई आणि आरोग्यसेवेचा अभाव यासारख्या मुद्द्यांवर प्रकाश टाकण्यात आला. हा अभ्यास दौरा सार्वजनिक धोरण आणि कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी एक अमूल्य अनुभव ठरला. स्थानिक पंचायत आणि जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांसोबत संवादात्मक सत्रे देखील आयोजित करण्यात आली होती.

या सत्रामुळे विद्यार्थ्यांना प्रशासन संरचना, सहभागी नियोजन आणि तळागाळातील सामाजिक कल्याणकारी कार्यक्रम राबविण्यात येणाऱ्या आव्हानांना समजून घेता आले. गावातील स्थानिक समुदायातील लोकांनी आमचे उत्साहाने स्वागत केले आणि सरकारी अधिकाऱ्यांनी पूर्ण सहकार्य केले, असे टीआयएसएस सार्वजनिक धोरणाच्या विद्यार्थिनी सेजल, जानकी, अंशल तेलंग यांनी मनोगतातून सांगितले.

# बेस्ट कर्मचाऱ्यांच्या खात्यात ३१ हजारांचा दिवाळी बोनस जमा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :

गेल्या काही दिवसांपासून बेस्ट कर्मचाऱ्यांमध्ये दिवाळी बोनस मिळणार की नाही, याबाबत संभ्रम होता. मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना जशी दिवाळी भेट मिळते, तशीच भेट बेस्ट कर्मचाऱ्यांनाही द्यावी, अशी मागणी बेस्ट वर्कर्स युनियनने केली होती. अखेर ही मागणी पूर्ण झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचं वातावरण आहे. अनेक कर्मचाऱ्यांनी पहाटेच मोबाईल बँकिंग ॲपवर क्रेडिट अलर्ट पाहून आनंद व्यक्त केला.

तत्पूर्वी, बेस्टच्या नवनियुक्त महाव्यवस्थापक डॉ. सोनिया सेठी यांनी बुधवारी बेस्ट वर्कर्स युनियनच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली होती. या बैठकीत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या आणि सानुग्रह अनुदानाबाबत सविस्तर चर्चा झाली. डॉ. सेठी यांनी कर्मचाऱ्यांची भूमिका ऐकून घेत सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यानंतर गुरुवारी संध्याकाळी 31 हजार रुपयांच्या बोनसची अधिकृत घोषणा करण्यात आली. घोषणेनंतर



काही तासांतच कर्मचाऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होऊ लागल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेबद्दलही समाधान व्यक्त होत आहे. बेस्ट प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांना दिलेल्या या बोनसची तुलना महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना मिळालेल्या दिवाळी भेटीशी करण्यात येत आहे. मागील काही वर्षांपासून बेस्ट कर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर आणि प्रलंबित मागण्यांवर अनेकदा तणाव निर्माण झाला होता. मात्र, यंदा नव्या महाव्यवस्थापकांच्या नियुक्तीनंतर कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. हा बोनस फक्त आर्थिक मदत नाही, तर आमच्या मेहनतीची दखल घेणारा सणाचा उपहार आहे, अशी भावना बेस्ट चालक, वाहक आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांनाही यंदा दिवाळीपूर्वीच आनंदाची बातमी मिळाली आहे. राज्य सरकारने एसटी कर्मचाऱ्यांना सहा हजार रुपयांच्या सानुग्रह अनुदानासोबत 12 हजार रुपयांची उचल देण्याचा निर्णय घेतला आहे. दिवाळीच्या तोंडावर आंदोलनाची चेतावणी देणाऱ्या एसटी संघटनांशी चर्चेनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः हस्तक्षेप करून तोडगा काढला होता. त्यामुळे बेस्ट आणि एसटी दोन्ही संस्थांतील कर्मचाऱ्यांसाठी यंदाची दिवाळी सुखद ठरली आहे.

# मुदतीच्या आत प्रभाग निहाय यादी तयार करा: आयुक्त डॉ. चौधरी

## मतदार यादी तयार करण्याच्या प्रशिक्षणात मनपा आयुक्तांनी केले मार्गदर्शन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या मुदतीच्या आत प्रभाग निहाय विभाजनासाठीच्या यादी तयार करण्यात याव्यात. असे निर्देश नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी शनिवारी दिले.

महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुक २०२५ च्या मतदार यादीच्या प्रभाग निहाय विभाजना बद्दल मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्थायी समिती सभागृहात शनिवारी (ता.१८) प्रशिक्षण पार पडले. यावेळी आयुक्तांनी आयुक्त उपस्थित अधिकारी-कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त विजया बनकर, उपायुक्त मिलींद मेश्राम, अशोक गराटे, गणेश राठोड, सहायक आयुक्त श्याम कापसे, राजकुमार मेश्राम, विजय थूल, नरेंद्र बावनकर, धनंजय जाधव, विकास रायबोले, हरिष राऊत, प्रमोद वानखेडे, नोडल अधिकारी सुनिल उईके यांच्यासह



मनपाचे इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

नागपूर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादीचा कार्यक्रम २०२५ जाहीर केला आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, अधिसूचित केलेल्या तारखेस (१ जुलै २०२५) अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरून महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार केलेली प्रारुप मतदार यादी येत्या ६ नोव्हेंबरला प्रसिद्ध केली जाईल व यावर हरकती, सूचना मागविण्यात येईल. येत्या ४ डिसेंबर २०२५ रोजी मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर येत्या १० डिसेंबर २०२५ ला मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

त्याअनुषंगाने मतदार यादीचे प्रभाग निहाय विभाजनाबद्दल मनपा अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रशिक्षित करण्यात आले. यावेळी मनपा आयुक्त निवडणुकीशी संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या मुदतीच्या आत लवकरात लवकर प्रभाग निहाय विभाजनासाठीच्या यादी तयार करण्यात याव्यात, यादी तयार करताना अधिकारी समन्वयाने कार्य करावे, आवश्यक नियोजन करून यादी तयार करण्यासाठी कामे करावीत. त्याकरिता सातत्याने आढावा घ्यावा. तसेच कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांकडून शंकाचे निराकरण करून घ्यावे. एका झोनमधील मतदारांचे नाव दुसऱ्या झोन मध्ये जात असेल तर इतर झोनमधील निवडणुकीशी संबंधित अधिकारी-कर्मचारी यांच्याशी समन्वय ठेवावा. आवश्यकता पडल्यास केंद्रीय चमूची मदत घ्यावी. पूर्ण जबाबदारीने आणि गंभीरतेने मतदार यादी तयार करण्यासाठी कामे करावीत. निवडणुकीचा अनुभव असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्यांना योग्य मार्गदर्शन करावे, अशा सूचना त्यांनी केल्या. याचबरोबर कामचुकारपणा करणाऱ्या अधिकारी-कर्मचारी यांच्यावर सक्त कारवाई केली जाईल असा ईशारा त्यांनी प्रशिक्षणादरम्यान दिला. यावेळी नोडल अधिकारी यांनी संगणकीय सादरीकरणाच्या माध्यमातून प्रशिक्षणाची रूपरेषा मांडली. अतिरिक्त आयुक्त श्रीमती विजया बनकर यांनी सुद्धा अधिकारी-कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.

# ठकबाज बंटी-बबलीला ७ वर्षे सश्रम कारावास

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

जिल्हा व सत्र न्यायाधीश एन. एच. जाधव यांच्या न्यायालयाने प्रतापनगर ठाण्यात नोंद ४८.८५ लाख रुपयांच्या फसवणूक प्रकरणात आरोपी बंटी-बबलीला दोषी ठरवून ७ वर्षे सश्रम कारावास आणि प्रत्येकी ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. अनिरुद्ध आनंदकुमार होसिंग (३२) रा. वाराणसी आणि मीरा प्रकाश फडणीस (५७) रा. अमरावती अशी दोषींची नावे आहेत. आरोपींनी ऑक्टोबर २०२१ ते ऑक्टोबर २०२२ दरम्यान फियार्दी सुनील वसंत कुहीकर (५३) व त्यांच्या मित्रांना केंद्रीय पर्यटन मंत्रालयात डायरेक्टर जनरल असल्याची बतावणी करून जाळ्यात अडकवले होते. प्रतापनगर हद्दितील हॉटेल रेडिसन ब्ल्यूमध्ये कुहीकर व त्यांच्या मित्रांची भेट घेऊन मीराच्या मदतीने सिनेसृष्टीतील काही प्रसिद्ध कलाकारांची नावे असलेल्या बनावट पत्रिका दाखवून पर्यटन विभागात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळण्याचे आमिष दाखविले होते. या आमिषाला बळी पडून सुनील व त्यांच्या मित्रांनी ऑक्टोबर २०२१ ते ऑक्टोबर २०२२ दरम्यान आरोपीला ४८ लाख ८५ हजार रुपये दिले. मात्र ना त्यांना परतावा मिळाला आणि ना मुळ रक्कम परत मिळाली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर दोन्ही आरोपींविरुद्ध प्रतापनगर ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. प्रकरण आर्थिक गुन्हे शाखा (ईओडब्ल्यू)कडे देण्यात आले. ईओडब्ल्यूचे तत्कालीन सपोनि रिझवान शेख यांनी तपास पूर्ण करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.

# वैकुंठ चतुर्दशी निमित्त रामटेकमध्ये ४ नोव्हेंबरला भव्य शोभायात्रा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १८ :

दि.४ नोव्हेंबर रोजी वैकुंठ चतुर्दशी निमित्त रामटेक शहरात पारंपरिक व भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या शोभायात्रेचे विशेष आकर्षण महाभारतातील युधिष्ठिराची भूमिका साकारणारे गजेंद्र चव्हाण असणार आहेत.

अगस्ती आश्रमचे ब्रह्मलीन संत व भारतीय जनसेवा मंडळचे संस्थापक अध्यक्ष गोपालदास बाबा यांच्या प्रेरणेने ४३ वर्षांपूर्वी ही शोभायात्रा सुरू झाली होती. यावर्षी या शोभायात्रेचे ४४ वे वर्ष साजरे होत आहे. आयोजनाच्या पार्श्वभूमीवर रामलेश्वर मंदिरात महत्त्वपूर्ण सभा घेण्यात आली.

या बैठकीला भारतीय जनसेवा मंडळाचे अध्यक्ष चंद्रपाल चौकसे, भारतीय जनसेवा मंडळाचे सचिव तथा



गजेंद्र चव्हाण यांची असणार उपस्थिती

माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी, उपाध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, सहसचिव सुभाष बघेले, धनराज काठोके, अशोक पटेल, शेखर बघेले, नत्थू घरजाळे, विनायक डांगरे, ऋषिकेश किंमतकर यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

शोभायात्रा यशस्वी करण्यासाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या. यात शोभायात्रा समिती अध्यक्ष त्रिलोक मेहर, कार्यकारी अध्यक्ष गोपी कोल्हेपरा, कोषाध्यक्ष ऋषिकेश किमतकर, सचिव अजय खेडगरकर, सहसचिव मोनू रघुवंशी, झाकी संचालन समिती अध्यक्ष रीतेश शर्मा,निधी संकलन समिती अध्यक्ष निर्भय घाटोळे, ध्वनिक्षेपण समीती संजय मुलमुले,पूजा समिती अध्यक्ष हुकुमचंद बडवाईक,प्रचार प्रसार समिती नत्थू घरजाळे व पत्रकार संघ,मंच संचालन व व्यवस्था सुभाष बघेले,भोजन व्यवस्था शेखर बघेले, सुशोभित द्वार निरीक्षण समिती धनराज काठोके व राजाराम देशमुख, झाकी निरीक्षण समिती अ‍ॅड. संजय खंडेलवाल,अनिल भोरसले व दयानंद रेवतकर सहित आदि समित्या गठित करण्यात आल्या.

# १२१९ वाहन चालकांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण १२१९ वाहन चालकांवर कारवाई करून २,६८,१०० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ३ व एनडीपीएस अन्वये १ अशा ४ प्रकरणात १० आरोपींवर कारवाई करून ३,६४,२९५ रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ३ प्रकरणात १५ आरोपींवर कारवाई करून १३,२९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

## हिंदू देवतांच्या छायाचित्रांवरील फटाक्यांवर बंदीची मागणी

# विश्व हिंदू परिषद व बजरंग दलतर्फे निवेदन सादर

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १८ :

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर विश्व हिंदू परिषद व बजरंग दल, हिंगणा प्रखंड, वाडी नगर यांच्या वतीने वाडी पोलिस स्टेशन येथे निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात नमूद करण्यात आले की, नागपूर महानगरातील काही ठिकाणी हिंदू देवीझदेवतांच्या छायाचित्रांसह फटाके विक्रीसाठी ठेवण्यात येत आहेत, जे धार्मिक भावनांना ठेस पोहोचवणारे आहे. अशा प्रकारच्या फटाक्यांची विक्री हिंगणा व वाडी परिसरात होऊ नये, यासाठी पोलिस प्रशासनाने चौकशी करून योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. निवेदनात हेही नमूद करण्यात आले की, नागपूरमधील काही भागात अशा फटाक्यांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले असून, त्या ठिकाणी विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी कार्यवाही केली आहे. त्यामुळे भारतीय न्याय संहिता कलम 299,



196 आणि 353 अंतर्गत विक्रेत्यांविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. हे निवेदन वाडी पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेश तटकरे यांना देण्यात आले असून, त्यांनी या प्रकरणाची गांभीर्याने नोंद घेऊन चौकशीचे आश्वासन दिले आहे.

या प्रसंगी वि.हि.प. उमरेड जिल्हा उपाध्यक्ष रवी अजित, बजरंग दल गौरक्षा जिल्हा प्रमुख अजय पाटणे, वि.हि.प. हिंगणा प्रखंड मंत्री पवन बर्वे, बजरंग दल हिंगणा प्रखंड संयोजक शिवम राजे, गौरक्षक प्रमुख गौरव उगले, गौरक्षक सह-प्रमुख सागर वर्मा, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान विभाग प्रमुख विशाल जोध, धनराज लांडगे, मयंक धोटे, गुलशन शेंडे, विकास सरोज, शुभम गाढवकर तसेच वाडी नगर येथील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या दोघांना अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांच्या मार्गदर्शनात शहर पोलिसांकडून ऑपरेशन थंडर अंतर्गत अंमली पदार्थांची तस्करी व विक्री करणाऱ्यांची कंबर तोडली जात आहे. या मोहिमेंतर्गत गुरूवारी रात्रीही गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या दोघांना अटक केली. झडतीमध्ये त्यांच्याजवळ ५७ ग्रॅम मेफेड्रॉन ड्रग्ज (एमडी) मिळाले. पोलिसांनी दोन्ही आरोपींकडून एमडीसह एकूण ९ लाख रुपयांचा माल जप्त केला. राजू उर्फ रविराज रघुविर बघेल (२८) रा. शिवणकरनगर झोपडपट्टी आणि शुभम शेखर बागडे (२६) दोन्ही रा. जुना सक्करदरा अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. तपासात, दोन्ही आरोपींवर यापूर्वीही गुन्हे नोंद झाले आहेत आणि ते बऱ्याच वर्षांपासून अंमली पदार्थाच्या विक्रीत सक्रीय असल्याची बाब उघडकीस आली आहे. रात्री २.३० वाजताच्या सुमारास गुन्हे शाखेचे अंमली पदार्थ विरोधी पथक नंदनवन पोलिस ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान शिवणकरनगर झोपडपट्टीत गल्ली क्र. ३ मधील एका पानठेल्याजवळ दोन व्यक्ती कारमधून अंमली पदार्थाची विक्री करीत असल्याची माहिती पथकाला मिळाला. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी परिसरात सापळा रचून तेथे धाड टाकली असता वरील आरोपी कार आणि दुचाकीजवळ संशयास्पदरित्या आढळले. दोघांनाही ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्यांच्याजवळ ५७ ग्रॅम एमडी पावडर मिळाले. पोलिसांनी आरोपींकडून एमडी, कार, दुचाकी आणि मोबाईल असा एकूण ९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दोघांनाही अटक करून एमडीबाबत सखोल विचारपूस केली असता त्यांनी कामठी परिसरात राहणाऱ्या वसीम शेखकडून आणल्याची माहिती दिली. पोलिसांनी या प्रकरणात वसीम यालाही आरोपी करून त्याचा शोध सुरू केला आहे. दोन्ही आरोपींना पुढील कार्यवाहीसाठी मालासह नंदनवन पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले. ही कारवाई पोनि गजानन गुल्हाने व त्यांच्या पथकाने केली.

# आरोग्यरत्न जीरो माईल आयकॉन अवॉर्डने डॉ. उदय बोधनकर सन्मानित

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

जीरो माईल राष्ट्रीय हिंदी साप्ताहिक वृत्तपत्राच्या २० व्या वर्षात पदार्पणाच्या निमित्ताने आयोजित जीरो माईल आयकॉन अवॉर्ड-2025 सोहळ्यात नागपूरचे प्रसिद्ध बालरोग तज्ञ व कॉमहेंडचे कार्यकारी संचालक डॉ. उदय बोधनकर यांना आरोग्य रत्न सन्मान प्रदान करण्यात आला.

हा भव्य कार्यक्रम नुकताच हॉटेल तुली इंटरनॅशनल (रॉयल कोर्ट), सदर, नागपूर येथे पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष रवींद्र बोराटकर (अध्यक्ष, अ‍ॅग्रोव्हिजन फाऊंडेशन) होते. या प्रसंगी व्हिजन इंडिया चे इंडिया हेड स्वप्नील राणी नंदकुमार विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. मुख्य अतिथी म्हणून महाराष्ट्र सरकारचे माजी मंत्री रमेशचंद्र बंग तसेच घनश्यामदास कुकरेजा (साधना सहकारी बँक), डॉ. धनश्री हरदास (अध्यक्ष, महिला उद्योजकता समिती, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स), संजय अग्रवाल (संयुक्त आयकर आयुक्त, नागपूर), डॉ. विंकी रुघवानी (प्रशासक, महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषद), किशोर कन्हेरे (उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी) व सीमा प्रदीप कोठारी (संचालिका, करण कोठारी ज्वेलर्स) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहम्मद सलीम यांनी केले, तर आभार प्रदर्शन नेचरोपथी



आणि योग थेरपिस्ट डॉ. प्रवीण डबली यांनी केले. सोहळ्यात डॉ. उदय बोधनकर यांना आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रात चार दशकांहून अधिक काळ केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आरोग्य रत्न जीरो माईल आयकॉन अवॉर्ड 2025 प्रदान करण्यात आला. या वेळी त्यांचे गुरु व ज्येष्ठ डॉक्टर डॉ. रावत विशेष उपस्थित होते आणि त्यांनी डॉ. बोधनकर यांना आशीर्वाद दिले. या सन्मानाबद्दल डॉ. प्रवीण डबली, नियोग थेरपिस्ट विजय गुप्ते, मोरू चाहंदे, श्याम शेंद्रे तसेच शहरातील अनेक वैद्यकीय तज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि मित्रपरिवाराने डॉ. बोधनकर यांचे अभिनंदन केले.

डॉ. उदय बोधनकर हे एमबीबीएस, एमडी (पेडियाट्रिक्स) सहित अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पदव्या व सन्मानांनी गौरवले गेले आहेत. ते कॉमनवेल्थ असोसिएशन फॉर हेल्थ अँड डिसएबिलिटी चे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर आहेत आणि बाल आरोग्य व नवजात शिशूंच्या आरोग्य क्षेत्रात WHO, UNICEF व भारत सरकार यांच्या सहकार्याने अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांशी जोडले गेले आहेत. 2019 साली यूकेच्या RCPCH संस्थेकडून त्यांना FRCPCH हा प्रतिष्ठेचा सन्मान मिळाला. नागपूर येथील बोधनकर चिल्ड्रन हॉस्पिटलच्या माध्यमातून त्यांनी हजारो बालकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा पुरवली आहे. हा सन्मान डॉ. बोधनकर यांच्या जीवनकार्याची आणि समाजाप्रती त्यांच्या समर्पणाची दखल आहे.

## ऑटोतून प्रवासादरम्यान रोकड लंपास

**नागपूर :** ऑटोतून प्रवासादरम्यान अज्ञात आरोपीने गुजरात येथील एका व्यावसायिकाच्या बॅगमधील अडीच लाखांची रोकड लंपास केली. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी भरतभाई शांतीलाल रच्छ (६०) रा. कयानी प्लॉट, मोरबी, गुजरातच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

भरतभाई यांचा घड्याळींचा होलसेल व्यवसाय आहे. नागपुरातही ते मालाचा पुरवठा करतात. काही दुकानदारांकडे त्यांचे मालाचे पैसे थकलेले होते. त्या पैशांची वसुली करण्यासाठी भरतभाई नागपुरात आले होते. त्यांनी दिवसभरात मालाचे २.५० लाख रुपये गोळा केले आणि सायंकाळी गावी परत जाण्यासाठी निघाले. टांगा स्टॅण्ड येथून ते ट्रॅव्हल्स बसने जाणार होते. त्यामुळे शहीद चौकातून टांगा स्टॅण्डपर्यंत जाण्यासाठी ते एका ऑटोत बसले. ऑटोमध्ये आधीपासूनच एक संशयित व्यक्ती बसलेला होता. प्रवासादरम्यान आरोपीने भरतभाई यांची नजर चुकवून त्यांच्या बॅगमध्ये ठेवलेली अडीच लाखांची रोकड लंपास केली.

# गंगा-जमुनातील ११ खोल्या सील

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

लकडगंज पोलिसांनी ऑपरेशन शक्ती अंतर्गत अनैतिक व्यापाराला आळा घालण्यासाठी गंगा-जमुना परिसरात कुंटणखाना म्हणून वापर होत असलेल्या ११ खोल्या एक वर्षाकरिता सील केल्या आहेत. ही कारवाई पोलिस उपायुक्त महक स्वामी यांच्या मार्गदर्शनात लकडगंज ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक साईनाथ रामोड आणि त्यांच्या पथकाने शुक्रवारी केली. या कारवाईने परिसरात खळबळ उडाली होती. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लकडगंज पोलिस ठाण्यात यापूर्वी अनैतिक मानव व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ अंतर्गत कलम ३, ४, ५ आणि ७ नुसार गुन्हा (क्र. ३९४/२०२४) नोंदविण्यात आला होता. तपासादरम्यान गंगा-जमुना परिसरातील वॉर्ड क्र. ३७ मधील नंदा महादेव पाटील, विजय महादेव पाटील, विलास महादेव पाटील आणि विनोद महादेव पाटील (सर्व रा. गंगा-जमुना) यांच्या नावावर असलेल्या इमारतीच्या ११ खोल्यांचा वापर वेश्याव्यवसायासाठी केला जात असल्याचे उघड झाले. या इमारतीचा गैरवापर होत असल्याची खात्री पटल्याने, अनैतिक मानव व्यापार प्रतिबंधक कायदा कलम १८(१)(अ)(ब) नुसार पोलिस आयुक्त नागपूर शहर यांच्या आदेशावरून या इमारतीच्या तळमजल्यावरील एकूण 11 खोल्या एक वर्षाच्या कालावधीसाठी शुक्रवारी सील करण्यात आल्या. दोन पंचांच्या उपस्थितीत इमारतीचा बाहेरील लोखंडी गेट अधिकृत सील व मेणाच्या शिक्क्याने बंद करण्यात आला. ही कारवाई ऑपरेशन शक्ती मोहिमेंतर्गत करण्यात आली असून, या उपक्रमाचा उद्देशअनैतिक व्यवसायाचे संपूर्ण उच्चाटन करणे आणि महिलांना सन्मानजनक जीवन मिळवून देणे हा आहे.

# हवाई दल प्रमुख ए.पी.सिंह यांच्या अध्यक्षतेखाली मेंटेनन्स कमांड कमांडर्स परिसंवादाचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

नागपूर मधील वायुसेना नगर येथे १६ आणि १७ ऑक्टोबर २०२५ रोजी देखभाल कमांड कमांडर्सची परिषद आयोजित करण्यात आली होती. हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए.पी.सिंग या परिषदेच्या अध्यक्षस्थानी होते. एअर मार्शल व्हीके गर्ग, एअर ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ, मेंटेनन्स कमांड यांनी त्यांचे स्वागत केले. हवाई दल प्रमुखांचे आगमन झाल्यावर त्यांना मानवंदना देण्यात आली.

स्वदेशी तंत्रज्ञानाच्या विकासाद्वारे क्षमता विकास, या संकल्पनेवरील या परिषदेत स्वावलंबन, स्वदेशीकरण आणि महत्त्वाच्या मालमत्तेचे दीर्घकालीन संवर्धन यावर भर देण्यात आला. या परिषदेने कमांडर्सना प्रमुख ऑपरेशनल, देखभाल आणि लॉजिस्टिक्स आव्हानांवर चर्चा करण्यासाठी, तसेच मिशनची तयारी आणि ताफ्याची उपलब्धता वाढवण्यासाठी नवोन्मेषी उपायांची देवाण-घेवाण करण्यासाठीचे व्यासपीठ म्हणून भूमिका बजावली.

परदेशी ओईएम कंपन्यांवरील अवलंबित्व कमी करणे, प्रणालीची विश्वासार्हता वाढवणे, प्रणालीचे आयुर्मान वाढवण्याचा अभ्यास, पुरवठा साखळीची कार्यक्षमता वाढवणे आणि तांत्रिक नवोन्मेष या उद्देशाने मेंटेनन्स कमांडने हाती घेतलेल्या उपक्रमांची हवाई दल प्रमुखांना माहिती देण्यात आली. हवाई दल प्रमुखांनी, भारतीय हवाई दलाच्या कार्यान्वयन तत्परतेसाठी आणि आत्मनिर्भर भारताच्या राष्ट्रीय दृष्टीकोनाला अनुसरून देखभाल कमांडच्या कर्मचाऱ्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल प्रशंसा केली.

हवाई दल प्रमुखांनी भारतीय हवाई दलाच्या कामकाजात देखभाल कमांडची महत्त्वाची भूमिका अधोरेखित केली. त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना व्यावसायिकता, सुरक्षितता आणि कार्यक्षमतेच्या उच्च दर्जासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले, ज्यामुळे देशाच्या आकाशाचे रक्षण करण्यासाठी भारतीय हवाई दलाची वचनबद्धता अधिक दृढ होईल.

## दुचाकींमध्ये धडक, तरुण जखमी

**नागपूर :** वाडीच्या खडगाव मार्गावर दोन दुचाकींमध्ये आमोरासमोर धडक झाली. यात एक दुचाकीस्वार युवक गंभीर जखमी झाला. सोहम तुलशीराम पटेल (२८) रा. मोहाळे लेआऊट, आठवा मैल-वाडी असे जखमीचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी ७.३० वाजताच्या सुमारास सोहम त्याच्या एमएच-४०/बीबी-७९८३ क्रमांकाच्या दुचाकी वाहनाने कामावरून घरी जात होता. खडगाव मार्गावर समोरून भरधाव आलेल्या दुचाकी क्र. एमएच-३१/एफटी-३८४१ च्या चालकाने सोहमच्या दुचाकीला जबर धडक दिली. त्याला उपचारार्थ खासगी रुग्णालयात भरती करण्यात आले. सोहमची पत्नी ओमकुमारीने दिलेल्या तक्रारीवरून आरोपी दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा नोंदवत तपास सुरू केला आहे.

# बाजीराव साखरे ई-लायब्ररीतील रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

नागपूर महानगरपालिकेच्या लष्करीबाग येथील बाजीराव साखरे ई-लायब्ररी येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून मंगळवारी (ता.१४) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या सहकार्याने आयोजित या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिराच्या माध्यमातून ५७ युनिट रक्त संकलित करण्यात आले.

इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या




डॉ. पल्लवी बोंदडे व समाजसेवा अधीक्षक श्री चेतन मेश्राम यांच्या हस्ते तसेच सहाय्यक ग्रंथपाल विशाल शेवारे यांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले.

बाजीराव साखरे ई-लायब्ररीमध्ये आयोजित रक्तदान शिबिरामधून ५७ युनिट रक्त संकलन करण्यात आले. नागपूर शहरात उपचार घेणाऱ्या गरजू रुग्णांना रक्ताचा तुटवडा भासू नये याकरिता हे रक्तदान शिबिर महत्वाचे ठरणार आहे.

यावेळी इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील डॉ. पार्थ खेकरे, सिनियर टेक्निशियन अनिल बोरकर, परिचारिका रेहणुमा, रफिया, आलिना, शुभम देवकर, अनुप शेवटे उपस्थित होते. बाजीराव साखरे ई - लायब्ररी मधील विद्यार्थी सर्वश्री विशाल विशाल बरंवाल, शुभम गेडाम, गौरव महाजन, सुहास धोंगडे, तेजस खंडारे, प्रशिक उंदिरवाडे, प्रणय संगोळकर यांनी रक्तदान शिबिर यशस्वी करण्यात सहकार्य केले.

# फटाके मुक्त दिवाळी साजरी करूया.... निसर्गाचे नुकसान टाळू या!



प्रा. अंबादास नरसिंगराव पाचंगे
राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, श्री स्वामी समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रावळगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक.
७०५८१९२९६७
pachangeambadas@gmail.com

दिवाळी हा भारतीय संस्कृतीतील सर्वात मोठा, प्रसिद्ध आणि आनंददायी सण मानला जातो. अंधारावर प्रकाशाचा विजय, अज्ञानावर ज्ञानाचा विजय आणि दुःखावर आनंदाचा विजय हे या सणामागील मूलभूत तत्त्व आहे. दिवाळीत घरांची स्वच्छता केली जाते, दिवे लावले जातात, रांगोळ्या काढल्या जातात, पारंपरिक कपडे परिधान केले जातात, गोडधोड पदार्थ खाल्ले जातात आणि लक्ष्मी पूजन केले जाते. पण गेल्या काही वर्षांपासून या सणात फटाके फोडण्याची प्रथा अतिशय मोठ्या प्रमाणात वाढली आहे, जी पर्यावरणासाठी आणि समाजासाठी हानिकारक नुकसान दायक ठरत आहे. अनेक वेगवेगळ्या प्रकारचे रोग वाढून मानवी आरोग्य धोकात येत आहे, त्यामुळे उत्तम दीर्घायुष्यासाठी आजच्या काळात फटाके मुक्त पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे.

**फटाक्यांमुळे होणारे दुष्परिणाम**

**प्रदूषण आणि आरोग्यावर होणारे परिणामः**

फटाके फोडल्यामुळे प्रचंड प्रमाणात धूर, कार्बन डायऑक्साईड, सल्फर डायऑक्साईड आणि इतर विषारी वायू हवेत मिसळतात. त्यामुळे हवा दूषित होते. ही दूषित हवा श्वासावाटे शरीरात गेल्यास फुफ्फुसांचे आजार, दमा, ॲलर्जी यासारख्या समस्या निर्माण होतात.

लहान मुलं, ज्येष्ठ नागरिक, व दम्याचे रुग्ण यांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास होतो. फटाके आपल्या आरोग्यावर थेट वाईट परिणाम करत असतात, त्यामुळे सर्वांनी फटाके मुक्त दिवाळी साजरी करणे गरजेचे आहे.

**प्राणी-पक्ष्यांचे हाल**

काही वर्षांपूर्वी ज्यांच्या चिवचिवाटाने प्रत्येकाची सकाळ आनंदी व गोड व्हायची, ते अनेक पक्षी हल्ली दृष्टीस सुद्धा पडत नाहीत. कुत्रे- मांजरे, गुरे-ढोरे, निसर्गातील पक्षी हे पशु-प्राणी फटाक्यांचा मोठा आवाज आणि प्रकाश यामुळे घाबरतात. अनेकदा ते घराबाहेर पळतात, त्यांना अपघात होतात, किंवा ते काही काळ खाता-पिताही नाहीत.

पक्ष्यांची आवाजाच्या दाबामुळे श्रवणशक्ती कमी होणयाचेही प्रमाण वाढते. माणसांसोबतच इतर जीवसृष्टीची काळजी घेणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे, कारण आपल्या प्रमाणेच त्यांना सुद्धा जगण्याचा अधिकार आहे.

**पर्यावरणाचे नुकसान**

फटाके फोडल्यामुळे फक्त वायूच नव्हे तर ध्वनी प्रदूषणही मोठ्या प्रमाणावर होते. फटाक्यांचा मोठा आवाज १०० डेसिबलपेक्षा अधिक असतो, जो कानांसाठी घातक आहे. यामुळे वातावरणातील शांतता भंगते आणि सजीव सृष्टीला मोठ्या प्रमाणात धोका निर्माण होतो. शिवाय फटाक्यांमध्ये वापरले जाणारे प्लास्टिक व रसायनं यामुळे जमिनीदेखील प्रदूषित होते.

**अपघातांची शक्यता वाढते**

प्रत्येक दिवाळीत देशभरात अनेक लहान-मोठे अपघात फटाक्यांमुळे होतं असतात. काही जणांचे हात भाजतात, तर काहींच्या डोळ्यांना इजा होते, काहींचे कपडे पेटतात आणि काही वेळा आग लागून जीवितहानीही होते. लहान मुलं अनेक वेळा फटाके चुकीच्या पद्धतीने फोडतात आणि त्यांना गंभीर दुखापत होते. त्यामुळे फटाके केवळ खेळण्याची गोष्ट नाही, तर ते बऱ्याचवेळा नुकसान दायक सुद्धा ठरतात हे प्रत्येकाने लक्षात घेणे गरजेचे आहे.

**फटाके मुक्त दिवाळीचे फायदेः**

फटाके न फोडता दिवाळी साजरी केली, तर त्याचे केवळ मानवालाच नाही तर संपूर्ण निसर्गाला अनेक फायदे होतात. अशा दिवाळीत ध्वनी आणि वायू प्रदूषण होत नाही. त्यामुळे हवा स्वच्छ राहते आणि श्वसनाच्या आजारांपासून मानवाचा बचाव होतो. पशु-पक्ष्यांना त्रास होत नाही. अपघातांचा धोका टळतो.

सर्वसामान्य गरीब माणसाला आपल्या परिसरातील रुग्णांना तसेच वृद्धांना शांत आणि सुखद सण अनुभवता येतो. शिवाय, फटाक्यांवर होणारा अनावश्यक खर्चही वाचतो, ज्यातून गरजूंना आवश्यक ती मदत करून आपण एखादा चांगला सामाजिक उपक्रम राबवू शकतो, त्यामुळे फटाके टाळणं म्हणजे केवळ पर्यावरण रक्षण नाही, तर संपूर्ण समाजाची व स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे आहे.

**फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्यासाठीचे पर्याय**

आज आपण फटाके न फोडता अनेक पर्यायी मार्गांनी दिवाळी साजरी करू शकतो. घरी मातीचे दिवे लावा, रांगोळीने घर सजवा, आकर्षक कलाकृतीने कंदील बनवून लावा आणि परिसर सुंदर ठेवा. घरगुती फराळ तयार करा आणि आप्तेष्टांना तसेच गरजूंना वाटप करा.

लहान मुलांना याचे महत्व पटवून देण्याचा लोकशाहीतल्यातील गोष्टी सांगा, मैदानी व बौद्धिक खेळ खेळा, आपल्या गल्लीत या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करा. गरजू लोकांना कपडे, अन्न किंवा मिठाई वाटा. झाडे लावा व ते जगवण्यासाठी प्रयत्न करा, विविध सामाजिक उपक्रमात भाग घ्या. सोशल मीडियावरून फटाके मुक्त दिवाळीबद्दल लोकांमध्ये जनजागृती करा.

शेवटी दिवाळीचा मूळ उद्देश हा आनंद, एकता आणि सकारात्मकता पसरविण्याचा आहे. प्रदूषण, त्रास आणि अपघात यांना प्रोत्साहन देणे, हे या सणाच्या मूळ हेतूच्या विरुद्ध आहे. त्यामुळे आपण सर्वांनी मिळून फटाके मुक्त, पर्यावरणपूरक आणि आरोग्यदायी दिवाळी साजरी केली पाहिजे. ही जबाबदारी केवळ सरकार किंवा पालकांची नाही, तर प्रत्येक नागरिकाची आहे.

चला तर मग, या दिवाळीत एक शपथ घेऊया - फटाके टाळूया, आनंद वाढवूया, आणि इतरांसाठी नावा आदर्श निर्माण करूया!

# : कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) : वरदान की शाप?






प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

आजचा काळ माहिती आणि तंत्रज्ञानाचा आहे आणि आजचे जग हे तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलणारे जग आहे. संगणक, इंटरनेट, मोबाईल यानंतर मानवजातीसमोर उभे राहिलेले सर्वात मोठे आव्हान व संधी म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता.

विज्ञानाने इतकी झेप घेतली आहे की, मानवी मेंदूची कार्यपद्धतीच यंत्रांमध्ये उतरवली गेली. या शोधाला आपण कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच आर्टिफिशिअल इंटेलिजेंस (एआय) असे म्हणतो. हे तंत्रज्ञान म्हणजे मानवी मेंदूचे यंत्ररूप.

माणसासारखे विचार करणे, शिकणे आणि निर्णय घेणे ही क्षमता याच्याकडे आहे. सुरुवातीला केवळ स्वप्न वाटणारे हे तंत्रज्ञान आज आपल्या घराघरात, खिशातल्या मोबाइलपासून ते जगाच्या अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे केवळ सोयी नाहीत, तर नवी शक्यता आहेत पण सोबतच धोक्यांची सावलीही आहे. हाच तर आधुनिक युगाचा मोठा प्रश्न आहे. त्यामुळेच त्याच्या शक्यतांबरोबर भीतीही वाढत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे जीवनात वेग आला, अचूकता आली आणि मानवी क्षमतेचा विस्तार झाला. जसे, एखादा आजार ओळखणे, शस्त्रक्रिया करणे किंवा नवे औषध शोधणे या सगळ्या गोष्टींमध्ये अक डॉक्टरांचा विश्वासू सहकारी बनला आहे.

आज हजारो जीव वाचत आहेत ते या तंत्रज्ञानामुळेच. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता वेगळी असते. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षमतेनुसार मार्गदर्शन करते. एका गावात बसलेल्या मुलालाही जागतिक दर्जाचे ज्ञान मिळू शकते, हा याचाच चमत्कार.

उत्पादन कमी वेळेत, कमी खर्चात आणि अधिक गुणवत्तेसह होत आहे. ग्राहकांशी बोलणारे चॅटबॉट्स हे तर आता दैनंदिन आयुष्याचा भाग झाले आहेत. अवकाश, समुद्राचा तळ, अणुभट्ट्या किंवा आपत्तीग्रस्त भाग जिथे माणसाचे पाऊल टाकणेही धोक्याचे, तिथे कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित यंत्रे मानवाचे प्राण वाचवत आहेत.

पण प्रत्येक प्रकाशासोबत सावलीही असते. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या झपाट्याने वाढणाऱ्या प्रभावामुळे मानवी जगत काही गंभीर प्रश्नांना सामोरे जात आहे. कारखाने, बँका, दवाखाने सर्वत्र मानवी श्रमाऐवजी यंत्रांचा वापर वाढत आहे. लाखो हातांना काम मिळणार नाही, ही भीती खरी आहे. सोपे उत्तर शोधणारा विद्यार्थी किंवा पटकन निर्णय घेणारा अधिकारी सगळेच यावर अवलंबून होत चालले आहेत.

विचार करणे, समस्यांना स्वतः भिडणे ही क्षमता कमी होत आहे. आपले फोटो, आवाज, माहिती कुठे साठवली जाते, कोण वापरतो याची आपल्याला जाणीव नसते. चुकीच्या हातात गेल्यास हेच तंत्रज्ञान धोकादायक शस्त्र ठरू शकते.

युद्धासाठी वापरले जाणारे एआय रोबोट्स एखाद्या क्षणात हजारो जीव घेऊ शकतात. पण त्यांना माणसाच्या वेदना जाणवत नाहीत. मग अशा निर्णयांची जबाबदारी कोणाची? श्रीमंत देश आणि मोठ्या कंपन्या याचा सर्वाधिक फायदा घेत आहेत. पण गरीब समाज मागे पडत आहे. तंत्रज्ञानाची ही दरी उद्या सामाजिक संघर्षाची कारणीभूत होऊ शकते.

२१ व्या शतकात तंत्रज्ञानाची प्रगती म्हणजे मानवी आयुष्याचा नवा अध्याय आहे. त्यात कृत्रिम बुद्धिमत्ता हा सर्वात महत्त्वाचा शोध मानला जातो. मशीन लर्निंग, रोबोटिक्स, ऑटोमेशन, डेटा ॲनालिसिस, चॅटबॉट्स या सर्व संकल्पना कृत्रिम बुद्धिमत्तेच्याच छत्राखाली येतात. हे तंत्रज्ञान मानवाच्या मेंदूच्या विचारक्षमतेची नक्कल करून काम करते आणि निर्णय घेण्याची क्षमता वाढवते. मात्र, प्रत्येक तंत्रज्ञानाप्रमाणेच यालाही फायदे आणि दुष्परिणाम आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे फक्त संगणक प्रोग्रॅम नाही, तर मानवी संस्कृतीचा आरसा आहे. जसे आपण त्याचा वापर करू, तसे परिणाम दिसतील. अविचाराने वापर केला तर ते विनाशकारी ठरेल, पण सजगतेने वापर केला तर ते मानवजातीच्या विकासाचे शिखर ठरू शकेल. म्हणूनच, सरकारने कडक कायदे करणे, शैक्षणिक संस्थांनी नैतिकतेचे धडे देणे, उद्योगांनी सामाजिक जबाबदारी स्वीकारणे आणि नागरिकांनी सजग राहणे या सर्वांची गरज आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तामुळे भविष्यात माणूस अधिक शक्तिशाली होईल की यंत्राचा गुलाम बनेल? हा प्रश्न उभा राहतो. काळजीपूर्वक, जबाबदारीने आणि मानवी संवेदनांची जाण ठेवून जर आपण अकचा वापर केला, तर ते खऱ्या अर्थाने मानवजातीसाठी वरदान ठरेल. अन्यथा, त्याच अक मुळे आपले अस्तित्व धोक्यात येऊ शकते. त्यामुळे हा न फक्त तंत्रज्ञानाचा विषय आहे, न फक्त अर्थकारणाचा. तो म्हणजे मानवाच्या भविष्याचा आरसा आहे.

■ ■ ■

# निवडणुकांचे बदललेले घातक रूप



लीना मकरंद गाडगीळ
पनवेल.

लोकशाहीत निवडणुकीला खूप महत्त्व आहे. निवडणुकीमुळेच सक्षम सत्ताधारी व विरोधक मिळतात. देश स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झाले त्यापैकी जवळजवळ ७० वर्षे एकाच पक्षाची सत्ता असल्याने हम करे सो कायदा हीच मानसिकता सर्वांवर लादली गेली.

त्यानंतर आलेल्या सरकारने देशाला प्रगतीपथावर नेण्याचे ध्येय ठेवून निवडणूक घेतल्या परिणामी गेल्या काही वर्षात अनेक वर्षे सत्तेत राहिल्या नंतर त्या पक्षाला निवडणुकीत मिळालेल्या अपयशामुळे ते सैरभैर झाले आहेत. त्यामुळे येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत विकासाचा मुद्दा दूर करून आरोप प्रत्यारोप, लांगूनचालन, दंगली घडवणे,आतंकवादी हल्ले, हिंसा, आंदोलने, मत चोरी, ईव्हीएम मशीन या गोष्टींवर प्राधान्य दिले जात आहे.

आताची निवडणूक एक वेगळ्या मुद्द्यावर होण्याची शक्यता आहे ती म्हणजे तथाकथित प्राणी प्रेमी मग ते भटके कुत्रे असोत, आक्रमक हत्ती किंवा कबुतरे असोत त्यांच्या रक्षणासाठी राजकीय पक्ष स्थापन केले जात आहे.

दादरच्या कबूतरखाना विरुद्ध न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध जैन समाज आक्रमक होऊन मुंबई महानगरपालिका निवडणुकीत एक स्वतंत्र पक्ष म्हणून निवडणूक लढण्याचे जाहीर केले आहे. हे जाहीर करत असतांना त्यांची भाषा ऐकून शांतिप्रिय असलेला जैन समाज कोणत्या दिशेला जात आहे हे न समजण्यासारखे आहे.

माणसापेक्षा प्राणी महत्त्वाचे आहेत असे काही लोकांना वाटते आणि त्याप्रमाणे ते त्यांना वाचवण्यासाठी प्रयत्न करतात. सत्ते शिवाय हे शक्य नसल्याने सत्ता पालट करण्यासाठी रोज नव नवीन पक्ष निर्माण होत आहे. निवडणूक आयोगाने अशा राजकीय पक्षांनी ध्येयधोरणे, त्यांचे आर्थिक व्यवहार तपासून त्यांना मान्यता देणे गरजेचे आहे.

मान्यता मिळाल्यानंतर आपल्या जाहीरनाम्याप्रमाणे ते काम करत आहे की नाही हे पाहणे देखील निवडणूक आयोगाने केले आहे. काही राज्यातील विधानसभा निवडणूकीत भाषिक राजकारणाचा देखील वापर होत असल्याचे दिसून आले आहे.

या सर्वातून एकच दिसून येते ते म्हणजे पैसा आणि सत्ता ही आपल्याकडे असावी असे वाटते. विकासाचा मुद्दा हा गौण ठरत आहे. खरंतर देश विकसित झाला तरच तो सुजलाम सुफलाम होऊ शकतो. सर्वांचे आर्थिक पाठबळ पण वाढू शकते. देशाला सुजलाम सुफलाम न बनवता देशाला गुलामगिरीत परत कसे ढकलता येईल हेच आता वेगवेगळ्या निवडणुकीतून पाहायला मिळते.

उमेदवार देताना त्याचे चारित्र्य, समाजासाठी केलेले कार्य न बघता कोणालाही अगदी गुन्हेगाराला देखील तिकीट दिले जाते. तो गुन्हेगार कारागृहातून निवडणूक लढवून जिंकतो हे अतिशय दुर्दैवी आहे. सर्व पक्षांच्या या ध्येयधोरणांमुळे सामान्य मतदार निवडणुकीत असमाधानी असून तो निवडणुकीत सहभागी होत नाही.

निवडणुकीच्या निमित्ताने मिळणारी सुट्टी ही अन्य कारणासाठी किंवा मौजमजा करण्यासाठी वापरली जाते. मतदान करायला खूप कमी लोक स्वतःहून येतात. जे येत नाही त्यांना वेगवेगळी आमिषे दाखवली जातात किंवा एकाच व्यक्तीचे दोन, तीन किंवा त्यापेक्षाही जास्त मतदान केंद्रात नाव असल्याने ते त्या त्या ठिकाणी जाऊन मतदान करतात. लोकशाही ला हे किती घातक आहे ह्याचा विचार करण्याची गरज आहे.

■ ■ ■ ■

# सोन्यामध्ये कॅरेट म्हणजे नेमके काय?

सोप्या भाषेत
इन्कमटॅक्स
आणि इन्वेस्टमेन्ट

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.




आपण गेल्या अनेक महिन्यापासून सोन्याबद्दल माहिती बघत आहोत. आज आपण आधी वाचकांचे प्रश्नोत्तर घेत आहोत, ज्यामुळे सर्व वाचकांना त्याचा लाभ मिळेल तथा कॅरेट बद्दल माहिती जाणून घेणार आहोत, जी व्यवहारात अत्यंत उपयोगी अशी आहे.

**प्रश्न :** एखाद्या व्यक्तीने एका दिवशी वीस लाख रुपयांची रजिस्ट्री करून घेतल्यास आय टी रिटर्न नसतांना देखील त्या वर कोणती कारवाई होते?
आत्माराम पंढरीनाथ भांगे,
वाधवाना (खु),
तालुका उदगीर, जि. लातूर.

■ वीस लाखाची रजिस्ट्री करून घेतल्यास काही अडचण येत नसते परंतु यात खालील मुद्दे तुम्हाला लक्षात ठेवावेच लागतील. सर्वात आधी तुम्हाला खरेदी केलेल्या रजिस्ट्रीसाठी पैसे कुठून आले, याचे सोर्स दाखवणे आवश्यक राहील.

दुसरे महत्वाचे म्हणजे तुम्ही सांगितले की इन्कमटॅक्स रिटर्न भरत नाहीत, याचाच सोप्याभाषेत अर्थ असा की तुमचे उत्पन्न टॅक्सेबल मर्यादेच्या आत आहे. इन्कम टॅक्सबल लिमिटच्या खाली असुन ही तुम्ही वीस लाखाचे पेमेंट करत आहात, हा एक scrutiny चा विषय निघू शकतो.

यासाठी आपण आपले उत्पन्न दाखवुन पूर्ण टॅक्स भरावे. अन्यथा हे वीस लाख तुमच्या उत्पन्नात न दाखवलेले उत्पन्न म्हणून जोडले जाईल. त्या उत्पन्नावर regular रेट प्रमाणे इन्कमटॅक्स तर भरावेच लागेल त्या शिवाय पेनल्टी व व्याज ही लागेल. आपण अधिक माहितीसाठी जवळच्या सी. ए. चा सल्ला घ्यावा.

**प्रश्न :** सोन्यात आपण नेहमी कॅरेट हा शब्द ऐकतो, कॅरेट म्हणजे नेमके काय आहे?

■ कॅरेट म्हणजे सोन्याला मोजण्यासाठी वापरले जाणारे माप. यामुळे आपल्याला सोन्याची शुद्धता कळते. याच्यात 24 कॅरेट हे सर्वात शुद्ध मानले जाते. 24 कॅरेट म्हणजे 99.9% सोनं असते. तथा याचा कोड नंबर 999 लिहिले जाते. हे सोने गुंतवणुकीसाठी आदर्श मानले जाते. हे सर्वाधिक टिकाऊ असते. 24 कॅरेट सोने हे शुद्ध सोने आहे.

आपण पुढील आठवड्या पासुन गोल्ड मॉनीटायझेशन स्कीम तथा गोल्ड बॉंड वगैरेची सविस्तर माहिती बघणार आहोत, जी व्यवहारात जोखीम भरलेल्या व सोनं न सांभाळता बँक मार्फत सरकारला देऊन नियमित उत्पन्न कसं मिळवू शकतो इत्यादी बद्दल माहिती सविस्तर जाणून घेणार आहोत.

ज्या वाचकांचे काही प्रश्न असतील त्यांनी त्यांच्या नावासह सविस्तर प्रश्न 9422218428 या नंबर वर फक्त व्हॉटस्ॲप करावे, त्यांची उत्तरे लेखमालेत निःशुल्क याच पेपरमध्ये दिली जातील. ■ ■

**प्रश्न :** कॅरेटचे विविध प्रकार व Percentage of fineness काय आहे?

■ आपण वर वर्णन बघितले तसेच वर्णन खालील टेबलावरून करता येईल.

| कॅरेट | शुद्धतेची टक्केवारी | कोड |
|---|---|---|
| 24 | 99.9% | 999 |
| 23 | 95.8% | 958 |
| 22 | 91.6% | 916 |
| 21 | 87.5% | 875 |
| 18 | 75% | 750 |

**प्रश्न :** दरवर्षी सोने-चांदीचे दर कसे वाढत आहेत?

■ सोनं, चांदीचे दर गेल्या 100 वर्षाचे खालील प्रमाणे आहेत.

| वर्ष | सोन्याचे भाव (10 ग्रॅम) | चांदीचे भाव (1 किलो) |
|---|---|---|
| 1925 | 18 | 61 |
| 1930 | 18 | 46 |
| 1940 | 36 | 48 |
| 1945 | 62 | 110 |
| 1950 | 99 | 160 |
| 1955 | 99 | 142 |
| 1960 | 111 | 185 |
| 1970 | 184 | 521 |
| 1980 | 1330 | 2655 |
| 1990 | 3200 | 6443 |
| 2000 | 4395 | 7765 |
| 2010 | 16320 | 27255 |
| 2015 | 26245 | 37825 |
| 2020 | 43251 | 39495 |
| 18/10/2025 | 120910 | 172000 |

# मेट्रोमधून प्रवास आणि सुरक्षेची काळजी



रेल्वे प्रवास, विमान प्रवासाचे जसे नियम असतात. जसे की कोणत्या वस्तू या प्रवासादरम्यान घेऊन जाऊ नये त्याच प्रमाणे मेट्रो प्रवासाचे देखील बरेच नियम असतात. मेट्रो प्रवासादरम्यान नक्की कोणत्या वस्तू घेऊन जाण्यास बंदी असते आणि या नियमांचे पालन केले नाही तर काय होते? हे अनेकांना माहित नसते.

मेट्रो स्टेशनमध्ये प्रवेश केल्यानंतर तुमच्या बॅग तपासल्या जातात. स्कॅनर मशीनमध्येही चेक केल्या जातात. तसेच सीसीटीव्ही कॅमेरे देखील असतात. त्यामुळे असे अनेक वस्तू आहेत ज्या तुम्ही मेट्रो प्रवासादरम्यान घेऊन जाऊ शकत नाही. नेल्यास कारवाई होऊ शकते किंवा दंड भरावा लागू शकतो.

डीएमआरसीच्या नियमांनुसार, खोटी बंदूक घेऊन जाऊ शकत नाही. तसेच चाकू, कात्री, तलवारी, ब्लेड, पिस्तूल इत्यादी धारदार आणि टोकदार शस्त्रे, हँडग्रेनेड, गनपावडर, फटाके, प्लास्टिक स्फोटके किंवा इतर स्फोटक पदार्थांसारखी स्फोटके, स्वयंपाकाचा गॅस, पेट्रोलियम, रंग, ओल्या बॅटरी किंवा इतर ज्वलनशील पदार्थ. अशा वस्तू घेऊन जाण्यास मनाई असते.

याव्यतिरिक्त, स्क्रूड्रायव्हर्स, प्लायर्स, टेस्टर आणि इतर हाताने वापरता येणारी साधने घेऊन जाऊ शकत नाही. या साधनांचा गैरवापर केला जाऊ शकतो आणि शस्त्रे म्हणून वापरला जाऊ शकतो, ज्यामुळे प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात येऊ शकते.

मेट्रोमध्ये ग्रेनेड, गनपावडर, फटाके, प्लास्टिक स्फोटके इत्यादी कोणतेही स्फोटक पदार्थ वाहून नेण्यास सक्त मनाई असते. हे केवळ सुरक्षेच्या दृष्टिकोनातून धोकादायक नाहीत तर संपूर्ण स्टेशन किंवा ट्रेनलाही धोका निर्माण करू शकतात.

स्वयंपाकाचा गॅस सिलेंडर, पेट्रोल, डिझेल, रंग, ओल्या बॅटरी इत्यादी ज्वलनशील पदार्थांनाही आग लागण्याच्या धोक्यामुळे सक्त मनाई आहे. तेल, तूप आणि इतर द्रव पदार्थ उघडपणे वाहून नेण्यास देखील मनाई आहे. आवश्यक असल्यास, ते हवाबंद डब्यात साठवले पाहिजेत.

विशेषतः खेळण्यांच्या बंदुका, तलवारी किंवा शस्त्रांसारखी दिसणारी खेळणी वापरण्यास मनाई आहे. यामुळे इतर प्रवाशांना भीती वाटू शकते आणि त्यांना खरा धोका समजण्याची चूक होऊ शकते.

■ ■ ■

## यांच्याकडूनही खरेदी करा

वाचक लिहितात

दोन दिवसांवर दिवाळी येऊन ठेपल्यामुळे समस्त बाजारपेठा रंगीबेरंगी तोरणांनी, निरनिराळ्या कंदिलांनी, सजावटीच्या साहित्यांनी सजल्या आहेत. शहरासारख्या ठिकाणी दुकानांपेक्षा रस्त्यावरील विक्रेत्यांकडून सजावटीचे साहित्य खरेदी करण्यालाच लोक पसंती देताना दिसत आहेत.

या विक्रेत्यांच्या गर्दीत कुठेतरी कोपऱ्याला मातीच्या पणत्या, लक्ष्मीपूजनाला पुजली जाणारी फुलझाडू, नरकचतुर्दशीला फोडले जाणारे कारेटे असे थोडे थोडके साहित्य विकणाऱ्या ७०-८० वयाच्या वयस्क बाया आणि पुरुष नक्कीच नजरेत पडतात. या वयातही त्यांची पोटासाठी मेहनत करण्याची जिद्द पाहून कुणाच्याही डोळ्यात पाणी यावे. दिवसभर मेहनत करून जेमतेम २००-३०० रुपयेही यांच्या पदरी पडत नसावेत. तरीही भीक मागण्यापेक्षा मेहनतीचे ४ पैसे कमवून कष्टाची भाकरी खाण्याची त्यांची वृत्ती बरेच काही शिकवून जाते.

अशा वयस्कांकडून त्यांच्याकडील साहित्य अवश्य खरेदी करावे. त्यांनी थाटलेला छोटासा व्यवसाय त्यांना श्रीमंत बनवणारा नसला, तरी या धकाधकीच्या जीवनात त्यांना दोन वेळचे अन्न मिळवून देऊन जिवंत ठेवणारा नक्कीच असतो. अशांकडून खरेदी करताना भाव-तोल करू नका. त्यांनी सांगितलेल्या भावातच वस्तू खरेदी करा कारण आपण दिलेले अधिकचे २ रुपयेही त्यांना लाखमोलाची उभारी देत असतात.

■ सौ. मोक्षदा घाणेकर
काळाचौकी, मुंबई

# अपराजिताच्या फुलाचे आरोग्यदायी रहस्य



आपल्या आरोग्यास आकार देण्यात आहार सर्वात महत्वाची भूमिका बजावतो. म्हणूनच, आपण आपल्या आहारात अशा गोष्टींचा समावेश करणे महत्वाचे आहे जे आपल्या संपूर्ण आरोग्यास समर्थन देतात, जसे की अपराजिताच्या फुलांपासून बनविलेले हर्बल टी.

या फुलाला नीलकंठ फूल किंवा शंखपुष्पी किंवा फुलपाखरू मूत्र फूल असेही म्हणतात. अपराजिता फुलाला धार्मिक महत्त्व देखील आहे. औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण हे सुंदर फूल भगवान शंकराला खूप आवडते. जर तुम्ही शिवलिंगावर अपराजीचे फूल अर्पण केले तर तुमच्या जीवनात नेहमीच आनंद, यश आणि सकारात्मकता असते.

बरेच लोक त्याच्या सौंदर्यामुळे आपल्या बागेत स्थान देतात, परंतु आपल्याला माहित आहे का की त्याच्या फुले आणि इतर भागांमध्ये अँटीऑक्सिडेंट, अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात. अशा परिस्थितीत, आपण याच्या सेवनाने अनेक आरोग्य फायदे देखील मिळवू शकता.

त्याच्या गुणधर्मांमुळे आपण अपराजिता फुलाचे आरोग्य फायदे घेऊ शकतो. हे मेंदू आणि पचनक्रियेसाठी सर्वोत्तम मानले जाते. चिंता असेल किंवा खूप तणाव असेल तर त्याच्या फुलांपासून बनवलेला चहा पिणे खूप फायदेशीर ठरू शकते.

अपराजिता हर्बल चहा पिऊन तुम्ही तुमच्या तणावाला निरोप देऊ शकता. होय, अपराजिता फुलांपासून बनविलेला चहा तणाव कमी करण्यास, चांगली झोप घेण्यास आणि आपला मूड सुधारण्यास मदत करतो. जर आपल्याला बर्याचदा चिंता किंवा चिडचिडेपणाची लक्षणे आढळली तर आपण हा चहा आपल्या आहारात जोडू शकता.

हा चहा बनवायला अतिशय सोपा आहे. आपल्याला फक्त एक कप कोमट उकळत्या पाण्यात ८-१० मिनिटे ५-६सोयाबीनचे ओतण्याची आवश्यकता आहे. त्यानंतर ते गाळून घ्या. फक्त तुमचा हर्बल चहा तयार आहे. गरम गरम प्या, घोट प्या.

हे शक्तिशाली फूल मेंदूच्या आरोग्यास चालना देण्यासाठी देखील खूप फायदेशीर मानले जाते. दररोज या हर्बल चहाचे सेवन केल्याने आपल्याला बुद्धिमत्ता सुधारण्यास, स्मरणशक्ती वाढविण्यास आणि एकाग्रता सुधारण्यास मदत होते.

अभ्यासात असे आढळले आहे की हा एक उत्तम नॉट्रोपिक (मेंदू-वर्धक) घटक आहे जो आपण आपल्या आहारात समाविष्ट करू शकता. हा चहा तुम्ही संध्याकाळी किंवा झोपेच्या एक तास आधी घेऊ शकता. चांगले परिणाम मिळविण्यासाठी कमीतकमी १५ दिवस ते प्या. हे दररोज ३ महिन्यांपर्यंत वापरले जाऊ शकते.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### दीपोत्सव..!

दिवाळीच्या स्वागताला
रंगवा घराच्या भिंती
पण गरीबांच्या झोपडीतही
लावजा एक पणती ..

कपड्यालत्यांची खरेदी
करा तुम्ही आनंदाने
पण निराधारांनाही दया
दोन कपडे प्रेमाने ..

देवाने भरपूर दिलय
आपल्याला सर्व काही
दुःखीतांचे आश्रू पुसाया
करू नका हो कुचराई . !

# स्तन कर्करोग जागरूकता : लवकर ओळखा, जीवन वाचवा



**चंद्रपूर, १८ ऑक्टोबर :** स्तनाचा कर्करोग हा जगभरातील महिलांमध्ये सर्वाधिक आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक आहे. वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे या आजारावर प्रभावी उपचार शक्य झाले आहेत, परंतु लवकर निदान हे अजूनही जीव वाचवण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक आहे.

ऑन्को-सर्जन म्हणून डॉ. जवादे म्हणतात की, मला दररोज हे जाणवते की योग्य वेळी निदान आणि उपचार झाल्यास रुग्णाला साधी शस्त्रक्रिया पुरेशी ठरते, तर उशिरा निदान झाल्यास ती एक गंभीर लढाई ठरते. दुर्दैवाने, अजूनही अनेक रुग्ण जागरूकतेअभावी, सामाजिक कलंकामुळे किंवा उपचार घेण्यात झालेल्या विलंबामुळे उशिरा रुग्णालयात येतात.

स्तनाचा कर्करोग काय आहे?

स्तनाचा कर्करोग हा स्तनातील ऊतकांमध्ये, विशेषतः दूधवाहिन्यांमध्ये किंवा लोब्युल्समध्ये सुरू होतो. हा कर्करोग जवळच्या लिम्फ नोड्समध्ये आणि नंतरच्या टप्प्यात शरीराच्या इतर भागांमध्ये पसरू शकतो. हा आजार प्रामुख्याने महिलांमध्ये आढळतो, परंतु पुरुषांनाही होऊ शकतो, जरी पुरुषांमध्ये स्तनाचा कर्करोग १% पेक्षा कमी प्रकरणांमध्ये आढळतो.

आपल्यासमोरचा सर्वात मोठा अडथळा म्हणजे निदानाची, शस्त्रक्रियेची आणि सामाजिक कलंकाची भीती. पण सत्य हे आहे की, योग्य वेळी निदान झाल्यास कर्करोग बरा होऊ शकतो. उशिरा निदान झाल्यास जीव गमावण्याचा धोका वाढतो.

आपल्या मातांना, बहिणींना आणि मुलींना स्वतःच्या आरोग्याबद्दल जागरूक बनवणे आवश्यक आहे. त्यांनी नियमितपणे स्वतःची तपासणी करावी आणि शरीरात बदल जाणवले तर दुर्लक्ष करू नये.

स्तनाचा कर्करोग म्हणजे मृत्युदंड नाही. आज योग्य वेळी निदान आणि आधुनिक उपचारांमुळे लाखो महिला कर्करोगानंतरही पूर्ण आणि निरोगी जीवन जगत आहेत. चला, आपण शिक्षण देणे, तपासणी करणे आणि उपचार करणे सुरू ठेवूया, कारण प्रत्येक वाचविलेला जीव हा या आजारावरील विजय आहे.

या स्तन कर्करोग जनजागृती महिन्यात, फक्त जागरूकतेपुरती मर्यादित न राहता कृतीकडे वळूया. लवकर निदान हे फक्त घोषवाक्य नाही, तर जीवन वाचवणारी खरी गोष्ट आहे.

# आज मेट्रो इन दिनों सोनी मॅक्स वर




**मुंबई, १८ ऑक्टोबर :** संगीतमय प्रेमकथा हा एक दुर्मिळ सिनेमॅटिक अनुभव असतो, जो गोड रोमान्स आणि सुरेल गाण्यांची एकत्र गुंफण करतो आणि मनात खोल दडलेल्या भावना जागवतो, ज्या चित्रपट संपल्यानंतर देखील मनात रुंजी घालत राहतात. मेट्रो .. इन दिनों हा असाच एक खास अनुभव आहे, ज्यामध्ये एकात एक अडकलेल्या कथानकांच्या आणि अप्रतिम संगीताच्या माध्यमातून आधुनिक नात्यांमधील गुंतागुंत टिपली आहे. अनुराग बसूचे दिग्दर्शन लाभलेला हा चित्रपट केवळ एक प्रेम कथा सांगत नाही, तर तुम्हाला त्याचा अनुभव देतो आणि या पठडीच्या उत्तम चित्रपटांत आपले स्थान निर्माण करतो. रविवार, १९ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजता मेट्रो.. इन दिनोंच्या प्रीमियरसह सोनी मॅक्स वाहिनी आपल्या प्रेक्षकांसाठी एक अविस्मरणीय सिनेमॅटिक अनुभव घेऊन येण्यासाठी सज्ज आहे.

मेट्रो.. इन दिनों हा अनुराग बसूच्या लाइफ इन अ मेट्रो चा सिक्वल आहे. यामध्ये एकात-एक गुंतलेल्या अनेक कथा आहेत आणि त्यामधून देशभरातील शहरांमध्ये दिसणाऱ्या आधुनिक नात्यांच्या गुंतागुंतीचा शोध घेतला आहे. हृदयस्पर्शी लिखाण, त्यातील मोठमोठे कलाकार आणि भावप्रधान संगीत याबद्दल हा चिटपट खूप वाखाणला गेला आहे. समीक्षकांनी पंकज त्रिपाठी, कोंकणा सेन शर्मा, अली फझल, फातिमा सना शेख, नीना गुप्ता, अनुपम खेर, आदित्य रॉय कपूर आणि सारा अली खान यांच्या अभिनयाचे कौतुक केले आहे.

# मिडास हॉस्पिटलला अमेरिकेतील डॉ. कुलविंदर दुआ यांच्या हस्ते 'वर्ल्ड एंडोस्कोपी ऑर्गनायझेशन ट्रेनिंग सेंटर' म्हणून मान्यता मिळाली

**अकोला, १८ ऑक्टोबर :** नागपूरमधील प्रमुख आरोग्यसेवा संस्थांपैकी एक असलेल्या,मिडास हॉस्पिटलला हे जाहीर करताना आनंद होत आहे की त्यांना वर्ल्ड एंडोस्कोपी ऑर्गनायझेशन (डब्ल्यूईओ) ट्रेनिंग सेंटर म्हणून मान्यता मिळाली आहे. ही मान्यता अमेरिकेतील सुप्रसिद्ध एंडोस्कोपी तज्ज्ञ आणि डब्ल्यूईओच्या 'आउटरीच कमिटी' चे अध्यक्ष डॉ. कुलविंदर दुआ यांच्या हस्ते दिली जाणार आहे.

या निमित्ताने मिडास हॉस्पिटल, वर्धा रोड, नागपूरमध्ये एका छोट्या समारंभाचे आयोजन करण्यात आले, ज्यात रिबन कापण्याचा समारंभ आणि प्रमाणपत्र आणि प्लॅकचे अनावरण करण्यात आले. वर्ल्ड एंडोस्कोपी ऑर्गनायझेशन ट्रेनिंग सेंटर ही प्रतिष्ठित मान्यता डॉ. कुलविंदर दुआ यांनी मिडास हॉस्पिटलचे डायरेक्टर, डॉ. श्रीकांत मुकेवार आणि डॉ. सौरभ मुकेवार यांना प्रदान केली.

इंटरनॅशनल एक्स्पर्ट डॉ. कुलविंदर दुआ, अमेरिकेतील विस्कॉन्सिन मेडिकल कॉलेजमधील गॅस्ट्रोएन्टरॉलॉजीचे प्राध्यापक आणि प्रसिद्ध एंडोस्कोपी तज्ज्ञ, एंडोस्कोपीतील नवीनतम तंत्रज्ञान आणि महत्त्वाची माहिती शेअर करणार आहेत.

वर्धा रोड, नागपूर येथील मिडास हॉस्पिटल आता आंतरराष्ट्रीय डॉक्टरांना एंडोस्कोपीमध्ये प्रशिक्षण देणार आहे, ज्यात लिव्हरवरील अत्याधुनिक एंडोस्कोपी प्रक्रियाचे लाइव्ह डेमो देखील दाखवले जाणार आहेत. गेल्या वर्षभरात इटली, फ्रान्स, रुवांडा, साउथ आफ्रिका, युएई, ओमान, फिलिपिन्स यांसह अनेक देशांतील डॉक्टरांनी पुढील प्रशिक्षणासाठी मिडास हॉस्पिटलला भेट दिली आहे.

मिडास हॉस्पिटल, वर्धा रोड, नागपूरला वर्ल्ड एंडोस्कोपी ऑर्गनायझेशन ट्रेनिंग सेंटर म्हणून मिळालेली मान्यता ही नागपूर आणि मध्य भारतात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गॅस्ट्रोएंटरॉलॉजी व एंडोस्कोपी सेवा देण्याच्या त्याच्या बांधिलकेचे प्रतीक आहे. या सहयोगाचा उद्देश भारतातील वैद्यकीय व्यावसायिकांचे कौशल्य वाढवणे आणि एंडोस्कोपीमध्ये आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धती लागू करणे आहे.

मिडास हॉस्पिटल, वर्धा रोड, नागपूरचे डायरेक्टर आणि सिनियर गॅस्ट्रोएंटरॉलॉजिस्ट डॉ. श्रीकांत मुकेवार यांनी सांगितले, आम्हाला डॉ. कुलविंदर दुआ यांचे स्वागत करताना आनंद आणि अभिमान वाटत आहे, तसेच वर्ल्ड एंडोस्कोपी ऑर्गनायझेशनकडून मिळालेल्या मान्यतेबद्दल आम्हाला गर्व वाटत आहे. ही मान्यता मिडास हॉस्पिटलच्या एंडोस्कोपी प्रशिक्षण कार्याला आणखी मजबूती देईल आणि यामुळे रुग्ण तसेच वैद्यकीय क्षेत्रालाही मोठा फायदा होईल, असे डॉ. सौरभ मुकेवार, डायरेक्टर आणि सिनियर गॅस्ट्रोएंटरॉलॉजिस्ट यांनी नमूद केले.

# पूर्णपणे नवीन स्कोडा ऑक्टाव्हिया आरएस: पॉवर, स्टाइल आणि लेगसी



**नागपूर, १८ ऑक्टोबर :** स्कोडा ऑटो इंडिया देशातील आपल्या प्रवासाची २५ वर्षे साजरी करत असताना, खऱ्या अर्थाने एका आख्यायिकेचे, म्हणजेच पूर्णपणे नवीन ऑक्टाव्हिया आरएसचे पुनरागमन होत आहे. मर्यादित संख्येत पूर्णपणे-निर्मित युनिट (एफबीयू) म्हणून उपलब्ध असलेली, ऑक्टाव्हिया आरएस ही अतुलनीय ड्रायव्हिंग गतिशीलता, धाडसी डिझाइन आणि निर्विवाद आरएस स्पिरिटचे प्रतीक आहे, ज्यामुळे उत्साही आणि शुद्धतावादी दोघांसाठी एक खास आयकॉन म्हणून त्याचे भारतात पुनरागमन होत आहे. ऑक्टाव्हिया आरएसची (एक्स-शोरूम) किंमत ४९,९९,००० रुपये आहे.. ऑक्टाव्हिया आरएस ही मॅम्बा ग्रीन, कँडी व्हाइट, रेस ब्लू, मॅजिक ब्लॅक आणि वेल्वेट रेड या पाच आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध असून गाडीची डिलिव्हरी ६ नोव्हेंबरपासून ग्राहकांना देण्यात येतील.

लॉंचबद्दल बोलताना, स्कोडा ऑटो इंडिया चे ब्रँड संचालक आशिष गुप्ता म्हणाले ऑक्टाव्हिया आरएसला मिळालेला प्रतिसाद अभूतपूर्व आहे. या आयकॉनिक मॉडेलने भारतातील ड्रायव्हिंगबाबत उत्साही लोकांच्या मनात खऱ्या अर्थाने उत्साह निर्माण केला आहे, ज्यामुळे ऑक्टाव्हिया आरएसचा जागतिक स्तरावरील विशेष दर्जा आणखी मजबूत झाली आहे. भारतात स्कोडा ऑटोची उल्लेखनीय २५ वर्षे साजरी करत असताना, जागतिक दर्जाचा कार देण्याची आमची वचनबद्धता पूर्वीपेक्षाही अधिक मजबूत झाली आहे. आरएस बॅज केवळ कामगिरी नाही तर त्यापेक्षा खूप काही दर्शविते. हे आमच्या ग्राहकांचे स्कोडा ब्रँडबद्दलचे भावनिक संबंध आणि विश्वास दर्शवते. स्कोडा कुटुंबात उत्साही लोकांच्या नवीन पिढीचे स्वागत करण्यास आणि या बाजारपेठेत आमच्या ब्रँडची व्याख्या सांगणाऱ्यांच्या मजबूत वारसा आणि फॅन्डमवर काम सुरू ठेवण्यास आम्हाला उत्सुकता आहे.



# मैत्री आणि ड्रामाचा दुप्पट डोस!

**मुंबई, १८ ऑक्टोबर:** एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर हैं'च्या आगामी एपिसोड्समध्ये हास्य, धमाल आणि मनोरंजन मिळणार आहे, जे तुम्हाला तुमच्या आसनावर खिळवून ठेवेल. मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडबाबत गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, हप्पू (योगेश त्रिपाठी) त्याच्या धाडसाचे श्रेय पुन्हा एकदा कमिशनर (किशोर भानुशाली) घेत असल्याचे पाहून निराश होतो. स्वतःची योग्यता सिद्ध करण्याचा निर्धार करत हप्पू ठरवतो की, पुढच्या वेळेला तो थेट डीआयजीला त्याच्या धाडसाबाबत कळवेल. मालिका 'भाबीजी घर पर हैं'च्या आगामी एपिसोडबाबत शुभांगी अत्रे ऊर्फ अंगुरी भाबी म्हणाल्या, मॉडर्न कॉलनीमध्ये उत्साहाचे वातावरण आहे, कारण विभुती (आसिफ शेख) आणि प्रेम (विश्वजीत सोनी) आमदाराच्या मदतीने रोमियो ज्युलिएट नाटकाचे आयोजन करत आहे. सुरूवातीला उत्सुक नसलेले अनिता (विदिशा श्रीवास्तव) आणि तिवारी (रोहिताश्व गौड) जास्त पैसा मिळणार असल्याचे समजल्यानंतर उत्साहाने पुढाकार घेतात.


# मोटोरोलाने फ्लिपकार्ट बिग बँग दिवाळी सेलदरम्यान सणासुदीच्या काळात उत्साहाची भर



**मुंबई, १८ ऑक्टोबर :** मोटोरोला ही मोबाइल तंत्रज्ञानामधील जागतिक अग्रणी आणि भारतातील आघाडीच्या एआय स्मार्टफोन ब्रँडने आज फ्लिपकार्टच्या बिग बँग दिवाळी सेल २०२५ साठी अभूतपूर्व किमतींमध्ये त्यांच्या सर्वात लोकप्रिय स्मार्टफोन्सवर सर्वात मोठ्या हंगामी सूटची घोषणा केली. #BigBangDiwaliSale चा भाग म्हणून मोटोरोला एआय, पॅन्टोन डिझाइनमधील नवीन सुधारणा आणि टिकाऊपणा लाखो ग्राहकांसाठी अनपेक्षित किमतीमध्ये सादर करत आहे. हे डिवाईसेस सेलमध्ये उपलब्ध असून आहेत आणि बिग बँग दिवाळी सेलदरम्यान सर्व ग्राहकांसाठी उपलब्ध असतील.

सीझनच्या सर्वात मोठ्या ऑफरची सुरुवात करत मूळ किंमत २९,९९९ असलेला मोटोरोला एज ६० प्रो (८+२५६ जीबी मॉडेल) आता फक्त २४,९९९* च्या उत्सवी प्रभावी किमतीमध्ये खरेदी करता येऊ शकतो, ज्यामुळे हा स्मार्टफोन २५ अंतर्गत सर्वात धुमाकूळ निर्माण करणारा प्रमुख ठरला आहे. मोटोरोला एज ६० प्रो एकमेव पॅन्टोन सत्यापित ट्रिपल ५० मेगापिक्सल कॅमेरा सिस्टम तसेच सोनी एलवायटीआयए ७००सी मुख्य सेन्सर, ५० मेगापिक्सल अल्ट्रावाइड + मॅक्रो आणि १० मेगापिक्सल टेलिफोटोसह ३ ऑप्टिकल व ५० एआय सुपर झूमच्या माध्यमातून त्याच्या श्रेणीला नव्या उंचीवर घेऊन जातो. मोटोएआय, गुगल जेमिनी, मायक्रोसॉफ्ट कॉपीलोट आणि परप्लेक्सिटीसह हा डिवाईस प्रोफेशनल-ग्रेड फोटोज व ४के व्हिडिओजची खात्री देतो, ज्यामध्ये एआय स्टेबिलायझेशन, फोटो एन्हान्सर आणि गुगल फोटोज टूल्स जसे मॅजिक इरेजर व अनब्लर आहे. या स्मार्टफोनमध्ये जगातील सर्वात टिकाऊ ६.७ इंच १.५के टू कर्व्ह क्वाड-कर्व्ह डिस्प्लेसह ४५०० नीट्स सर्वोच्च ब्राइटनेस, एचडीआर१०+ आणि गोरिला ग्लास ७आय प्रोटेक्शन आहे. जवळपास १६ जीबी एलपीडीडीआर५एक्स रॅमसह मीडियाटेक डायमेन्सिटी ८३५० एक्स्ट्रीम चिपसेटवर कार्यरत या स्मार्टफोनमध्ये ६००० एमएएच डीएक्सओएमएआरके गोल्ड-प्रमाणित बॅटरीसह ९० वॅट टर्बोपॉवर चार्जिंग, १५ वॅट वायरलेस चार्जिंग आणि रिव्हर्स चार्जिंग आहे. आयपी६८/आयपी६९ प्रोटेक्शन आणि एमआयएल-एसटीडी-८१०एच प्रमाणनासह हा स्मार्टफोन दीर्घकाळापर्यंत टिकण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. हा स्मार्टफोन चार प्रीमियम पॅन्टोन फिनिशेसमध्ये उपलब्ध आहे - डॅझलिंग ब्ल्यू (फॅब्रिक फिनिश), वॉलनट (वूड फिनिश), शॅडो व स्पार्कलिंग ग्रेप (वेगन लेदर फिनिश). सर्वात लोकप्रिय ८ जीबी व्हेरिएण्ट व्यतिरिक्त यंदा सणासुदीच्या काळात छ२८,९९९* (१२+२५६ जीबी) आणि ३२,९९९* (१६+५१२ जीबी) या आकर्षक किमतींमध्ये देखील उपलब्ध आहे, ज्यांची मूळ किंमत अनुक्रमे ३३,९९९ आणि ३७,९९९ आहे.

# उत्सवी पेहरावाला अधिक आकर्षक करा: ओरा फाइन ज्वेलरीकडून दिवाळीसाठी नवीन कलेक्शन्स लाँच



**मुंबई, १८ ऑक्टोबर :** आनंदमय धनत्रयोदशी व दिवाळी सण देशभरात उत्साहाचे वातावरण आणणार असताना ओरा फाइन ज्वेलरीला आपल्या आकर्षक नवीन कलेक्शनच्या लाँचची घोषणा करताना आनंद होत आहे, जे परंपरेचे पैलू आणि समकालीन आकर्षकतेला साजरे करण्यासाठी बारकाईने डिझाइन करण्यात आले आहेत. यंदा सणासुदीच्या काळात ओरा ग्राहकांना अद्वितीय सौंदर्य व समृद्धतेसह आकर्षक डिझाइन्स पाहायला मिळतील, जेथे डिझाइन्सची लक्षवेधक श्रेणी, तसेच विशेष, मूल्य-केंद्रित ऑफर्स सादर करण्यात आल्या आहेत.

ओराच्या नवीन कलेक्शनसमधून कारागिरी व नाविन्यतेप्रती ब्रँडचा अतूट वारसा दिसून येतो. दिवाळी पूजेसाठी परिपूर्ण पारंपारिक डिझाइन्सपासून उत्सवी पार्टी व संमेलनासाठी अनुकूल अशा आकर्षक आधुनिक दागिन्यांपर्यंत प्रत्येक पीसमधून उत्सवी उत्साह व्यक्त होतो. पारंपारिक साजरीकरणासाठी सिल्क साडी, दिवाळी नाइट आऊटसाठी समकालीन पोशाख किंवा इतर उत्सवी पोशाख असो हे नेकलेस व इअररिंग्स सर्वांचे लक्ष वेधून घेण्यासाठी आणि प्रत्येक लुकला अधिक आकर्षक करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत, ज्यामुळे तुम्ही या सणासुदीच्या काळात अधिक आकर्षक दिसाल. ऑफर्स पुढीलप्रमाणे आहे - १ ग्रॅम सोन्याच्या किमतीवर ५०० रूपयांची सूट*, हिऱ्याच्या किमतीवर २५ टक्के सूट*, ईएमआय सुविधांवर 0 टक्के व्याज*, *अटी व शर्ती लागू.

# सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल: हताशा आणि कठीण निर्णय, दीप्ती आपले मूल प्रार्थनाला देणार का?

**मुंबई, १८ ऑक्टोबर :** हृदयस्पर्शी व्यक्तिरेखा आणि प्रेरणादायक कथानक यामुळे सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल सगळ्यांची लाडकी बनली आहे. पुष्पा (करुणा पांडे) वकील बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सध्या प्रयत्नशील आहे, पण आत्ताही तिच्यासमोर नवीन अडथळे आहेत, ज्यामध्ये तिच्या दृढतेची आणि तिच्या जवळच्या नात्यांची कसोटी होत आहे.

आगामी भागांमध्ये, प्रार्थना (इंद्राक्षी कांजीलाल) च्या जीवनात एक मोठा टर्निंग पॉइंट आलेला दिसेल. तिच्या अनेक वर्षांची मेहनत आणि दृढ निर्धाराचे फळ तिला मिळते. आयपीएस चा इंटरव्ह्यू यशस्वीरित्या पार पाडून ती आपले स्वप्न साकार करण्याच्या दिशेने पुढचे पाऊल टाकते. पण तिचा आनंद फार काळ टिकत नाही, कारण आपल्याला कधीच मूल होऊ शकणार नाही हे कटू सत्य तिला समजतं. प्रार्थनाची व्यथा पाहून दीप्ती निःस्वार्थ भावनेने एक भावनिक निर्णय घेते. आपले एक मूल प्रार्थनाला द्यायचे ठरवते. पण या भावुक निर्णयामुळे एका संघर्षाची सुरुवात होते. अश्विन या कल्पनेचा ठासून विरोध करतो.

या भावनिक संघर्षाचा त्यांच्या नात्यावर काय परिणाम होईल? या निर्णयामुळे त्यांच्यात दुरावा वाढेल का?

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दीप्तीची भूमिका करणारी गरिमा परिहार म्हणते, दीप्ती फक्त एक आई नाही, ती एक आई आहे जी बलिदान आणि निःस्वार्थतेचा खरा अर्थ जाणते. ही भूमिका बजावत असताना एका आईला आपल्या मुलाचे संगोपन करण्याची किती प्रबळ इच्छा असते, हे मी समजू शकले. प्रार्थनाची व्यथा पाहून माझे हृदय द्रवले आणि त्या क्षणी, आपले एक मूल तिला देणे हा केवळ एक पर्याय नव्हता, तर प्रेम आणि बहिणीचे नाते निभावणारी ती कृती होती.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत प्रार्थना ही व्यक्तिरेखा साकारणारी इंद्राक्षी कांजीलाल म्हणते, प्रार्थनाचा प्रवास हा स्वप्नं, संघर्ष आणि चिकाटीचा प्रवास आहे, तिचा दृढनिर्धार आणि हळवेपणा जिवंत करण्याचा मी पूर्ण प्रयत्न केला आहे. आयपीएस चा इंटरव्ह्यू उत्तीर्ण करणे हे तिच्यासाठी स्वप्न साकारल्यासारखे आहे. त्यासाठी तिने अनेक वर्षे परिश्रम केले आहेत आणि तरीही तिचा हा आनंद फार टिकत नाही, आणि या आनंदावर एका अनपेक्षित दुःखाचे सावट येते. तिला जेव्हा हे समजते की, ती कधीच आई बनू शकणार नाही, तेव्हा तो कल्पनातीत दुःखाचा क्षण असतो.

# झी रिश्तों का मेलामध्ये आईने दिलेल्या गोड दिवाळी आश्चर्य भेटीमुळे शगुन पांडे झाला भावुक!

**मुंबई, १८ ऑक्टोबर :** झी टीव्ही आपल्या नवीन ब्रँड वचन आपका अपना झी टीव्हीसह मनोरंजनाची व्याख्या पुन्हा नव्याने सांगत आहे. या तत्वाशी प्रामाणिक राहून आणि हृदयस्पर्शी कथा प्रेक्षकांपर्यंत नेण्यासाठी ही वाहिनी घेऊन येत आहे झी रिश्तों का मेला, एक अद्वितीय, ऊर्जावान सोहळा जो आपल्या सर्वात आवडत्या मालिकांच्या कलाकारांना थेट त्यांच्या चाहत्यांपर्यंत पोहोचवतो. हा दिवाळी विशेष सोहळा मुंबईत आयोजित करण्यात आला होता. यात प्रेक्षकांना ऊर्जावान परफॉर्मन्सेस, प्रामाणिक क्षण आणि मनाला स्पर्शणारे फॅन इंटरॅक्शन अनुभवायला मिळाले.

जेव्हा झी टीव्ही कुटुंब एका रंगीबेरंगी छताखाली एकत्र आले, तेव्हा सेटवर एक अविस्मरणीय क्षण घडला. सरु मालिकेतील वेदची भूमिका साकारणारा शगुन पांडे आपल्या आयुष्यातील एका मोठ्या आश्चर्याने भावुक झाला. शुटींगदरम्यान, त्याची आई अनपेक्षितपणे मंचावर आली आणि तिला पाहून शगुनचे डोळे भरून आले आणि त्याने तिला मिठी मारली व तो रडायला लागला. त्याने हा क्षण आपल्या प्रवासातील अत्यंत खास क्षणांपैकी एक असल्याचे सांगितले.

शगुनसाठी हे फक्त एक आश्चर्य नव्हते; तर हा त्याला त्याच्या प्रवासाची आठवण करून देणारा क्षण होता. पंजाबहून मुंबईमध्ये अभिनेता बनण्याच्या स्वप्नासोबत आलेल्या शगुनला नेहमीच आपल्या आईकडून ताकद मिळाली. जेव्हा इतर कोणी त्याच्या स्वप्नावर विश्वास ठेवत नव्हते, तेव्हा आईच त्याच्यावर अनन्यसाधारण विश्वास ठेवत होती की तो यशस्वी होईल. प्रत्येक वर्षी शगुन दिवाळी साजरी करण्यासाठी घरी जातो, पण सरु मालिकेच्या शूटिंगमुळे यावेळी ते कठीण झाले होते. त्यासाठी त्याची आई त्याच्यासाठी हा सण खास बनवण्याचा निर्णय घेऊन आली आणि शगुन भावुक होऊन नि:शब्द झाला.

शगुन पांडे म्हणाला, जेव्हा मी पंजाब सोडून मुंबई आलो, तेव्हा माझ्याकडे फक्त एक स्वप्न आणि माझ्या आईचा माझ्यावर विश्वास होता. जेव्हा माझाही स्वतःवर विश्वास नव्हता, तेव्हाही तिचा एकटीचा माझ्यावर विश्वास होता की मी यशस्वी होईन. मला अजूनही आठवतं, जेव्हा मला काम मिळवण्यात अडचणी येत होत्या, तेव्हा तिने मला कसे प्रोत्साहित केले. ती म्हणायची, बस मेहनत करता रह, तेरा वक्त जरूर आएगा.

# ५५+ वर्षांवरील लोकांसाठी आध्यात्मिक प्रवास सोपे आणि सुरक्षित करण्यास वेबिनारसाठी जनरल एस. लाइफसोबत भागीदारी

**मुंबई, १८ ऑक्टोबर :** भारतातील तरुणांच्या लोकसंख्येबद्दल बरेच बोलले जात असले तरी देशातील ज्येष्ठांच्या लोकसंख्येतही अभूतपूर्व वाढ होत असून २०५० पर्यंत ६० वर्षे आणि त्यावरील वयाच्या ज्येष्ठांची संख्या ३४७ दशलक्षांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. ही संख्या एकूण लोकसंख्येच्या २१% आहे. (पीडब्ल्यूसी-एएसएलआयसिनियर केअर रिपोर्ट २०२४ आणि यूएनएफपीए २०२३). लोकसंख्याशास्त्रातील हा महत्त्वाचा बदल आणि ५५+ वर्षांवरील गटाच्या वाढत्या आकांक्षा ओळखून भारतातील आघाडीची सर्वव्यापी प्रवास सेवा देणारी थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड ही कंपनी आता या उच्च आर्थिक क्षमतेच्या विभागावर आपले लक्ष केंद्रित करत आहे.

भारतातील ज्येष्ठ प्रवाशांकडे आज प्रवासासाठी वेळ आणि आर्थिक संसाधने उपलब्ध आहेत. अर्थव्यवस्थेतील एकूण वाढीमुळे लोकांची खर्च करण्याची क्षमता वाढली आहे आणि एकल कुटुंबांच्या वाढीमुळे ज्येष्ठांकडे अधिक मोकळा वेळ व संचित उत्पन्न उपलब्ध आहे. यामुळे ५५+ वर्षांवरील वयोगटातील प्रवाशांमध्ये महत्त्वाकांक्षी, साहसी आणि अनुभवाची अपेक्षा करणाऱ्या प्रवासाची मागणी वाढली आहे. ही वाढती मागणी लक्षात घेऊन थॉमस कुक इंडियाने ५५+ वर्षांवरील वयोगटातील लोकांसाठी जीवनशैली आणि सामुदायिक व्यासपीठ असलेल्या आघाडीच्या जेन एस लाइफशी भागीदारी केली आहे. या भागीदारीचा एक भाग म्हणून दोन्ही ब्रँडच्या वतीने बुधवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता ५५+ वयोगटातील लोकांसाठी तीर्थयात्रा सोपी आणि आनंददायी बनवणे या विषयीच्या माहितीपूर्ण वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाद्वारे ज्येष्ठ नागरिकांच्या प्रवास गरजा पूर्ण करून त्यांना सक्षम बनवणे हा या मोफत वेबिनारचा उद्देश आहे. या सत्रात प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक आणि पर्यटक संदीप सोपारकर, थॉमस कुकचे तज्ज्ञ टूर मॅनेजर्स उपस्थित राहतील. ते ज्येष्ठ प्रवाशांसाठी प्रवासासंबंधी उपयुक्त टिप्स, इच्छित स्थळाविषयी माहिती आणि आरोग्यविषयक सल्ला देतील.

जेन एस लाइफच्या संस्थापक सुश्री मीनाक्षी मेनन म्हणाल्या, अनेक ज्येष्ठांसाठी तीर्थयात्रा ही एक अतिशय वैयक्तिक आणि महत्त्वाची यात्रा असते, परंतु दळणवळण अनेकदा अडथळा ठरू शकते. थॉमस कुकसोबतची आमची भागीदारी सुरक्षितता, सुविधा आणि समुदाय एकत्र आणत आहे, यामुळे ज्येष्ठांना संकोच न करता प्रवास करणे शक्य आहे. हा उपक्रम समुदायाला उत्साहाने आणि सहजतेने नवीन अनुभव घेण्यास मदत करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. या वेबिनारद्वारे ज्येष्ठांमध्ये एकाच वेळी आध्यात्मिक पर्यटनासह जगभ्रमंती करण्याचा आत्मविश्वास निर्माण व्हावा, हे या वेबिनारचे उद्दिष्ट आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आज, तुमच्या मदतीने एखाद्याचे काम पूर्ण होईल. तुम्ही नवीन संधींच्या शोधात बाहेर पडाल, जिथे तुम्हाला अनेक अद्भुत संधी मिळतील. तुमच्या सासरच्या लोकांकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल.

**वृषभ :** आज, तुमच्या व्यावसायिक संबंधांमुळे तुम्हाला खूप फायदा होईल. तुम्ही नवीन काम सुरू करू शकता. आज तुमचे वैवाहिक जीवन आनंदी असेल आणि चांगली बातमी मिळेल.

**मिथुन :** आज तुमचा आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका; तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. तसेच, मालमत्तेचे प्रकरण मिटविण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. आज, तुमचे मन अध्यात्माकडे वळेल.

**कर्क :** आणि तुम्ही उर्जेने परिपूर्ण असाल. आज, तुम्ही काळाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न कराल, जे तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. आज तुम्हाला एक मोठा स्टेज शो करण्याची सुवर्णसंधी मिळेल.

**सिंह :** घरातील वातावरण सुधारेल. आज, कोणतीही वस्तू खरेदी करताना त्याबद्दल संपूर्ण माहिती मिळवा. अनावश्यक बोलणे टाळण्याचा प्रयत्न करा आणि अनावधानाने सल्ला देणे टाळा.

**कन्या :** आज तुम्हाला ऑफिसच्या कामात सहकाजयांची मदत मिळेल, ज्यामुळे काम वेळेवर पूर्ण होईल. आज तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत खरेदीला जाऊ शकता. मानसिक शांती मिळेल.

**तुळ :** तुम्ही मित्रांसोबत बाहेर जाण्याची योजना आखू शकता. तुम्ही कोणाला उधार दिलेले पैसे तुम्हाला परत मिळतील. आज, विचार न करता कोणत्याही गोष्टीवर प्रतिक्रिया देऊ नका. त्यामुळे नातेसंबंध बिघडू शकतात.

**वृश्चिक :** आर्थिक बाबींबाबत तुमचा दिवस चांगला राहील. तुमची ओळखीची व्यक्ती तुम्हाला भेटू शकेल, ज्यामुळे आनंद होईल. एखाद्यावर विश्वास ठेवून निर्णय घेताना १० वेळा विचार करा.


**धनु :** मनासारखं काम मिळाल्याने खुश व्हाल. एखाद्या धार्मिक, सामाजिक कार्यक्रमात सहभागी होण्याची संधि मिळले. रविवारचा, सुट्टीचा दिवस निवांत मनासारखा जाईल. घरच्यांचा सपोर्ट मिळेल.

**मकर :** आज काही चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे. योग्य व्यवस्था करूनही, काही चिंता कायम राहतील, म्हणून तुमचे मनोबल मजबूत ठेवा. उत्पन्नासोबतच खर्चही आज वाढेल.

**कुंभ :** आज, मोठ्या माणसांच्या सहवासात वेळ घालवाल. सुखसोयींशी संबंधित वस्तू देखील खरेदी कराल. एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीला भेटल्याने मौल्यवान माहिती मिळेल. मुलांकडून चांगली बातमी मिळेल.

**मीन :** जर एखादं प्रलंबित सरकारी प्रकरण असेल, तर निर्णय तुमच्या बाजूने येण्याची शक्यता आहे. तुमच्या कौटुंबिक जबाबदाजया चांगल्या प्रकारे पार पाडू शकाल. मुलांच्या आनंदामुळे तुमच्याही चेहजयावर हसू फुलेल.

## शब्दकोडे क्रमांक २२४३



**आडवे शब्द :-**

१) अत्यंत रागीट माणसास ह्या ऋषीच्या नावाने संबोधतात
४) डोक्यावर गंगा धारण करणारा शंकर
७) संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
१०) उशिराने पिकणारे धान्य
११) ज्या जागेत घोडे बांधताता ती जागा
१२) उदा, दिल्ली मुंबई, चेन्नई, कोलकाता
१३) वाळवंट
१४) पराभव
१६) अंगातील मस्ती
१८) तुरुंग
१९) गावजेवण
२२) वाघ-सिंहाचे ओरडणे
२४) हा कागद शाई टिपून घेतो
२७) अरण्यात राहणे
२९) थोंडमास
३१) उथळ वाटी
३२) पातळ खांब
३४) दूर करणारा
३७) हात व पंजा यांना जोडणारा अवयव
३८) बडबड
३९) बक्षिसाचे चषक
४१) एक पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात आलेला
४२) व्यायाम
४४) धान्याचा ढीग
४५) अनुत्तीर्ण
४७) व्याजाने कर्ज देणारा
४९) जास्तीत जास्त
५१) अत्यंत धनाढ्य

माणूस

५५) चहा-कॉफी पिण्याचे जोड साधन
५७) मादीच्या विरुद्ध
५८) वाचण्यास योग्य असे
६०) विहीर
६१) एका बाजूस झुकणारा
६३) तोंडाळ, स्पष्टवक्ता
६४) एकाद्या बद्दल वाटणारा मत्सर
६५) मसाल्यातील पत्र
६७) नृत्य
६९) एक मिश्र धातू
७०) एकटा
७१) बैलाच्या मानेवरील जोखड
७२) युद्धक्षेत्र

**उभे शब्द :-**

१) जगाचे कालचक्र
२) मृत्यू
३) औषध
४) गंगेचे पवित्र पाणी
५) पृथ्वी
६) मोजकेपणा, मितता
७) फाटलेल्या दुधाच्या वड्या
८) जरी
९) यज्ञातील मानवी बळी
११) पारद
१४) फुलातील रज:कण
१५) कुबेराचा सेवक
१७) उभ्या आकाराची लोटी
१८) वडीलांचा भाऊ
२०) भोळा माणूस
२१) इच्छित गोष्ट प्राप्त होण्यासाठी देवादिकांना केलेले नवसादी प्रकार
२३) भरपूर रस असलेले
२५) सुटकेचा मार्ग
२६) धमकी
२८) अभिनेता
३०) चटकन
३३) समुद्राच्या पलीकडे
३४) इलेक्शन (म)
३५) आवाज, कीर्ती
३६) जमलेले सैन्य, कडे
३७) माझा
४०) किरण पडण्याचा कोन
४१) उपासना, प्रार्थना
४३) सोसण्याचा स्वभाव असलेला
४५) चौक
४६) केसांना नैसर्गिक रंग आणणारा पदार्थ
४७) दुधावरची मलई
४८) जंगलात पेटलेली आग
५०) मर्कट
५२) फळाचे साल
५३) राजाच्या दरबारातील कवी
५४) आंब्याची बी
५६) निरर्थक बडबड
५९) सजीव-निर्जीव सर्व भाग
६०) ध्वनी
६२) वडील
६६) मृत्तिका
६७) हिंदीत नाव
६८) मामाची पत्नी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## ग्रामीण पत्रकार संघटनेद्वारा पिलीभीतमध्ये
# राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १८ :

ग्रामीण पत्रकार संघटनेच्या वतीने मंगळवारी पिलीभीत येथील सिटी पॅलेस बँक्वेट हॉलमध्ये "पत्रकारिताः लोकशाहीचा चौथा स्तंभ - सन्मान आणि संघर्ष यांच्यातील" या विषयावर राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि बुद्धिजीवींनी उत्साहाने सहभाग घेतला.



कार्यक्रमाचे अध्यक्षपद असोसिएशनचे राष्ट्रीय संरक्षक दयाचंद वर्मा आणि दिनेश जैन यांनी भूषवले, तर मेरठ जिल्हा सरचिटणीस शिवकुमार शर्मा यांनी संचालन केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांनी दिवे प्रज्वलन आणि देवी सरस्वतीची पूजा करून केली. प्रमुख पाहुणे म्हणून रोहिलखंड विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. के. पी. सिंह आणि ज्येष्ठ पत्रकार हरवीर सिंह उपस्थित होते.

ज्येष्ठ पत्रकार ताहिर अझीम, डॉ. आस्था अग्रवाल, अध्यक्षा, नगर परिषद, पिलीभीत आणि डॉ. शेख जहूर अहमद (जम्मू आणि काश्मीर) यांनी व्यासपीठ सामायिक केले. परिसंवादा दरम्यान, वक्त्यांनी लोकशाहीमध्ये पत्रकारितेची भूमिका, त्याची आव्हाने आणि सामाजिक जबाबदाऱ्या यावर विशद केले. प्रमुख पाहुणे प्रा. के. पी. सिंह म्हणाले की पत्रकारिता ही लोकशाहीचा आत्मा आहे आणि पत्रकार समाजाला सत्य आणि निःपक्षपातीपणे मार्गदर्शन करण्याचे काम करतात. हरवीर सिंह म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात पत्रकारांना अनेक नवीन आव्हानांना तोंड द्यावे लागते, परंतु सत्य आणि जनहिताची वचनबद्धता ही पत्रकारितेची खरी ओळख आहे. ज्येष्ठ पत्रकार ताहिर अझीम म्हणाले की, पत्रकारांनी निर्भयपणे लोकांचा आवाज बनले पाहिजे. आपले विचार व्यक्त करताना राष्ट्रीय सरचिटणीस हरेंद्र चौधरी म्हणाले की, पत्रकार समाज आणि सरकारमधील पूल म्हणून काम करतात.

डॉ. आस्था अग्रवाल, त्यांच्या संघटनेत म्हणाल्या की, आज महिला प्रत्येक क्षेत्रात काम करत आहेत आणि महिला पत्रकार समाजात प्रेरणेचे प्रतीक बनत आहेत. जम्मू आणि काश्मीरहून आलेले डॉ. शेख झहूर अहमद म्हणाले की पत्रकारिता हा केवळ एक व्यवसाय नाही तर प्रत्येक नागरिकाच्या जीवनावर परिणाम करणारी सामाजिक जबाबदारी आहे. या परिसंवादाचा भाग म्हणून, संघटनेच्या मेरठ युनिटने राष्ट्रीय अध्यक्ष अनिल चौधरी यांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित केले आणि मनोज कलिना यांनी प्रमुख पाहुण्यांना चौधरी चरण सिंह यांचे चित्र भेट दिली. रोहतक, हरियाणा येथील ग्रामीण प्रादेशिक पत्रकार संघटनेचे समन्वयक राजकुमार नरवाल यांनीही परिसंवादाला आपला अभिनंदन संदेश पाठवला. त्यांच्या संदेशात, समन्वयक राजकुमार नरवाल यांनी सांगितले की, GAPA चा पाठिंबा भारतातील सर्व राज्यांमध्ये वेगाने विस्तारत आहे आणि GAPA लवकरच संपूर्ण हरियाणा राज्यात विस्तारला जाईल.

# राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या नेतृत्वाखाली
## सरपंच, उपसरपंचासह अनेकांनी केला शिवसेनेत प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १८ :

पक्ष संघटन मजबूत करणारा नेतृत्व कार्यकर्त्यांना आवडत असतो. याच स्वरूपाचे कार्य गेल्या अनेक वर्षांपासून रामटेक विधानसभा क्षेत्राचे आमदार तथा राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल करीत आहेत. हिच त्यांची कार्यशैली पाहता त्यांच्या नेतृत्वाखाली दि.१८ ऑक्टोबर २०२५ रोजी रामटेक तालुक्यातील आदिवासी बहुल भागातील लोकांनी शिवसेनेत प्रवेश केला.



यात ग्राम पंचायत पिंपरिया सरपंच प्रविण उइके, उपसरपंच भिमराव वाळके, सिल्लारी येथील चेतना धुर्वे, सोनम उइके, विमला पंधरे, सुलोचना टेकाम, गीता कोहळे, दुरपास धुर्वे, जितेंद्र इडपाची, प्रल्हाद कोडवते, योगेंद्र वाडिवे,पुसदा पुनर्वसन १,२ चे माजी सरपंच प्रदीप कोडवते, निकेश राऊत, वासुदेव उइके, लिलाधर खुरपे, केशवराव मेहर, कमलेश मरकाम, गणेश मेश्राम, खनोरा येथील युवराज खंडाते, सुरेंद्र सरियाम, अनिल भलावी, उमेश नैताम, रामकृष्ण खंडाते, वजाहत अली यांच्यासह शेकडो युवकांनी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते भगवे दुपट्टे घालून शिवसेनेत प्रवेश केला.

यावेळी राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले " शिवसेना पक्ष वाढविण्यासाठी मी व माझे सहकारी प्रयत्न करीत आहे. शिवसेना हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. आता मोठ्या प्रमाणामध्ये सामान्य माणसाला आपलं भविष्य आता शिवसेनेमध्ये दिसू लागलेले आहे. सर्वसामान्य माणसाला देखिल शिवसेनेमध्ये संधी मिळते.

माझ्यासारख्या एक सामान्य कार्यकर्त्याला शिवसेने पायदा आमदार आणि राज्यमंत्री देखील बनविले आहे. शिवसेनेच्या बळकटीकरणासाठी मी सदैव काम करीत आहे. शिवसेनेत येणाऱ्यांचे मी मनापासून स्वागत करतो आणि त्यांच्यामागे ताकदीने उभा आहे, शिवसेना नेते एकनाथ शिंदे उभे आहेत."

यावेळी शिवसेना रामटेक तालुका प्रमुख विवेक तुरक, उपतालुका प्रमुख देवानंद वंजारी, माजी पं. स. सभापती संजय नेवारे,माजी पं.स. सभापती चंद्रकांत कोडवते, वडंबा ग्राम पं. सरपंच मिथुन दुबे, बरघाट ग्राम पं. सरपंच देवराज इनवाते, दुर्गेश बरबटे,रोमित गुप्ता, युवासेना रामटेक तालुका संघटक आकाश पंधरे, विलास वाढीवे उपविभाग प्रमुख,युवासेना उपतालुका प्रमुख प्रतिक डोंगरे, विशाल वरठी, युवासेना विभाग प्रमुख एकनाथ गोडबोले, मनिष जोंजाळ यावेळी उपस्थित होते.

## हिंगण्यात स्वर मोहिनी दिवाळी पहाट

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १८ :

दिवाळीच्या मंगलमय वातावरणात आनंद, प्रकाश आणि संगीताचा उत्सव एकत्र आणणारी सुमधुर गीतांची दिवाळी पहाट -स्वर मोहिनी ही सांगीतिक मैफिल उद्या, रविवार दि. 19 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 6.00 वाजता, गुप्ताजी हॉटिलसमोर, रायपूर (हिंगणा) येथे यशवंतराव चव्हाण सेंटर, नागपूर, श्री संत गजानन महाराज शिक्षण संस्था, हिंगणा, व स्वरनाद संगीत कला अकॅडमी हिंगणा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे माजी मंत्री रमेशचंद्रजी बंग यांच्या शुभहस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष योगेश सातपुते कृ ऊ बा हिंगणा चे सभापती बबनराव आव्हाळे, हिंगणा खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष राजेंद्र गोटमारे, माजी जि प सदस्य दिनेश बंग, माजी प स सदस्य सुनील बोडाडे रायपूर ग्रामपंचायत चे उपसरपंच शिराज (बबलू) शेटे उपस्थित राहणार आहेत.

या स्वर मोहिनी दिवाळी पहाटेत सुरेल गीतांचे सादरीकरण, भावगीते, भक्तीगीते व गझलांचा बहारदार कार्यक्रम सादर केला जाणार आहे. संगीतप्रेमींनी या सांगीतिक सोहळ्यात सहभागी होऊन दिवाळीचा आनंद द्विगुणित करावा, असे आवाहन यशवंतराव चव्हाण सेंटर, नागपूरचे अध्यक्ष महेश बंग, सचिव कोमल ठाकरे, श्री संत गजानन महाराज शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष अरुणा बंग केले आहे.

## प्रतिबंधीत तंबाखू पान मसाल्याचा साठा जप्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभाग (एसएसबी)च्या पथकाने गोपनिय माहितीच्या आधारावर जरीपटका ठाण्यांतर्गत एका गोदामावर धाड टाकली. झडतीमध्ये मोठ्याप्रमाणात प्रतिबंधित तंबाखू आणि पान मसाल्याचा साठा मिळाला. पोलिसांनी माल जप्त करून गोदाम मालक ईश्वर पंजूमल बुधरानी याला अटक केली. बुधरानी हा स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता शासनाकडून प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आणि पानमसाल्याची विक्री करतो. जरीपटकाच्या चावला चौकात त्याचे पॅरागॉन नावाचे गोदाम आहे. या गोदामात तो मालाचा साठा करून ठेवतो. शुक्रवारी दुपारी २.३० वाजताच्या सुमारास एसएसबीचे पथक जरीपटका ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान बुधरानीने त्याच्या गोदामात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित वस्तूंचा साठा करून ठेवला असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर पथकाने बुधरानीच्या गोदामावर धाड टाकली. झडतीदरम्यान पोलिसांनी गोदामातून १ लाख २५ हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित माल जप्त केला. कारवाईची माहिती अन्न सुरक्षा विभागाला देण्यात आली.

## बाबाजीच्या जुगार अड्ड्यावर धाड

**१८ आरोपींना अटक**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गोपनिय माहितीच्या आधारावर शांतीनगर परिसरात सुरू असलेल्या बाबाजीच्या जुगार अड्ड्यावर धाड टाकली. यावेळी पोलिसांनी बाबाजीसह १८ जणांना जुगार खेळताना रंगेहात अटक केली.

अटकेतील आरोपींकडून रोकड व वाहनांसह एकूण ७ लाख ५८ हजार ३५० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. अशोक उर्फ बाबाजी चंपालाल यादव (रा. इतवारी रेल्वे स्टेशनजवळ), गणेश ज्ञानचंद नवेश (रा. टिमकी), सन्नी सुरेंद्र दिग्वा (रा. वैशालीनगर, पाचपावली), चेतन पुरुषोत्तम वानखेडे (रा. इतवारी), संतोष विनायक वेलतुरकर (रा. जुनी मंगळवारी), मोहम्मद रईस मोहम्मद युनुस (रा. नंदनवन), शुभम अशोक भईमारे (रा. कामठी), नितेश गेंदलाल सकेल (रा. स्वीपर कॉलनी, लकडगंज), रजत गुलाब सोरते (रा. गुजरी चौक, लकडगंज), किशोर प्रकाश सावलानी (रा. जरीपटका), सुनील दादू बिसेन (रा. रेणुका मातानगर, डुडेश्वर), धनराज राजकुमार कळसे (रा. भारतीय आखाड्याजवळ), नदीम अख्तर नसीम अख्तर (रा. तहसील), कफिल अहमद मुश्ताक अहमद (रा. मोमिनपुरा), अब्दुल लतिफ अब्दुल रज्जाक (रा. शांतीनगर), संदीप पुरुषोत्तम वर्मा (रा. बांगलादेश), अब्दुल फिरोज अजीज शेख (रा. दलालपुरा, शांतीनगर) आणि प्रमय दामोदर उमरेडकर (रा. जुनी मंगळवारी) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. अशोक यादव उर्फ बाबाजी हा अनेक वर्षांपासून परिसरात जुगार अड्डा चालवतो. यापूर्वीही अनेकदा पोलिसांनी त्याच्या अड्ड्यावर धाड टाकली आहे. त्याच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या १० गुन्ह्यांची नोंद आहे. त्याची लगाम कसण्यासाठी पोलिसांनी त्याला तडीपारही केले होते.

## विशेष मोहीम ५.० अंतर्गत डब्लूसीएलचे १००% लक्ष्य साध्य



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने विशेष मोहीम ५.० (२ ते ३१ ऑक्टोबर २०२५) दरम्यान सर्व स्वच्छता आणि कार्यक्षमता लक्ष्यांपैकी १००% लक्ष्ये साध्य केली आहेत. या मोहिमेदरम्यान, सुमारे ५.६९ लाख चौ.क्षेत्र व्यापणाऱ्या २५७ ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. याव्यतिरिक्त,२२३ मेट्रिक टन भंगार साहित्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली, ज्यामुळे पुनर्वापर आणि पुनर्वापराद्वारे १.४३ कोटींचे उत्पन्न मिळाले. या कामगिरीतू डब्लूसीएलची कार्यक्षमता आणि पर्यावरणीय जबाबदारीसाठीची दृढ वचनबद्धता दिसून येते. टाकून दिलेल्या लोखंडी आणि स्टील फर्निचरपासून ई-कचरा संकलन कियॉस्क बांधण्यात आले, जबाबदार पुनर्वापर आणि वतुर्ळाकार अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन दिले. त्याचप्रमाणे, कर्मचारी मुलांसाठी "ई-कचरा ते कला" कार्यशाळेत सर्जनशीलता, पर्यावरणीय जागरूकता आणि शाश्वतता वाढवली गेली. डब्लू सी एल क्षेत्रांमध्ये जैव-शौचालये बसवण्यात आली, ज्यामुळे स्वच्छता आणि स्वच्छतेच्या मानकांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली. या संदर्भात, "सफाई मित्र शिबिर " आयोजित करण्यात आली, जिथे १,२५० हून अधिक कंत्राटी कामगार आणि घरकाम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.


**Change Of Name**

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **K3568001**. MY OLD NAME WAS **ABDUL HAFIZ ABDUL QADER**. NOW MY NEW NAME IS **M A KADER PATEL.**
**ADD :** PLOT NO 46A MENA PATEL MAZIL1 FLOOR CA ROAD GANDHIBAGH NAGPUR 440002

MY OLD NAME WAS **BHEJAN PURANLAL GAUTAM.** NOW MY NEW NAME IS **BHEJANLAL PURANLAL GAUTAM.**
**ADD :** PLOT NO.50, KRITIDHAR SOCIETY SUMAN NAGRI ROAD GODHANI RAILWAY NAGPUR - 441123

MY OLD PASSPORT NO, M1180658. MY OLD NAME WAS **SANJEED SAYEED AHMAD.** NOW MY NEW NAME IS **SANJEED AHMAD SAYEED AHMAD.**
**ADD :** FLAT NO, 404 RUIKAR ROAD BHALDARPURA NAGPUR 440018

I HEREBY DECLARE THAT MY OLD NAME WAS **HEENA PARVIN MEMAN** AND I HAVED CHANGED MY NAME AS **HEENA MOHAMMAD AZHAR SHEIKH.**
**ADD :** 23, KTS HOSPITAL ROAD, NEAR GORELSL CHOWK, LAKSHMI BAI WARD, GONDIA - 441601

MY OLD NAME WAS **SEEMA PRABHAKARRAO UMALKAR.** NOW MY NEW NAME IS **ANURADHA SANJAYRAO GHAROTE.**
**ADD :** SANJIVANI SCHOOL, VANASHRI VASAHAT, AT-NAVEGAON POST-MUDZA, TAH - DIST - GADCHIROLI – PIN - 442605


## ऑरेंज सिटी फोटोग्राफर्स क्लबची अनाथ मुलांसोबत दिवाळी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

ऑरेंज सिटी फोटोग्राफर्स क्लबचे "व्यक्ति, व्यवसाय, कला आणि सेवा" हे औचित्य साधुन ऑरेंज सिटी फोटोग्राफर्स क्लबने दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर नागपू श्री जलाराम मंदिर येथील आणि पंचवटी वृद्धाश्रमात मुले आणि वृद्धांसोबत दिवाळी साजरी केली. याप्रसंगी क्लबचे संस्थापक अध्यक्ष नाना नायक, संयोजक चेतन जोशी, माजी अध्यक्ष रमाकांत झाडे, राजन गुप्ता, दिनेश मेहेर, नवनिर्वाचित अध्यक्ष महेश काळपांडे, सचिव नरेश नेरकर, कोषाध्यक्ष नितेश बहे, जयेश वासनी, अनिल कोटपल्लीवार, प्रशांत जैन, दीपक काळपांडे, श्री. आणि श्रीमती जयंत फाले, अजय भांगे, दीपक चीमंतराव आणि विकास शेंडे यांचा समावेश होता. दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर, सर्व माजी अध्यक्षांनी शुभेच्छा दिल्या आणि मुले आणि वृद्धांना भेटून आनंद व्यक्त केला. अध्यक्ष महेश काळपांडे यांनी दिवाळीच्या पाच दिवसांचे महत्त्व सांगितले आणि क्लबच्या कार्यक्रमांची माहिती दिली. माजी अध्यक्ष राजन गुप्ता यांनी सर्व मुलांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आणि म्हणाले, "तुमच्यासोबत दिवाळी साजरी करताना आम्हाला आनंद होत आहे." जीवन आश्रय सेवा संस्थेचे विकास शेंडे यांनी संस्थेची ओळख करून देत क्लबने संस्थेला अन्नधान्यासह विविध आवश्यक वस्तू दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. श्री जलाराम सत्संग मंडळाचे अध्यक्ष अजय लखानी आणि सभापति नरेंद्र देवडा यांना दरिद्र नारायण भोजन तिथीरशी भेटही दिली आणि पंचवटी वृद्ध आश्रमात वृद्ध महिलांसोबत जेवणाचा आनंद घेतला. ऑरेंज सिटी फोटोग्राफर्स क्लबचे सदस्य धनजीभाई पटेल, प्राची आणि विशाल पोपट यांनी दिवंगत हसमुख सगलानी आणि दिवंगत मुकेश पोपट यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ योगदान दिले.




**शेतजमीन विक्री चे टोकनपत्र / पावती**

मौजा रुयाड प.ह.न. क्र ५१ ता. कुही, जि.नागपूर
सौदा प्रति एकर रु. ३२३१०००/-प्रमाणे
टोकन पत्र लिहून घेणार : श्री नेकराम लखनलाल पटले वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. तरोडी (नागपूर)
टोकन पत्र लिहून देणार : श्रीमती चंद्रकांता विष्णूजी मदनकर, धंदा शेती, रा. कामठी
मी लिहून देणार तुम्हाला म्हणजे लिहून घेणार यांना शेती विक्रीच्या टोकनपत्र / पावती लिहून देतो की खालील दर्शवलेली शेती माझे मालकी हक्काची व कब्जेवहीवाटीची आहे.
खास मौजा - रुयाड, प.ह.न. ५१, तह - कुही, जि. नागपूर येथील सर्वे क्रमांक १३७ आ.हे.आर ७२ जमा १.३६ हक्क वर्ग १
याप्रमाणे माझी शेतजमीन असून सदर शेत जमीन मी आपणास रुपये ३२३१०००/- (अक्षरी बत्तीस लाख एकतीस हजार)प्रति एकर विकण्याच्या पक्का करार केला असून दिनांक १६/१०/२०२५ रोजी करार प्रमाणे टोकन पावती दखल रुपये ३१०००/- (अक्षरी एकतीस हजार रुपये) नगदी आपणाकडून भरून पावलो आहे. त्यानंतर दिनांक ३०/१०/२०२५ रोजीचे आत आपणास रीतसर बिसारपत्र / विक्रीपत्र करून देईल. कोणतीही टळाटळ करणार नाही. करीता हे रक्कम मिळाल्याचे टोकनपत्र / पावती लिहून दिली आहे.

दिनांक : १६/१०/२०२५
टोकनपत्र लिहून देणार
श्रीमती चंद्रकांत विष्णूजी मदनकर
टोकनपत्र लिहून घेणार
श्री. नेकराम लखनलाल पटले



**जाहिरनामा / सायटेशन नोटीस**

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश क- स्तर कामठी यांचे न्यायालयात**

एम.जे.सी. क्र. ६३/२०२५ — प्रोसेस क्र. १४२३/२०२५
पे.ता. २८-१०-२०२५ — दिनांक १८/१०/२०२५

Applicants : 1) Kamlesh s/o Kewalram Bhoyar, Aged 32 years, Occu. Private, R/o. Dighori Kale, Ward No.1, Tah. Kamptee Dist. Nagpur. Addhar No. 9339 9964 6321, 2) Bhagwan s/o. Kewalram Bhoyar, AGe4d 22 years, Occu. Private, R/o. R/o. Dighori Kale, Ward No.1, Tah. Kamptee Dist. Nagpur. Addhar No. 2043 9672 3361 3) Kewalram s/o. Ramaji Bhoyar, Aged 59 years, Occu. Private, R/o. Dighori Kale, Ward No. 1, Tah. Kamptee, Dist. Nagpur. Addhar No. 3003 9792 5552
V/s...
Non Applicant : NIL

सदरहू अर्जदारांने वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Late Shalu w/o Kewalram Bhoyar, मयत दि. २५/०३/२०२४ at Dighori Kale, Ward No. 1, Tah. Kamptee Distt. Nagpur. यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर कामठी यांनी दि. २८/१०/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजत ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार कळवाव्या आणि ह्या लेखपरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य त कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारास Late Shalu w/o Kewalram Bhoyar, मयत दि. २५/०३/२०२४ at Dighori Kale, Ward No. 1, Tah. Kamptee Distt. Nagpur. यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
आज दि. / /२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी



**जाहिरनामा / सायटेशन नोटीस**

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश क- स्तर कामठी यांचे न्यायालयात**

एम.जे.सी. क्र. ८८/२०२५ — प्रोसेस क्र. १३०६/२०२५
पे.ता. ११-११-२०२५ — दिनांक ०७/१०/२०२५

अर्जदार : १. ममला जिवन रडके, २. अनुराम जिवन रडके, ३ . संकेत जिवन रडके, सर्व रा. हनुमान मंदिर जवळ, अजनी, कामठी, ता. कामठी, जि. नागपूर
विरुध्द
गैरअर्जदार कोणीही नाही
मयतदार : जिवन शंकरराव रडके, मयत दि. ०७/०८/२०२५

सदरहु अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे १८२७ कलम ८ प्रमाणे या न्यायालयात मयतदार जिवन शंकरराव रडके, मयत दि. ०७/०८/२०२५, रा. रा. हनुमान मंदिर जवळ, अजनी, कामठी, ता. कामठी, जि. नागपूर यांचे वारसान सर्टीफिकेट मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार मयताचे वारसान नव्हे, असा कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा, जर सदरहू मुदतीत सर्व संबंधित नातेवाईकांना व आम जनतेकडून योग्य ती हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास सदरहु न्यायालय अर्जदार यांचा सदरहु मयतदार जिवन शंकरराव रडके, मयत दि. ०७/०८/२०२५, रा. रा. हनुमान मंदिर जवळ, अजनी, कामठी, ता. कामठी, जि. नागपूर ह्यांचे त्यांना वारसान प्रमाणपत्र देण्यात देईल.
आज दिनांक ०७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी



**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com — दुरध्वनी क्र. ०७१२-२५६११६५

क.ली./प्रस्तु-२/तह.नाग (शहर)/कावि-६१२/२०२५ — दिनांक : १२/०९/२०२५
वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. विनोद नत्थुजी राऊत, रा. भांडारकर लेआऊट, उमरेड, रोड, जि. नागपर यांचा अर्ज दिनांक १२/०९/२०२५

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार विनोद नत्थुजी राऊत, रा. भांडारकर लेआऊट, उमरेड, रोड, जि. नागपर यांनी मुलाच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.
सदरहू नयन विनोद राऊत यांचा जन्म दिनांक २७/०२/२००८ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर रुग्णालय नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.
त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.
उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com — दुरध्वनी क्र. ०७१२-२५६११६५

क.ली./प्रस्तु-२/तह.नाग (शहर)/कावि-५९३/२०२५ — दिनांक : ११/०९/२०२५
वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. खुशबू किशोर वासनिक रा. पिवळी नदी, भन्ते आनंद कौशल्या नगर, नागपूर यांचा अर्ज दिनांक २९/०८/२०२५

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार खुशबू किशोर वासनिक रा. पिवळी नदी, भन्ते आनंद कौशल्या नगर, नागपूर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.
सदरहू सुमेरा खुशबू किशोर वासनिक यांचा जन्म दिनांक ३१/१२/१९९८ रोजी पिवळी नदी, भन्ते आनंद कौशल्या नगर, नागपूर राहत्या घरी झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.
त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.
उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com — दुरध्वनी क्र. ०७१२-२५६११६५

क.ली./प्रस्तु-२/तह.नाग (शहर) कावि-६५४/२०२५ — दिनांक :०८/१०/२०२५
वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. राधा दशरथ मंदुरकार रा. नारी वस्ती वार्ड नं.२ उप्पलवाडी, नागपूर यांचा अर्ज दिनांक १२/०९/२०२५

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार राधा दशरथ मंदुरकार रा. नारी वस्ती वार्ड नं.२ उप्पलवाडी, नागपूर यांनी त्यांचे सासरे यांच्या मृत्यूची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.
सदरहू श्री गोमा नामा मंदुरकार यांचा मृत्यु दिनांक ०५/११/१९७२ रोजी राहत्या घरी नारी वस्ती वार्ड नं. २, उप्पलवाडी, नागपूर येथे झालेला आहे. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्युचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.
त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.
उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com — दुरध्वनी क्र. ०७१२-२५६११६५

क.ली./प्रस्तु-२/तह.नाग (शहर) कावि-६८६/२०२५ — दिनांक :०८/१०/२०२५
वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. दिलीप मोरबाजी केळवद रा. लालगंज केळवदकर मोहल्ला, नागपूर यांचा अर्ज दिनांक १२/०९/२०२५

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार श्री. दिलीप मोरबाजी केळवद रा. लालगंज केळवदकर मोहल्ला, नागपूर यांनी त्यांचे वडिलांचे भाऊ यांच्या मृत्यूची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.
सदरहू विठोबा गंगाधर केळवदकर यांचा मृत्यु दि. १५/११/२००७ रोजी राहत्या घरी लालगंज केळवदकर मोहल्ला, नागपूर येथे झालेला आहे. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्युचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.
त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.
उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com — दुरध्वनी क्र. ०७१२-२५६११६५

क.ली./प्रस्तु-२/तह.नाग (शहर) कावि-६२५/२०२५ — दिनांक : २९/०९/२०२५
वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. निलम रवींद्र मडावी रा. कुरखेडा जि. गडचिरोली, नागपूर यांचा अर्ज दिनांक १२/०९/२०२५

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार निलम रवींद्र मडावी रा. कुरखेडा जि. गडचिरोली, नागपूर यांनी त्यांची बहीण यांच्या मृत्यूची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.
सदरहू रेशमा रवींद्र मडावी यांचा मृत्यु दिनांक ०७/०९/२०१७ रोजी मेडीकल हॉस्पीटल ॲण्ड कॉलेज नागपूर येथे झालेला आहे. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्युचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.
त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.
उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



RNINO-20789/71 | Mahasagar Nagpur | Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Tekdi Road, Sitabuldi, Nagpur. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Main office phone numbers:** 7447735851/9922970023/7447735853.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक २०७८९/१९७१ | महासागर नागपूर | **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, टेकडी रोड, सिताबर्डी, नागपूर, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**फोन : ७४४७७३५८५१, ७४४७७३५८५३**

# भक्तिमार्ग

**सर्वत्र हर्षोल्हासात आणि तितक्याच भक्तीभावाने साजरा होणारा सण म्हणजे दिवाळी. लहान-थोर, गरीब-श्रीमंत सारेच या उत्सवाचा आपापल्या परीने आनंद लुटतात. दिवाळीतील प्रत्येक दिवसाचं स्वत:चं असं महत्त्व आहे. त्याच्याशी निगडीत अनेक कथा पुराणांमध्ये पहायला मिळतात. त्यावरून या दिवसांचं महत्त्व समजून घेणं आणि ते मनापासून आनंदानं, श्रध्देनं आणि बंधूभावानं साजरे करण्यातच साऱ्यांचं हीत आहे.**

## आली दिवाळी...

भक्ती विशेष

दिवाळी हा आपल्या संस्कृतीतील एक महत्त्वाचा सण. लहान-थोर, गरीब-श्रीमंत सारेजण हा सण अतिशय आनंदात आणि समाधानात साजरा करतात. प्रत्येकाच्या जीवनात आनंद आणि समाधान घेऊन येणारा हा सण. साऱ्यांचं आयुष्य प्रकाशमान करणारा हा सण. त्यामुळेच या सणाची लगबग मोठी असते. खरेदीचा उत्साह दांडगा असतो. या दिवसात बाजारपेठेतील उलाढालही मोठी असते. सर्वत्र चैतन्य, उत्साह भरून राहिलेला असतो. दिवाळीतील प्रत्येक दिवसाचं स्वत:चं असं महत्त्व आहे. त्याच्याशी निगडीत अनेक कथा वाचायला, ऐकायला मिळतात. त्यामुळे या दिवसात श्रध्दा आणि भक्तीभाव मनी बाळगला जातो. दिवाळीच्या सणाची सुरूवात वसुबारसेनं होते. आपल्या संस्कृतीत गाईला देवतासमान समजलं जातं. गाईच्या पोटात सर्व देवांचा वास असतो ही वरकरणी अतिशयोक्तीपूर्ण संकल्पना वाटत असली तरी त्यातील प्रतीकात्मकता लक्षात घेणं गरजेचं आहे. गाईच्या दुधाला अमृतासमान समजलं जातं. यातील औषधी तत्त्वांचा लाभ मिळाल्यास मानवी शरीराचं उत्तम भरणपोषण होतं. शिवाय शरीर दीर्घकाळ व्याधीमुक्त राहतं. त्यामुळेच गाईला मातेचा दर्जा देण्यात आला आहे. अशा या मातेला वंदन करण्याची, तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी आपण साधतो ते वसुबारसेच्या निमित्ताने. या दिवशी सायंकाळी सवाष्णी गोधनाची पूजा करतात. सवत्स धेनूची पूजा करुन तिच्या मुखी गोड घास देतात आणि दारी आलेल्या नवपर्वाचं स्वागत करतात. फार पूर्वीपासून गाय माणसाच्या जीवनाचा हिस्सा आहे. पूर्वी घरामागचा गोठा किती समृद्ध आहे यावर त्या व्यक्तीची प्रतिष्ठा ठरत असे. शेतीप्रधान संस्कृतीत गाय अत्यंत उपयुक्त आहे. एक ना अनेक लाभांमुळेच आपल्यासाठी गाय केवळ पशू रहात नसून देवतास्वरुप बनते. गो-पालनाने चित्तवृत्ती प्रफुल्लीत राहून वैभव प्राप्त होते. त्यामुळे हा दिवस विशेष महत्त्वाचा आहे.

दिवाळीतील आणखी एक महत्त्वाचा दिवस म्हणजे धनत्रयोदशी. या दिवशी दीपप्रज्वलन करून घराची आणि दुकानाची सजावट करतात. मंदिर, गो-शाळा, घाट, विहीर आदी ठिकाणी दीपप्रज्वलन करुन आसमंत उजळून टाकला जातो. या प्रसंगी तांबे, पितळ, चांदी अशा धातूंची खरेदी शुभ मानली जाते. दीपप्रज्वलन करुन पूजाविधीला आरंभ होतो. धनत्रयोदशीला सर्वप्रथम कुबेराचे पूजन होते. कुबेर हा देवांचा सावकार. पूजनाने प्रसन्न होऊन आपले घरदारही त्याच्या कृपादृष्टीखाली राहावे ही या पूजेमागची भावना आहे. व्यवसायाच्या ठिकाणी नवीन वस्त्र आणून त्या ठिकाणी कुबेराच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना केली जाते. घरातदेखील कुबेराची प्रतिमा पूजली जाते. चंदन, धुप, दीप, नैवेद्य दाखवून कुबेराची यथासांग पूजा करतात. नंतर कापूर आरती करून, फुले अर्पण करून मनोभावे प्रार्थना केली जाते. याच संध्याकाळी यमराज पूजन आणि यमदीपदान हे विधी पार पडतात. यासाठी घरातील स्त्री एका पात्रामध्ये तिळाच्या तेलाचे दिवे लावते. या दिव्यांची पूजा केली जाते. दक्षिणेकडे तोंड करून यमाची प्रार्थना केली जाते. त्यानंतर हे सर्व दिवे सार्वजनिक ठिकाणी ठेवले जातात. त्यापैकी एक दिवा दाराच्या उंबरठ्यावरती अखंड तेवत ठेवला जातो. असे केल्याने यमाच्या पाशातून आणि नरकातून मुक्ती मिळते असा समज आहे. यमासाठी पिठाचा दिवा बनवून घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर



लावला जातो. या दिव्याची देखील तांदूळ, गूळ, पाणी, फुले, नैवेद्यासह पूजा केली जाते. यमराज-पूजनाने अकाली मृत्यूदोष आणि पिडा टळते. या दिवशीचा मुख्य नैवेद्य धने आणि गुळाचा असतो. आरोग्य हीच खरी माणसाची संपत्ती असते. त्यामुळे या प्रकाश पर्वाची सुरूवात करताना उत्तम आरोग्याची कामना आणि सुदृढ राहून मार्गक्रमणा या दृष्टीने या उपचारांकडे पहायला हवे.

दिवाळीत नरक चतुर्दशीला अभ्यंगस्नानाचं महत्त्व मोठं आहे. हा दिवस नरकासुराच्या वधाचा आनंदोत्सव म्हणून साजरा होतो. या दिवशी सुर्योदयापूर्वी स्नान केल्यास अपमृत्यू आणि दुर्दैवापासून सुटका होते असा समज असल्याने अभ्यंगस्नानाला सुरुवात केली जाते. अभ्यंग स्नानानंतर देवदर्शन शुभ मानलं जातं. नरक चतुर्दशीच्या दिवशी अलक्ष्मीचे मर्दन करून, आपल्यातील नरकरूपी पापवासनांचा नायनाट करून, अहंकाराचे उच्चाटन करून शुचिर्भूत व्हायचे असते.

दिवाळीतील लक्ष्मीपूजनाचा थाटही काही वेगळाच असतो. घरामध्ये लक्ष्मीचा वास असावा अशी प्रत्येकाची मनीषा असते. लक्ष्मीचा वास म्हणजेच सुख आणि समाधानाचा वास. लक्ष्मी अनेक रूपानं घरात वास करत असते. धनलक्ष्मी असते, भाग्यलक्ष्मी असते, गृहलक्ष्मी असते. लक्ष्मीच्या सर्व रुपांचा संचार असल्यास घरात स्वर्ग निर्माण होणे काहीच अवघड नाही. या लक्ष्मीचं पूजन करुन वास्तूत तिचा नित्य वास रहावा अशी कामना करण्याचा दिवस म्हणजे लक्ष्मीपूजनाचा दिवस. खरं तर शुभ कार्यासाठी अमावस्या हा दिवस वर्ज्य मानतात. पण आश्विन अमावस्येचा अपवाद आहे. कारण ही अमावस्या शुभ फलदायी आहे. शिवाय ती चंचल असणाऱ्या लक्ष्मीला स्थिर करणारी आहे. म्हणून स्थिर लग्नावर लक्ष्मीचं पूजन केलं जातं. आज लक्ष्मीला अर्थात चलनाला आलेलं महत्त्व सर्वांना ठाऊक आहेच. आज सर्वजण धावतात ते या लक्ष्मीच्या प्राप्तीसाठी. म्हणूनच या दिवसाला विशेष महत्त्व आहे. या दिवशी अनेक घरामध्ये श्रीसुक्ताचं पठण केलं जाते. हा दिवस व्यापारी लोकांसाठी विशेष महत्त्वाचा आहे. व्यवसायाच्या ठिकाणी वह्यांची पूजा करणे, चोपड्यांची खरेदी, मौल्यवान वस्तूंची पूजा या माध्यमातून ही पूजा साजरी होते. या मंगल दिवशी सोनेखरेदीस प्राधान्य दिले जाते तसेच घरातल्या पारंपरिक दागिन्यांची आणि रोख रकमेची पूजा केली जाते. जमा खर्चाच्या वह्यांचेही पूजन होते. पूजाविधी गोरज मुहुर्तावर संपन्न होतो. सायंकाळी नवीन वस्त्रावर रांगोळी रेखून तबक ठेवले जाते. त्यात सोन्याचे दागिने, चांदीचा रुपया, मिळकतीची कागदपत्रे, खतावण्या, वह्या, बँक पासबूक आदी ठेवले जाते. या सर्वांची फुले, फळे, हळद-कुंकू, नैवेद्य, अक्षता आदींद्वारे विधीवत पूजा केली जाते. देवीला प्रसन्न करण्यासाठी पक्वानांचा नैवेद्य दाखवला जातो. साळीच्या लाह्या, बत्तासे, अनारसे, डाळींबाचे दाणे, पंचामृत अशा पारंपरिक पदार्थांनी देवीला तुष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो. या दिवशी लक्ष्मीबरोबरच घरातील केरसुणीलाही पूजेचा मान असतो. घर स्वच्छ करणारी केरसुणी उत्सवमूर्ती असते. तिची देखील पाणी, हळद-कुंकु, फुले, हार आदींनी पूजा केली जाते आणि नंतरच तिचा वापर करणे सुरू होते. लक्ष्मीबरोबरच कुबेराचेही पूजन केले जाते. कुबेर हा देवांचा सावकार. साक्षात देवाचा सावकार प्रसन्न झाला मग काय विचारता? याच भावनेने कुबेराची पूजा करतात. काही ठिकाणी ऊस ठेवून पूजा केली जाते. या दिवशी फटाक्यांची आतषबाजी परमोच बिंदू गाठते.

दिवाळीत पाडवा हा असाच महत्त्वपूर्ण दिवस आहे. बलिप्रतिप्रदा म्हणूनही तो ओळखला जातो. पती-पत्नीमधील प्रेमाचं प्रतीक असणाऱ्या या दिवसाप्रती अनेक पुराणकथाही ऐकायला मिळतात. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असणाऱ्या या दिवशी कुठलंही काम शुभफलदायीचं होतं. या दिवशी सोने खरेदीला उधाण येतं. पती-पत्नीमधील हळूवार संबंधांच्या दृष्टीनेही हा दिवस अत्यंत महत्त्वाचा असतो. पहिला दिवाळसण असणाऱ्यांकडे सर्व नातलगांना बोलवून समारंभ केला जातो. देवाला सुग्रास नैवेद्य दाखवला जातो. संध्याकाळी पत्नी पतीस औक्षण करते. पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते. पती पत्नीस ओवळणी म्हणून यथाशक्ती भेट देतो. अशा प्रकारे अंध:कारावर प्रकाशाची मात या तत्त्वाला अनुसरून पाडवा उत्साहात साजरा केला जातो.

## आर्चनभक्ती

दासबोधातून...

नवविधाभक्तीच्या विविध रूपांचं वर्णन समर्थ रामदास करत आहेत. चौथ्या दशकातल्या पाचव्या समासात त्यांनी आर्चनभक्ती निरूपण केलं आहे. ते म्हणतात, पाचवी भक्ती ते आर्चन। आर्चन म्हणिजे देवतार्चन। शास्त्रोक्त पूजाविधान केले पाहिजे।।२।। नाना आसने उपकर्णे। वस्त्रे आळंकार भूषणे। मानसपूजा मूर्तीध्याने। या नाव पाचवी भक्ती।।३।। देवब्राह्मण अग्नीपूजन। साधुसंत अतीतपूजन। इति महानुभाव गाइत्रीपूजन। या नाव पाचवी भक्ती।। ४।। धातुपाषाण मृत्तिकापूजन। चित्रलेप सत्पात्रपूजन। आपले गृहीचे देवतार्चन। या नाव पाचवी भक्ती।।५।।

आर्चन ही नवविधाभक्तींमधली पाचवी भक्ती. आर्चन म्हणजे देवतार्चन करणं. आर्चन म्हणजे पूजा. ही



पूजा शास्त्रोक्त पद्धतीने, यथासांग व्हायला हवी. नाना प्रकारची आसनं, पूजेची उपकरणं, वस्त्रं, अलंकार, आभूषणं यांनी पूजा करावी. आपल्या आवडत्या दैवताच्या मूर्तीचे ध्यान करून मानसपूजा करावी. ही पाचवी भक्ती होय. देव, ब्राह्मण, साधूसंत, अतिथी, अभ्यागत यांचं पूजन तसंच ब्रह्मज्ञानी, संत, गाय यांचं पूजनही करायला हवं. यालाही पाचवी भक्ती म्हटलं जातं. धातू, पाषाण, माती यांच्या मूर्ती तसंच तसबिरी, ग्रंथ, चित्र काढलेल्या उपासना मूर्ती यांची पूजा करावी. तसंच आपल्या घरातल्या देवाचीही पूजा करावी. याला पाचवी भक्ती म्हणतात.

समर्थ पुढच्या श्लोकांमध्ये सांगतात,

सीळा सप्तांकित नवांकित। शालिग्राम शकले चक्रांकित। लिंगें सूर्यकांत सोमकांत। बाळ तांदळे नर्बदे।।६।। भैरव भगवती मल्लारी। मुंज्या नृसिंह बनशंकरी। नाग नाणी नानापरी। पंचायेत्न पूजा।।७।। गणेशशारदा विठ्ठलमूर्ती। रंगनाथ जगन्नाथ तांडवमूर्ती। श्रीरंगहनुमंत गरूडमूर्ती। देवतार्चनी पूजव्या।।८।।

सात किंवा नऊ शुभचिन्हं असलेले दगड, शाळीग्राम, चक्रांकित दगडाचे तुकडे, शिवलिंग, सूर्यकांत, चंद्रकांत, तांदळे आणि नर्मदेतले गोटे तसंच भैरव, भगवती म्हणजे देवी, मल्हारी, मुंज्या, नृसिंह, बनशंकरी, नाग, निनिराळ्या देवतांचे छाप असलेली नाणी, पंचयेतन म्हणजे गणेश, सूर्य, शक्ती, शिव आणि मित्र या पाच मुख्य देवतांची पूजा ही आर्चन भक्ती होय. गणेशशारदा, विठ्ठल यांच्या मूर्ती तसंच रंगनाथ, जगन्नाथ, नटराज यांच्या मूर्ती, श्रीरंग, हनुमंत, गरूड यांच्या मूर्तींचं पूजन करावं.

## क्रोध दूर ठेवायचा तर...

उपदेश

गौतम बुद्ध हे बौद्ध धर्माचे संस्थापक. बौद्ध हा जगातल्या प्रमुख धर्मांपैकी एक. या धर्माचे अनुयायी जगभरात पसरले आहेत. बौद्ध धर्माचा उगम भारतात झाला. बुद्धाने जगाला शांतता, प्रेम, करूणा यांचा संदेश दिला, अहिंसेचं तत्त्वज्ञान सांगितलं. राग, लोभ यापासून लांब रहायला सांगितलं. क्रोध म्हणजे राग हा माणसाचा शत्रू मानला जातो. क्रोधामुळे माणसाचं काय नुकसान होतं हे बुद्धाने सांगितलं आहे. बुद्धाचा हा उपदेश समजून घेतला तर क्रोध दूर ठेवणं आणि आनंदी जीवन जगणं सोपं होईल.

* बुद्ध म्हणतात, तुम्हाला रागामुळे शिक्षा भोगावी लागत नाही तर तुमचा राग हीच तुम्हाला मिळणारी शिक्षा आहे.

* भूतकाळात अडकून पडू नका. भविष्याचा फार विचार करू नका. वर्तमानावर लक्ष केंद्रित करा. सुखी राहण्याचा हा एकमेव मार्ग आहे.

* हजारो युद्धं जिंकण्यापेक्षा स्वत:वर विजय मिळवण्याचा प्रयत्न करा. एवढं केलं की तुमचा विजय ठरलेला आहे. हा विजय कोणीही हिरावून घेऊ शकत नाही.

* घृणा म्हणजे वाईट वृत्ती. घृणा संपवू शकत नाही. घृणेवर प्रेमाने विजय मिळवता येतो. हेच शाश्वत सत्य आहे.

* सत्याच्या मार्गावरून चालणाऱ्या व्यक्तीकडून फक्त दोन चुका होऊ शकतात. एक म्हणजे हा मार्ग अर्धवट सोडणं किंवा मार्गावर चालण्याची सुरूवात न करणं.

* सूर्य, चंद्र आणि सत्य कधीही लपून राहू शकत नाही.

* एका दिव्याने अनेक दिवे पेटवता येतात. असं केल्याने त्या दिव्याचा प्रकार तसूभरही कमी होत नाही. याच पद्धतीने आनंद वाटल्याने वाढतो, द्विगुणित होतो. त्यामुळे आनंद वाटत चला.

* क्रोध सर्वात आधी तुम्हाला जाळतो. क्रोध एखाद्या पेटत्या कोळशाप्रमाणे आहे. क्रोधाच्या आगीत माणूस स्वत:च भस्मसात होतो.



## मंत्र संपन्नतेचे...

मंत्रजागर

देवी लक्ष्मीची कृपा आपल्यावर कायम रहावी, असं प्रत्येकाला वाटत असतं. देवी लक्ष्मी म्हणजे संपत्ती, संपन्नतेचं प्रतिक. लक्ष्मीचा आशीर्वाद लाभला की आयुष्यात सगळं कसं अगदी छान होतं. लक्ष्मीला प्रसन्न करून घेण्याचे काही मंत्र आहेत. प्रत्येक मंत्राचं वेगळं महत्त्व आहे. लक्ष्मीच्या या बहुविध मंत्रांविषयी...

* लक्ष्मी मंत्रांना सिद्धी मंत्र असंही म्हटलं जातं. प्रत्येक मंत्रामध्ये देवीची ऊर्जा आणि शक्ती यांचा वास असतो. म्हणूनच भक्तांना या मंत्रपठणाचे लाभ होत असतात. समर्पित भावना आणि भक्तीभावाने त्यांचं पठण केलं तर भाविकांना सकारात्मक अनुभव येतात. या मंत्रांच्या पठणाने समस्यांचं निराकरण होतं. आयुष्यात यश मिळतं.

* आर्थिक लाभ मिळवण्यासाठी ङ्खओम श्रीम महालक्ष्मै नम:ङ्ख या मंत्राचं पठण करावं.

* संपन्नता लाभण्यासाठी ङ्खओम न्हिम श्रीम क्लिम महालक्ष्मी नम:ङ्ख या मंत्राचा जप करायला हवा.

* आयुष्यात आनंद मिळवायचा असेल तर ङ्खओम श्रीम श्री ऐ नम:ङ्ख या मंत्राचा जागर करावा.

* अध्यात्मिक उन्नती करून घ्यायची असेल तर ङ्खओम महादेवीच विद्यहे, विष्णूपत्नीचं धीमही, तन्नो लक्ष्मी प्रचोदयातङ्ख या मंत्राचं पठण करावं.

* देवी लक्ष्मीचे मंत्र इतर देवतांच्या तुलनेत म्हणायला बरेच सोपे असतात. तसंच या मंत्रांचे सकारात्मक लाभही लवकर मिळतात. या मंत्रांचं पठण करताना मांडी घालून बसा. डोळे उघडे किंवा बंद ठेवा.




सोयीनुसार या मंत्रांचं पठण करा. हे मंत्र मोठ्याने किंवा मनातल्या मनातही म्हणता येतील.

* मंत्रांचे लाभ मिळवण्यासाठी नियमितपणे पठण करायला हवा. दिवसातून १०८ वेळा मंत्रांचं पठण करण्याचा नेम पाळायला हवा.

* मंत्र म्हणताना पूर्वेकडे तोंड करून बसा. १०८ वेळा मंत्रांचं पठण करा. लक्ष्मीची मूर्ती किंवा फोटोला कमळ अर्पण करता येईल. मंत्रपठण झाल्यावर डोळे बंद करून शांत बसा. आजवर केलेल्या कृपेबद्दल लक्ष्मीला धन्यवाद द्या.



## देवी चिंतपूर्णी

तीर्थक्षेत्र

भारतातल्या देवीच्या ५१ शक्तीपीठांपैकी एक म्हणजे चिंतपूर्णी देवी मंदिर. हे मंदिर हिमाचल प्रदेशमधल्या उना जिल्ह्यातल्या चिंतपूर्णी येथे आहे. या मंदिराच्या उत्तरेला हिमालय पर्वत तर पूर्वेला शिवालिक पर्वतरांगा आहेत. हे मंदिर निसर्गरम्य अशा वातावरणात वसलं आहे. या देवीला छिन्नमस्तिका या नावानेही ओळखलं जातं. सती मातेच्या शरीराचे ५१ तुकडे जिथे पडले ती स्थानं शक्तीपीठ म्हणून ओळखली जाऊ लागली. या स्थानी सती देवीचा पाय पडला. या देवीला छिन्नमस्तिका हे नाव पडण्यामागे एक कथा आहे. मार्कंडेय पुराणानुसार देवी चंडीने राक्षसांसोबत युद्ध केलं. या युद्धात राक्षस पराभूत झाले पण देवीच्या दोन योगिनी जया आणि विजया यांना युद्धसमाप्तीनंतरही रक्ताची तहान लागली होती. या दोघींना शांत करण्यासाठी देवीने आपलं शीर धडावेगळं केलं आणि त्यांची तहान भागवली. देवीने आपलं शीर आपल्याच हातात धरलं होतं. देवीच्या मानेतल्या रक्तवाहिन्यांमधून वाहणारं रक्त प्यायल्यानंतर योगिनी शांत झाल्या. शीर नसलेली म्हणून ती छिन्नमस्तिका.

छिन्नमस्तिका देवीचं रक्षण साक्षात भगवान शंकर करत असल्याचं बोललं जातं. म्हणूनच या मंदिराच्या चार बाजूंना शिव मंदिरं आहेत. पूर्वेला कालेश्वर महादेव, पश्चिमेला नारायण महादेव, उत्तरेला मुचकुंद महादेव आणि दक्षिणेला शिव बाडी अशी ही मंदिरं होत. चिंतपूर्णी देवीच्या या मंदिराची निर्मिती एका ब्राह्मणाने केली होती, असं म्हटलं जातं. या ब्राह्मणाचे वंशज मंदिरात पुजारी म्हणून काम बघतात. चिंतपूर्णी देवी भाविकांच्या मनोकामना पूर्ण करते, असं म्हटलं जातं.

## महत्त्व चरणस्पर्शाचं...

जाणून घ्या

ज्येष्ठांच्या पाया पडण्याला आपल्या संस्कृतीत विशेष स्थान आहे. ही परंपरा वेदिक काळापासून सुरू असल्याचं म्हटलं जातं. मोठ्यांच्या पाया पडण्याचं महत्त्व अथर्व वेद आणि मनुस्मृती या ग्रंथांमध्ये नमूद करण्यात आलं आहे. रामायण, महाभारतासारख्या ग्रंथांमध्येही थोरांना वंदन करण्याच्या या पद्धतीविषयी सांगण्यात आलं आहे. भगवतगीतेतही याचा उल्लेख आढळतो. आजच्या काळात वर्षानुवर्षं सुरू असलेली प्रथा म्हणून तसंच ज्येष्ठांच्या प्रती आदरभाव व्यक्त करण्याची एक पद्धत म्हणून वाकून नमस्कार केला जातो. पण या कृतीमागचं नेमकं कारण आणि महत्त्व लोकांना फारसं माहीत नाही. पाया पडल्यामुळे नेमकं काय होतं, याविषयी...



* वेदांमध्ये पाया पडण्याचा उल्लेख आढळतो. वेदांनी याचं अध्यात्मिक आणि वैज्ञानिक महत्त्व विषद केलं केलं आहे. या कृतीच्या माध्यमातून ज्येष्ठांमधली सकारात्मक ऊर्जा वाकून नमस्कार करणाऱ्याला मिळते. ही ऊर्जा एका व्यक्तीकडून दुसऱ्याकडे पोहोचते. या ऊर्जेची पातळी आणि प्रकार परिस्थितीनुसार बदलत राहतो.

* पाया पडण्याची विशिष्ट पद्धत आहे. मनुस्मृती आणि गीतेत याबाबत विस्तृत वर्णन आढळतं. वाकून नमस्कार करण्याचे लाभ मिळवण्यासाठी मनात आदरभाव आणि भक्ती ठेऊन दोन्ही हातांनी ज्येष्ठांच्या पायांना स्पर्श करायला हवा. ज्येष्ठांनी नमस्कार करणाऱ्याच्या डोक्यावर हात ठेऊन भरभरून आशीर्वाद द्यायला हवेत.

* प्रत्येक व्यक्तीने आपल्या आई-वडिलांचे आशीर्वाद घ्यायला हवेत. आई-वडिलांच्या पाया पडणं लाभदायी मानलं जातं. मुलांनी आई-वडिलांना नमस्कार केला की घरात सकारात्मक ऊर्जेचा वास राहतो.

* गुरूंच्या पाया पडून त्यांचे आशीर्वाद घेणंही शुभ मानलं जातं. गुरूस्थानी असलेल्या व्यक्तीचे आशीर्वाद घ्यायला हवेत. गुरूंच्या आशीर्वादामुळे शरीरात सकारात्मक ऊर्जा कार्यान्वित होते.

* भगवंत आणि भक्त यांना जोडणारा धागा म्हणून या कृतीकडे पाहता येईल. चरणांवर लीन झालेल्या भक्तावर भगवंत कृपेचा वर्षाव करतो. भगवंताच्या चरणांवर मस्तक ठेवल्याने भक्तांना समाधान लाभतं.

## लोभ ठेवावा दूर...

भक्ती बोध

माणसाची मानसिकता, नियत चांगली असणं गरजेचं असतं. त्याच्या वागणुकीवर, विचारांवर बरंच काही अवलंबून असतं. त्याची प्रतिष्ठा, किंमत यावरूनच ठरत असते. एका कथेद्वारे आपण हे जाणून घेऊया. एका ब्राह्मणाची कीर्ती चहूबाजूंना पसरली होती. त्याच्या किर्तनांचा, प्रवचनांचा चाहतावर्ग सगळीकडे पसरला होता. एके दिवशी जवळच्या गावातल्या मंदिराच्या पुजाऱ्याचं निधन झाल्याने हा ब्राह्मण तिथे पूजेसाठी गेला. त्याने बसने प्रवास केला. यावेळी तिकिट काढल्यानंतर पैसे परत देताना कंडक्टरने त्याला दहा रूपये जास्त दिले. ही बाब ब्राह्मणाच्या लक्षात आली पण त्याने दहाची नोट स्वत:कडेच ठेवली.

कंडक्टरच्या लक्षात आल्यावर तो आपल्याकडून दहा रूपये घेऊन जाईल, असा विचार करून तो गप्प बसला. कंडक्टर काही आला नाही. बसचा मालक लाखोंची कमाई करतो. हे दहा रूपये मी ठेऊन घेतले तर त्याचं फारसं नुकसान होणार नाही, असं ब्राह्मणाच्या मनात आलं. त्याने ती नोट स्वत:कडे ठेवली. तेवढ्यात त्याचा थांबा आला. तो तिथे उतरला पण, त्याचं मन मानत नव्हतं. ब्राह्मण कंडक्टरकडे गेला. दहा रूपये त्याला परत दिले. नेमकं काय घडलं हे त्याला सांगितलं. यावर त्या कंडक्टरचं म्हणणं ऐकून ब्राह्मण चाटच पडला. तुम्ही या गावच्या मंदिराचे नवे पुजारी आहात का,



असा प्रश्न त्याने ब्राह्मणाला केला. त्याने होकार देताच तो म्हणाला, मी तुमच्याबद्दल बरंच ऐकून होतो. तुमची प्रवचनं ऐकायची माझी खूप इच्छा होती. मी तुम्हाला ओळखलं होतं. मी मुद्दामच तुम्हाला दहा रूपये जास्त दिले. तुम्ही काय करता हे मला पहायचं होतं पण तुम्ही ही नोट परत दिली. तुमच्या प्रवचनांप्रमाणेच तुमचं आचरण आहे. मला तुमच्याबद्दल खूप आदर वाटतो. हे ऐकल्यावर ब्राह्मणाने देवाचे आभार मानले. माझ्या मनातला लोभ दूर केला. यामुळे माझ्याबद्दलचा आदरभाव टिकून राहिला. फक्त दहा रूपयांच्या लोभामुळे ब्राह्मणाबद्दलचा सगळा आदर एका क्षणात नष्ट झाला असता. त्यामुळे कोणत्याही गोष्टीचा लोभ करू नये हे खरं, असं मनोगत व्यक्त करत ब्राह्मण शांत झाला.

## समृद्धी महामार्गावर इनोव्हा कारचा भीषण अपघात

# तीन परदेशी नागरिकांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
वाशिम, दि. १८ :

जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात दोन परदेशी नागरिकांचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना वाशिम तालुक्यातील मालेगाव-जऊळका दरम्यान, समृद्धी महामार्गाच्या कॉरिडर क्रमांक २३२ वर घडली. मुंबईवरून नागपूरच्या दिशेने जात असलेल्या इनोव्हा कारचा हा अपघात असून, अपघातात मृत्यू झालेले दोघेही नागरिक म्यानमार देशातील असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे.

इनोव्हा वाहनाचा चालक दीर्घ प्रवासामुळे थकलेला होता. प्रवासादरम्यान त्याला अचानक डुलकी लागल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले आणि गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या लोखंडी कठड्यांना धडकली. गाडीचा वेग मोठा असल्याने धडक इतकी भीषण होती की कठडे तोडून वाहन रस्त्याखाली कोसळले. या धडकेत इनोव्हाचा पूर्ण चुराडा झाला असून, गाडीत बसलेल्या दोघा प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर काही वेळ महामार्गावरील वाहतूकही विस्कळीत झाली होती.

पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, अपघातात मृत्यू झालेले दोघे म्यानमार देशातील नागरिक होते. हे दोघे धार्मिक प्रवासासाठी मुंबईवरून जगन्नाथपुरी या ठिकाणी निघाले होते. त्यांनी प्रवासासाठी इनोव्हा गाडीची खासगी बुकिंग केली होती. अपघातग्रस्त वाहनात ते दोघेच प्रवासी होते. दुर्दैवाने, वाहनचालकाच्या डुलकीमुळे झालेल्या या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला. मृतांची ओळख पटवण्याचे आणि त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत.



अपघात इतका जबरदस्त होता की, इनोव्हाचे पुढील आणि मागील भाग पूर्णपणे चिरडले गेले होते. लोखंडी कठडे तुटून वाहन सुमारे २० फूट खाली गेल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. घटनेनंतर काही वेळासाठी समृद्धी महामार्गावर वाहतुकीचा वेग मंदावला होता. महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन वाहतूक सुरळीत केली. अग्निशमन दल आणि पोलिसांनी मिळून गाडीतील मृतदेह बाहेर काढले आणि ते शवविच्छेदनासाठी वाशीम जिल्हा रुग्णालयात हलवले.

समृद्धी महामार्गावर अलीकडच्या काही महिन्यांत अपघातांची मालिका सुरू असून, वेग आणि निष्काळजी वाहनचालकपणामुळे अनेकांचा बळी गेला आहे. या घटनेनंतर पुन्हा एकदा सुरक्षिततेचा आणि वेगमर्यादेच्या पालनाचा मुद्दा पुढे आला आहे.

## कारच्या धडकेत महिला ठार



■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १८ :
समोरून भरधाव वेगात येणाऱ्या कारने एका दुचाकीवर जाणाऱ्या पती -पत्नीला धडक दिल्याने ५० वर्षीय महिला जागीच ठार झाली. ही घटना तुळजापूर महामार्गावरील येथून जवळच असलेल्या चिल्ली गावाजवळ घडली. अकिला बी. अमीर बेग मिर्झा (वय ५०) असे मृतक महिलेचे नाव असून तिचा पती अमीरबेग मिर्झा (वय ५८) हा गंभीर जखमी झाला आहे.

दोघे पती - पत्नी दुचाकीने नांदगव्हाणकडे जात असतांना समोरुन भरधाव वेगाने येणाऱ्या मारुती सुझुकी कारने समोरासमोर जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकी ही डिवायडर वर फेकल्या गेल्याने दुचाकीवरील अकिला बी. यांना डोक्याला जबर मार लागला. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला तर तिचा पती अमीरबेग मिर्झा हा गंभीर जखमी झाला आहे. उमरखेड पोलिसांनी पंचनामा करून गंभीर जखमी व मृतक हिला उपजिल्हा रुग्णालयात आणले असून पूढील तपास ठाणेदार शंकर पांचाळ, पिएसआय मुंडे करित आहेत.

# दिवाळी मुहूर्तावर नागरिकांना पोलिसांकडून विशेष भेट



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
दिवाळी समोर असताना शहरातील विविध भागांतून घरफोडी, वाहने चोरीच्या गुन्ह्यांना बळी पडत कोट्यवधींच्या मालमत्ता गमावून बसलेल्या २०० हून अधिक नागरिकांना पोलिसांकडून शनिवारी सुखद गिफ्ट देण्यात आले.

नागरिकांच्या चोरीला गेलेला एकूण १ कोटी ६० लाख रूपयांचा मुद्देमाल पोलिसांनी सुखरूप हस्तांतरित केला. विशेष म्हणजे राज्याच्या सीमा ओलांडून उत्तर प्रदेश, आसाम, छत्तीसगड, मध्यप्रदेशमध्ये परागंदा झालेल्या या चोरांच्या पोलिसांनी परराज्यातून मुसक्या बांधल्या.

यात एकट्या परिमंडळ एक मधून ८७ लाख ३९ हजार रूपयांचा मुद्देमाल नागरिकांना सुपूर्द केला. तर परिमंडळ दोन मध्ये ४८ लाख आणि परिमंडळ पाच मध्ये २४ लाख आशा एकूण १ कोटी ३९ लाखांच्या मौल्यवान वस्तूंचा समावेश आहे.

यावेळी पोलीस आयुक्त रविंद्र सिंगल, सह पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक शेळके, परिमंडळ पाच हद्दीत पोलीस स्टेशन कळमना, पारडी, यशोधरानगर आणि वाठोडा पोलिसांनी ५१ मोबाईल फोन परत केले. या सोबतच १२ दुचाकी वाहन अशी २४ लाख किमतीच्या वस्तू नागरिकांना परत केल्या. परिमंडळ २ मधिल पोलिस स्टेशन धंतोली, सीताबर्डी, सदर इमावाड, अंबाझरीमधुन १९२ भ्रमणध्वनी तर १० दुचाकी असा ४८ लाखांचा मुद्देमाल परत केला. परिमंडळ १ मधून ५१ गुन्हे उघडकीस आले. या मधील ४२ दुचाकी वाहने, २३ तोळे सोने आणि ११ भ्रमणदूरध्वनी अशा एकूण ८७ लाख ३९ हजार रूपयांचा मुद्देमाल परत केला.

हरवलेली मौल्यवान मालमत्ता पुन्हा मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे आणि आनंदाचे भाव उमटले. दिवाळीच्या मुहूर्तावर मिळालेली ही विशेष भेट नागरिकांसाठी दिलासादायक तर पोलिसांप्रती विश्वास वाढवणारी ठरली आहे.

# ..तर मी भुजबळांच्या पाया पडेन!

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
विरोधक ओबीसींच्या बाजूने ताकदीने उभे होत आहेत. हे लक्षात घेऊन सरकारने काही नेत्यांना पुढे करत हा विषय हायजॅक करण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वांनी एकत्र येत काम केले पाहिजे. भाजपच्या इशाऱ्यावर भुजबळांनी मला टार्गेट केले आहे. नागपूरच्या मेळाव्यामध्ये जी गर्दी आली तिथून अपेक्षा नव्हती तेवढा ओबीसी समाज रस्त्यावर उतरला त्याला सरकार घाबरले आणि छगन भुजबळ यांना पुढे करत मला टार्गेट करण्याचे काम सुरू केले. मला टार्गेट करत जर ओबीसी समाजाचे भलं होणार असेल तर काही हरकत नाही. पण जी आर रद्द करावा. मी भुजबळांच्या पाया पडायला जाईल, असे वक्तव्या विजय वडेट्टीवार यांनी केले.



वडेट्टीवार म्हणाले की, आपल्याला जे हवे ते संवैधानिक मार्गाने मिळवायचे आहे.आंदोलन, मोर्चा काढत सरकारवर प्रेशर टाका आणि जे हवे ते मिळवा पण कोयत्याची भाषा केल्यावर मी दुसऱ्या सभेला कसा जाणार असा सवाल वडेट्टीवार यांनी केला आहे.

# शेतकऱ्यांची कापूस कोंडी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

या वर्षी महाराष्ट्रात ३८ लाख ३५ हजार ९४७ हेक्टरवर कपाशीची लागवड झाली आहे. केंद्र सरकारकडून आयात शुल्क सवलतीचा कालावधी वाढवण्यात आल्यामुळे कापसाचे दर हमीभावापेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.

अशा परिस्थितीत सीसीआयकडून (भारतीय कापूस महामंडळ) खरेदी केंद्रे सुरू व्हायला हवी होती. मात्र अजूनही राज्यात कापूस खरेदीचा मुहूर्त निघू शकलेला नाही. महाराष्ट्रात सीसीआयला १६८ खरेदी केंद्रे सुरू करण्याचा प्रस्ताव कापूस पणन महामंडळाने दिला होता. कापूस खरेदी १५ ऑक्टोबरपासून सुरू होणे आवश्यक होते. मात्र अजूनही काही ठिकाणी अपवाद वगळता बहुतांश ठिकाणी केंद्रे सुरू झाली नसल्याची माहिती आहे.

खासगी व्यापाऱ्यांनी मुहूर्ताला ७,१०१ रुपये क्विंटलला एक गाडी घेतली. बाकीच्या गाड्या काय भावाने घेतल्या असतील याची कल्पना करा.



गुजरातमध्येही व्यापारी ६,५०० ते ७००० रुपये क्विंटलने खरेदी करीत आहे.

देशात रुईचा भाव ५२ हजार रुपये खंडी भाव आहे. अमेरिकेची रुई ४० ते ४५ हजार रुपये खंडीने येण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे कापूस अभ्यासक जावंधिया यांनी सांगितले.

महाराष्ट्रात १६८ केंद्रांद्वारे कापूस खरेदी होणार असून त्यासाठी, ह्यकपास किसान ॲपवर नोंदणी करणे सक्तीचे, नोंदणीकृत शेतकऱ्यांना निर्धारित ७ दिवसांच्या स्लॉट, कोणत्याही दिवशी कोणत्याही केंद्रावर कापूस विकण्याची परवानगी आहे. गतवर्षीच्या हंगामात सातबारा उताऱ्यावर कापसाची नोंद नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांची अडचण झाली होती.

# सोन्याच्या दरात थोडीशी घसरण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
दिवाळीच्या पहिल्या दिवशी वसु बारसला सोन्याचे दर आजपर्यंतच्या विक्रमी उंचीवर पोहचले होते. परंतु धनत्रयोदशीला मात्र घट झाली आहे. तर चांदीचे दरही मोठ्या प्रमाणात घसरले आहे. त्यामुळे ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

दिवाळीच्या काळात सोने खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल असतो. नागपुरातील सराफा बाजारात दिवाळीच्या पहिल्या दिवशी १७ ऑक्टोंबरला वसु बारसच्या दिवशी सोन्याचे दर प्रति दहा ग्राम जीएसटी आणि मेकिंग शुल्क वगळून २४ कॅरेटसाठी १ लाख ३१ हजार ४०० रुपये, २२ कॅरेटसाठी १ लाख २२ हजार २०० रुपये, १८ कॅरेटसाठी १ लाख २ हजार ५०० रुपये, १४ कॅरेटसाठी ८५ हजार ४०० रुपये, १४ कॅरेटसाठी ८५ हजार ४०० रुपये होते. हे दर दुसऱ्या दिवशी शनिवारी धनत्रयोदशीच्या मुहर्तावर २४ कॅरेटसाठी १ लाख २८ हजार ५०० रुपये, २२ कॅरेटसाठी १ लाख १९ हजार ५०० रुपये, १८ कॅरेटसाठी १ लाख २०० रुपये, १४ कॅरेटसाठी ८३ हजार ५०० रुपये होते.



त्यामुळे एकाच दिवसात सोन्याच्या दरात प्रति दहा ग्राम २४ कॅरेटमध्ये २९०० रुपये, २२ कॅरेटमध्ये २७०० रुपये, १८ कॅरेटमध्ये २३०० रुपये, १४ कॅरेटमध्ये १९०० रुपये नोंदवले गेले.
यासोबतच चांदीच्या दरात मोठी घसरण झाल्याचे दिसून आले. ऐन धनत्रयोदशीच्या दिवशी सोनेचांदीचे दर घसरल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला असून, खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी दिसून आली.


स्थापना : सन १९९७
फोन : ०७२५६ - २२५०२७
श्री गुरुदेव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत कारंजा
र.नं. AKL/KRJ/RSR/CR/759/96-97
मुख्य कार्यालय : काण्णव जिन, एमएसईबी ऑफीस जवळ, मेन रोड, कारंजा२२५०२७
सर्व सामान्यांचा आधार कौटुंबिक जिव्हाळा जोपासुन विनम्र व तत्पर सेवा देणारी शहरातील अग्रगण्य पत संस्था
संस्थापक अध्यक्ष
मा.श्री.नरेंद्रजी गोलेच्छा
यांना वाढदिवसानिमित्त
कोटी...कोटी हार्दिक शुभेच्छा
मा.श्री.नरेंद्रजी गोलेच्छा
सर्व नागरिकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छूक
अतुल धाकतोड व्यवस्थापक
डॉ.राजेंद्र संपट । महेंद्रजी लोडाया । शंकरलालजी कश्यप । बिपीनभाऊ वाणी
किरिटभाई रायचुरा । सुनिलजी मसणे । सौ.चंदाताई कोळकर
सौ.निशाताई गोलेच्छा । सौ.प्रितीताई धाकतोड
समस्त कर्मचारीवृंद व अल्पबचत संग्राहक
श्री.विनित नरेंद्रजी गोलेच्छा
अध्यक्ष
मुदत ठेवीवर १० टक्के व्याजदर
संस्थेचे वैशिष्टे : स्वभांडलावर वाटचाल । तत्पर विश्वसनिय आपुलकीची सेवा । लॉकर सुविधा उपलब्ध । सोनेतारण कर्ज । पगारतारण कर्ज । गृहतारण कर्ज । व्यवसाय कर्ज
आवत्ती ठेव योजना : दरमहा ५०० रुपये ८० महिने भरणा करा व मुदती नंतर ५००००.०० मिळवा.
दरमहा १०००.०० रुपये ८० महिने भरणा करा व मुदती नंतर १०००००.०० मिळवा.
सभासदांनी आपल्या कर्जाची नियमीत भरणा करुन संस्थेच्या प्रगतीमध्ये सहकार्य करुन सभासद म्हणून आपले कर्तव्य पार पाडावे.



कारंजा नगर परिषद हद्दीतील
8 कोटी रुपयांच्या विकास कामाचे
भुमिपुजन सोहळा

| | |
|---|---|
| रामासावजी चौक ते विजय बगडे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटकीरण व नाली बांधकाम करणे, | 59,19,084 |
| मारवाडी पूरा ते दत्त मंदीर पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे. | 83,89,511 |
| डॉ. सोनटक्के घर ते पोहा वेश पर्यंत कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे, | 15,35,051 |
| आकाशदीप कॉलनी मधील प्रकाश थोरात यांच्या घर ते श्रीकृष्ण मुंदे यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण य नाली बांधकाम करणे. | 26,52,305 |
| लक्ष्मी नगर बन्सी उपाध्ये ते रवि ढाकुलकर यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे, | 12,04,867 |
| साई-विहार कॉलनी पवन खिची यांच्या घर ते स गुजर यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली | 19,27,567 |
| वनदेवि नगर सानिका अँग्रो ते भलावि यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण च नाली बांधकाम करणे, | 95,99,713 |
| वनदेवि नगर साई संकुल ते ढोक लाईनमन यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण य नाली बांधकाम करणे. | 1,13,59,978 |
| यादगार नगर विवेक पवार यांचे घर ते पंडीत उपाध्ये यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे. | 18,47,433 |
| तुषार कॉलनी अजय परळीकर यांचे घर ते वानखडे सर यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे. | 75,20,079 |
| एकविरा देवि मंदीर मागील बाजूस मोठ्या नाल्यापर्यंत नाली बांधकाम करणे. | 6,42,364 |
| बाबरे कॉलनी येथे योगिराज शंकरपुरे घर ते मोरे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे. | 27,41,951 |
| साई विहार कॉलनी सनातन इंगोले यांचे घर ते पवन खिची पर्यंत नाली बांधकाम करणे. | 16,06,304 |
| प्रियदर्शनी कॉलनी येथे विलास वेळुकर यांचे घर ते साई मंदीर पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे, | 35,19,805 |
| प्रियदर्शनी कॉलनी विलास कोरडे यांचे घर ते साई मंदीर जवळ नाली बांधकाम करणे. | 16,06,312 |
| संभाजी नगर गोमाशे यांचे घर ते प्रा. राठोड यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे. | 4,200,852 |
| आकाशदीप कॉलनी शांती नगर येथील अरूण बोथे यांचे घर ते राजु सोनोने यांच्या घरापर्यंत नाली बांधकाम व रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | 25,86,453 |
| आकाशदीप कॉलनी शांती नगर हनुमान राऊत यांचे घर ते बाळू भोग यांच्या घरापर्यंत नाली बांधकाम व रस्ता कॉंक्रीटीकरण करणे, | 25,86,453 |
| साई विहार कॉलनी येथे कन्हे घर ते देशमुख यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे, | 8,97,815 |

दिनांक : रविवार दि. 19/10/2025 रोजी
वेळ: सकाळी 10.30 पासुन
कार्यक्रमाचे अध्यक्ष
श्री. नरेंद्रजी गोलेच्छा (मा. नगराध्यक्ष न, प, कारंजा)
श्री. दत्तराज डहाके (मा. नगराध्यक्ष न, प, कारंजा)
प्रमुख उपस्थिती :
सौ. प्राजक्ता माहितकर (शहराध्यक्ष, भाजपा कारंजा)
आ. सई प्रकाश डहाके
(कारंजा-मानोरा विधानसभा)

**दीपावलीच्या शुभेच्छा देताना आनंद होतो आहे. सध्या जगण्याचे आयाम बदलले आहेत. माणूस आत्मकेंद्री होतो आहे. हा संवाद हरपलेला काळ आहे. या पार्श्वभूमीवर दीपप्रज्वलन करताना मनाचे कोपरेही उजळून टाकण्याचा विचार प्राधान्याने व्हायला हवा. चौकटीबाहेरचे जग बघताना आपल्या मनाची चौकट भक्कम करण्याचा प्रयत्न होण्याची गरज आहे कारण सकारात्मकतेची ही प्रभावळच दीपावलीचा आनंद द्विगुणीत करु शकेल.**

## येता आनंदा उधाण...

एका मंगलमयी सणाचा प्रारंभ होत असताना दिवाळीच्या स्वागताला आपण सगळेच सज्ज आहोत. आसमंतामध्ये हा आनंद पसरत आहे, तो प्रत्येकाला जाणवत आहे. अशा रम्य वातावरणात उल्हसित चित्तवृत्तींनिशी दीपावलीचे स्वागत करत आणि यायोगे रोजच्या जगण्यामध्येही आनंदलहरी निर्माण करण्याचा संकल्प करताना सभोवताली उत्साहाचे वातावरण दाटले आहे. अलिकडे आपल्या प्रत्येकाच्या आयुष्याचा कल नकारात्मकतेकडे




वळतो आहे. लोकांमध्ये अस्वस्थता आहे. यामागे अर्थातच अनेक कारणे आहेत. त्याच्या खोलात जायला नको. मात्र दीपावलीच्या आनंदपर्वाचा आनंद घेत असताना वाढत्या अस्वस्थतेमागील कारणे शोधून दूर करण्याचा प्रयत्नही केला पाहिजे असे वाटते. खरे पाहता आज अनेकांकडे भौतिक सुखांचा आनंद घेता येईल एवढा पैसा आहे. अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजा भागवून चैनीच्या वस्तूंच्या खरेदीतून मिळणारा आनंद अनेकजण उपभोगत आहेत. पण एकीकडे असे असले तरी जवळपास सगळ्या माध्यमांमधून आपल्यावर आदळणाऱ्या बातम्या नकारात्मकच असतात, हा प्रश्न पडतो. मारहाण, बदल्याची भावना, हिंसाचारी वृत्ती, फसवाफसवी अशा कुप्रवृत्तींचे दर्शन घडवणाऱ्या या बातम्यांचा ओघ आपल्याला नेमके काय दाखवून देत आहे? याचा विचार होणे गरजेचे वाटते.

स्वपातळीवर विचार करता यामागे कुठेतरी अध्यात्माची साथ सुटण्याचा हा परिणाम आहे का काय, असे वाटून जाते कारण आध्यात्म आपल्याला शांततेकडे नेते. नामस्मरणाचाही तोच प्रभाव असतो. मन:शांती नसल्यामुळे समोर येणारे धोके संतांनी, अभ्यासकांनी दाखवून दिले आहेत. त्याचबरोबर कृतज्ञतेचे महत्त्वही अधोरेखित केले आहे. आपल्याकडे असणाऱ्या गोष्टींबद्दल कृतज्ञ नसाल तर सगळेच गणित बिघडते आणि अस्थैर्य निर्माण होते. यातून अहंभाव वाढतो. म्हणूनच या आनंदपर्वाची सुरुवात अहं कमी करुन व्हायला हवी. आज आपल्याकडे आहे ते अनेकांकडे नाही. छोट्या छोट्या गोष्टी मिळवण्यासाठी, साध्य करण्यासाठी अनेकांची उरफोड सुरु असते. जणू त्यांचे आयुष्य पणाला लागलेले असते. म्हणूनच आपल्याकडे आहे त्याबद्दल समाधानी राहणे ही आनंद चिरंजीव करण्याची एक पायरी आहे, जी आपण या दिवाळीत गाठायला हवी. नाही त्याच्या पाठी न धावता आहे आहे त्याचा उपभोग घ्यायला हवा, कारण भौतिकतेकडे वाहवत जाऊ तेवढी आध्यात्माची कास सुटत जाईल आणि परिस्थिती अधिक त्रासदायक होईल.

सध्या देशच नव्हे, तर अवघे जग अनेक संकटांचा सामना करत आहे. अस्मानी आणि सुलतानी अशा दोन्ही संकटांना सामोरे जाताना प्रत्येकाची दमछाक होत आहे. पर्यावरणाचा ढासळता समतोल लपून राहिलेला नाही. यामागील कारणांचा विचारही व्हायला हवा आणि चुका सुधारुन पुढे जाण्याचा निर्धार करायला हवा. कबहुना, या दिवाळीचा हा संदेश आहे असेच आपण समजायला हवे. तेव्हा या दिवाळीमध्ये आपण मन:शांती शोधू या, पर्यावरणाची नाळ सोडण्याचा प्रयत्न करु या आणि स्वत:च्या सुखापलीकडचा विचार करुन दुसऱ्याच्या चेहऱ्यावर आनंद बघण्याचा निश्चय करु या. फटाक्यांसाठी खर्च होणारे पैसे पूरग्रस्तांच्या मदतीकडे वळले तर यंदाच्या दिवाळीचे हे खरे दिवे लागले, असे आपण म्हणू शकतो. समाजातील 'नाही रे' वर्गाकडे पैसे जायला लागतील तेव्हा अपेक्षित तो सामाजिक बदल घडेल. निसर्गरक्षणाच्या कामीही आपल्याला असाच पुढाकार घ्यावा लागेल. अर्थात आताची पिढी बरीच पुढे आहे. लहानगे फटाक्यांचा आग्रह सोडताना दिसत आहेत, ही नक्कीच समाधानकारक बाब म्हणावी लागेल. परंतु, नोव्हेंबर-डिसेंबरपर्यंत रेंगाळणारा पाऊस, बदलते ऋतुमान, पर्यावरणाशी संबंधित अन्य धोके लक्षात घेता विविध पातळ्यांवर काम करावे लागणार असल्याचे आपण समजून घ्यायला हवे. त्यासाठी दिवाळीसारखा उत्तम मुहूर्त कोणता असेल?

दीपावलीमध्ये घरोघरी दीपोत्सव साजरा होतो. पण तो करण्यासाठी लोकांनी स्वत:च्या घरामध्येच राहावे असे सांगावेसे वाटते, कारण दिवाळीमध्ये बाहेर पडण्याचे प्रमाण सध्या कमालीचे वाढले आहे. एक उदाहरण देतो. दापोलीमध्ये हॉटेल व्यावसायिक असणाऱ्या एका स्नेहींनी सांगितलेली ही घटना आहे. त्यांच्याकडे दिवाळीतच नव्हे तर प्रत्येक 'लाँग विकएंड'ला मोठी गर्दी होते. दिवाळीत तर ती प्रचंड वाढते. हॉटेल आधीपासून आरक्षित असते. मात्र कोणत्याही नियोजनाशिवाय ऐन वेळी आल्यानंतर हॉटेलमध्ये जागा नसल्याचे सांगताच 'इथे पथारी घालून दिली तरी चालेल' असे पर्यटक म्हणतात तेव्हा काय बोलायचे ते कळत नाही, असे हे माझे स्नेही सांगत होते. ही परिस्थिती आपण सगळेच पाहतो तेव्हा या लोकांना स्वत:चे घर टोचते का, हा प्रश्न विचारावासा वाटतो. खरे तर प्रत्येकाला घरामध्ये सर्वाधिक आनंद मिळायला हवा, मिळत नसेल तर तो शोधायला हवा आणि तेही जमत नसेल तर यामागचे कारण शोधायला हवे. स्वत:चे राहते घरच एंजॉय करता येत नसेल, तर उरते काय, या प्रश्नाचे उत्तर आपण शोधायला हवे. शुक्रवारी रात्रीपासून रविवारच्या रात्रीपर्यंत टोलनाक्यांवर होणारी गर्दी हे उत्तर शोधण्याची गरज प्रकर्षाने दाखवून देते. आता हे कुठे तरी थांबायला हवे आणि घराबाहेर होणारा (मद्य वा अन्य आकर्षणांच्या धुंदीमध्ये) संवाद थांबून घरात, नातलगांसवे गरजेचा असणारा प्रेमभाव वाढायला हवा. म्हणूनच यंदा स्वत:च्या घरात दिवाळी साजरी करुन आपल्या शहरात, पेठेत दीपोत्सव साजरा करु या, असे सुचवावेसे वाटते.



**प्रासंगिक**

**अजय पुरकर, प्रसिद्ध अभिनेता**

दुर्दैवाने सध्या वृद्धाश्रमांची संख्या वाढते आहे. परदेशी सुखवस्तू झालेली मुले इथे वृद्ध पालकांची सगळी सोय करतात हे खरे, पण दीपावलीमध्ये त्यांच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यांवरील दीप मात्र क्षीण झाल्यासारखे दिसतात. केवळ वृद्धाश्रमांमध्येच नव्हे, तर प्रत्येक कॉलनीमध्ये वृद्ध बसलेले दिसतात. त्यांच्याशी गप्पा मारुन, त्यांना बोलते करुनही आपण दिवाळी साजरी करु शकतो. ही भेट, संवाद भलेही पाच-दहा मिनिटांचा असेल पण 'काय आजोबा, कसे आहात? आज काय केले?' हा साधा प्रश्नही त्यांच्या जगण्याचा एक कोपरा उजळवून टाकणारा असेल. त्यांच्याबरोबर फराळ खाणे, दीपोत्सवासाठी त्यांना सामावून घेणे हे साधेसे उपक्रमही दिवाळीचा अर्थ बदलवून टाकण्यास पुरेसे ठरतील. परिसरातील तरुणाईने, विद्यार्थ्यांनी यात पुढाकार घेतला तर स्वत:च्या पलिकडे बघण्याचा विचार प्रबळ होईल आणि चौकटीबाहेरचे जग अनुभवताना ही दीपावली भावनिकदृष्ट्याही प्रगल्भ करुन जाईल.



एकदा विचारांच्या कक्षा रुंदावल्या, बाहेरचे जग बघण्याची आवड निर्माण झाली की रोजचा दिवस दिवाळीसारखा होऊन जाईल. आपण छोट्या-मोठ्या कृतीतून दुसऱ्याला आनंद द्यायला शिकू. दुसऱ्याच्या आनंदात आपला आनंद शोधायला शिकू. माझ्या मते, सध्या या भावनेची समाजाला आत्यंतिक गरज आहे. आत्मकेंद्री वृत्तींच्या विळख्यातून सुटण्याचा हा एक श्रेयस्कर मार्ग आहे. इथे अलिकडे वाचनात आलेली एक गोष्ट स्मरते. एक स्त्री टोलनाक्यावर थांबलेली असते. ती टोल देते आणि मागील दहा गाड्यांचा टोलही आपल्याकडून घ्या, असे सांगते. या कृतीतून दुसऱ्याला मदत करण्याचा तिचा विचार नसतो तर स्वत:ला आनंदी करण्याचा तिने निवडलेला मार्ग असतो. आपणही असे काही करु शकतो का? अर्थातच ही भेट केवळ पैशाच्या स्वरुपात असायची गरज नाही. भेट वेगवेगळ्या स्वरुपाची असू शकते. पण यातून स्वार्थीपणाकडे वाढणारा कल एक ना एक दिवस कमी होईल असे वाटते. समाजसुधारणेचे, स्वत:ला सुधारण्याचे काम हाती घेण्यासाठी प्रत्येक वेळी मोठा उपक्रम हाती घ्यावा लागत नाही. जाता-जाता, सहजतेनेही काही गोष्टी होऊ शकतात. या दिवाळीपासून त्याचा आरंभ झाला तर सोने पे सुहागा...!

आज आपण हातातल्या दुष्ट यंत्रामध्ये हरवलो आहोत. घरात, प्रवासात, कामाचे तास वगळता फावल्या वेळेवर त्याचे अधिराज्य आहे. समोरासमोर बसलेल्या दोन व्यक्ती पूर्वी एकमेकांशी बोलत असत. माफक चौकशी करत असत. हवापाण्याच्या गप्पा करत संवाद एका वळणावर जात असे. पण आता दोघांच्याही हातात मोबाईल असतो. कानामध्ये हेडफोन असल्यामुळे एखाद्याच्या आर्त हाकाही आपल्यापर्यंत पोहोचण्याची शक्यता कमी असते. अशा संवाद हरवलेल्या काळात दीपोत्सव साजरा करताना दोन वाक्यांची देवाणघेवाण करण्याचे औचित्य वा महत्त्व आपण ओळखायला हवे, कारण अंधार दिव्यानेच नव्हे तर आपुलकीच्या दोन शब्दांनीही दूर होऊ शकतो. तुमचे दोन शब्द एखाद्याला धीर देऊ शकतात. शेवटी दिवाळीच नव्हे, तर आपल्याकडील प्रत्येक सणच माणसाने, समाजाने एकत्र येण्याचा विचार घेऊन येतो. भाऊ, बहिणी, आत्या, मावशा, काका अशा सगळ्यांनी एकत्र येण्याचा हा महोत्सव असतो. तेव्हा यंदा आपण अशी दिवाळी साजरी करु या.

✦✦✦

## दिवाळी आणि खरेदीयात्रा

**वर्षभर तणावग्रस्तता अनुभवल्यानंतर, धकाधकीचे दिवस सहन केल्यानंतर दिवाळीनिमित्त येणारी आणि सर्वदूर पसरणारी प्रसन्नता हवीहवीशी वाटते. दिवाळीचे पदरव सर्वप्रथम बाजारात जाणवतात. ग्राहकांची वाढती लगबग, हवे ते शोधण्याची धांदल आणि मिळाल्यानंतरचे समाधान पैशात मोजता येत नाही. हेच दृश्य सध्या बाजारात दिसते आहे. खरेदीचा उत्साह ओसंडून वाहतो आहे. भिजलेल्या, चतायुक्त मनाला बाजार रिझवतो आहे.**



दिवाळीचा जल्लोश संपूर्ण आसमंतामध्ये जाणवत आहे. याच्या मुळाशी खरेदीयात्रा दडली आहे. वर्षातील या सर्वात मोठ्या सणासाठी जमेल तशी काही रक्कम बाजूला टाकली जातेच. त्यामुळे या निमित्ताने घरोघरी मोठी खरेदी होते, मात्र सर्वसामान्यांच्या आयुष्यात दिवाळी खरेदीचा खरा बहर येतो तो बोनसची रक्कम हाती पडल्यानंतर. हे अतिरिक्त धन, ही माया हाती पडली की खरेदीला खरे धुमारे फुटतात. अर्थात यंदा दिवाळीची दिवेलागण होण्यापूर्वी देशात अनेक ठिकाणी ओल्या दुष्काळाची काजळी पुसण्याचे काम करत आहोत. पावसाने झोडपून काढल्यामुळे अवघ्या देशात अनेक भागांमधले उभे पीक झोपले. खरे पाहता दिवाळी हा पिके हाती येण्याचा काळ. मशागत केल्यानंतर शेतामध्ये डौलाने पिके डोलताना बघण्याचा हा काळ, मात्र अवकाळी तसेच अतिवृष्टीने यावेळी शेतकऱ्यांच्या डोळ्याला लागलेल्या धारांमध्ये खारेपणा वाढवण्याचेच काम केले. अर्थात सरकार आणि समाजाकडून मिळालेल्या आधाराच्या बळावर शेतकरी पुन्हा उभा राहील आणि प्रत्येकाच्या घरापुढे पणत्या त्याच तेजाने लागत आहेत. अंधाराप्रमाणेच पणत्यांचा प्रकाश दु:खाचे सावटही दूर करेल आणि



नव्या दमाने समाज कामाला लागेल यात शंका नाही. यापूर्वी सलग तीन वर्षे आपण कोरोनाशी निकराची झुंज घेतली. वर्षभर या ना त्या स्वरुपाच्या आक्रमणाचा, अमेरिकेच्या मनमानी करवाढीचा, युद्धजन्य परिस्थितीचा सामना करतच आहोत. त्याचा परिणाम म्हणून बाजारातील हेलकावे सहन करत आहोत. मात्र संकटातून संधी शोधणारा भारतीय समाज आणि मराठी माणूस या स्थितीतही खंबीरपणे उभा आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आपण त्याचा हाच निर्धार पाहू शकतो.

शेवटी दिवाळी हे काही एका सणाचे नाव नाही, तर तो आनंदाच्या वाटेने प्रकाशाकडे नेणारा एक प्रदीर्घ प्रवास आहे. ही आपली हसरी, साजिरी परंपरा आहे. म्हणूनच दिवाळीत आनंद अर्थव्यवस्थेलाही एका वेगळ्या आणि महत्त्वाच्या टप्पावर घेऊन जातो. यंदाही बाजारपेठेत दिसणारा उत्साह, खरेदीचा ओघ आणि ग्राहकांच्या बदललेल्या सवयी यामुळे दिवाळीची तयारी, लगबग हेच दाखवून देणारी दिसते आहे. ती पारंपरिक स्वरूपातून काहीशा आधुनिक ग्राहकांच्या आवडीनुसार रंगलेली बघायला मिळते आहे. इथे लक्षात घ्यायला हवे की, शहरे आणि ग्रामीण भागातील खरेदीचा वेग, उत्पादनांची मागणी आणि नव्या ट्रेंड्समध्ये स्पष्ट फरक जाणवतो. पहिली बाब म्हणजे सोन्या-चांदीच्या बाजारात यंदाही विशेष उत्साह दिसतो आहे. खरे पाहता सोन्याची कमत गेल्या काही महिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आकडेवारीच्या भाषेत बोलायचे तर ही तब्बल ३०-४० टक्क्यांची वाढ आहे. सोन्याची कमत प्रति दहा ग्रॅम सव्वा लाख आणि चांदीची कमत प्रति किलो दीड लाखाच्या घरात आहे. तरीही, ग्राहकांनी या मौल्यवान धातूंच्या दागिन्यांच्या खरेदीकडे पाठ फिरवलेली नाही. दिवाळी आणि त्यामागोमाग सुरू होणारी लग्नसराई बघता हलक्या वजनाचे आणि १८ कॅरेट सोन्याचे दागिने आता अधिक पसंत केले जात आहेत. राज्यातील दागिन्यांच्या सर्व दुकानांमध्ये खरेदीला उधाण आले आहे. यातही पारंपरिक दागिन्यांपेक्षा हलक्या वजनाच्या मॉडर्न डिझाईन्सच्या दागिन्यांना ग्राहकांची पसंती मिळते आहे. मंगळसूत्र, बांगड्या, कर्णफुले यांच्या पारंपरिक आणि नवीन स्टाईलच्या सेट्सनी ग्राहकांना आकर्षित केले आहे. चांदीच्या वस्तूंमध्ये नाणी, पूजेचे छोटे संच तसेच आकर्षक भेटवस्तूंची मागणीही वाढते आहे. जीएसटी कपातीमुळे सोने-चांदीच्या बाजारातील कमती थोड्या प्रमाणात स्थिर राहिल्या तर मागणीत आणखी वाढ होऊ शकते.

केवळ सोने-चांदीच्या बाजारातच नव्हे, तर ऐन दिवाळीच्या तोंडावर जीएसटी दरातील कपातीमुळे यंदाची दिवाळी ग्राहकांसाठी दिलासा देणारी ठरली आहे. किमती काही अंशी कमी झाल्यामुळे कपड्यांच्या विक्रीत दहा टक्क्यांपर्यंत वाढ नोंदवली जात असून, वस्त्र उद्योगाचा व्यापार दिवाळीपुर्वी वृद्धिंगत झाला आहे. २,५०० पर्यंतच्या कपड्यांवर जीएसटी दर आता १२ टक्क्यांवरुन पाच टक्क्यांवर आल्याचा लाभ घेत, कपातीमुळे होणारा लाभ लक्षात घेत कपडेबाजारात सध्या उत्साहाचे वातावरण बघायला मिळत आहे. त्याचबरोबर 'लोकल फॉर व्होकल' चा प्रभावही स्पष्ट दिसत असून यंदाच्या दिवाळीत चीनी वस्तूंच्या मागणीत घट बघायला मिळते आहे. ग्राहक स्थानिक आणि भारतीय उत्पादने अधिक पसंत करत आहेत. थोडक्यात, 'लोकल फॉर व्होकल' उपक्रमामुळे ग्राहकांना भारतीय ब्रँड्सकडे वळवले गेले आहे, असेही आपण म्हणू शकतो. यामुळे, स्थानिक उत्पादकांना फायदा झाला असून या बाजारामध्ये ४.७५ लाख कोटींच्या विक्रीचा उद्देश ठेवण्यात आला आहे.

**प्रासंगिक**

**स्वाती पेशवे**

यंदाच्या दिवाळीमध्ये फॅशनच्या क्षेत्रात काही नवीन ट्रेंड्स दिसून येत आहेत. जसे की, इंडो-वेस्टर्न फ्युजननुसार धोती पॅंट्स, केप ब्लाउजेस आणि प्री-ड्रेप्ड साड्या यांचा वापर वाढला आहे. खेरीज ग्राहक सस्टेनेबल फॅशन ट्रेंडअंतर्गत पारंपरिक कापडांचा वापर करत असून एका वर्गाकडून पर्यावरणपूरक उत्पादनांची मागणी वाढली आहे. या वर्षी पेस्टल आणि मेटॅलिक रंगांच्या कपड्यांचा ट्रेंड बघायला मिळत आहे. पारंपरिक वस्त्रांबरोबरच आधुनिक रंगसंगती, आरामदायक फॅब्रिक आणि नवीन डिझाईन्स ग्राहकांना आकर्षित करत आहेत. यंदा ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही विक्री प्रकारांमध्ये वाढ झाली आहे. डायरेक्ट-टू-कंज्युमर प्रकारच्या विक्रीत २५ टक्के वाढ दिसत आहे. ही आकडेवारी ग्राहकांचे ऑनलाइन खरेदीचे प्राधान्य दर्शवते. घरगुती खरेदीमध्ये कपडे, सजावटीच्या वस्तू, दिव्यांचे सेट्स, गिफ्ट पॅक्स आणि फराळ यांचा समावेश मोठ्या प्रमाणावर दिसतो आहे. कॉर्पोरेट गिफ्ट्समध्ये पारंपरिक मिठाईऐवजी आरोग्यदायी, लो-कॅलरी मिठाई, ड्रायफ्रूट्स, कस्टमाइज्ड गिफ्टस, ग्रीन पॅकेजिंग अशा नव्या प्रकारच्या भेटवस्तूंचा समावेश केला जात आहे. घरगुती पातळीवरही लोक मित्र, नातेवाईक आणि जवळच्या व्यक्तीसाठी भेटवस्तू निवडताना पारंपरिक आणि आधुनिक वस्तूंचा संगम करताना दिसत आहेत. गिफ्ट हॅम्पर्समध्ये फराळ, सजावटीच्या वस्तू आणि घरगुती उपकरणांचा समावेश करून अधिक आकर्षक स्वरुप देण्याचा प्रयत्न प्रकर्षाने जाणवणारा आहे.


यंदा फटाक्यांच्या बाजारात उत्साह असला तरी पर्यावरणपूरकतेचा ठसा स्पष्ट दिसतो आहे. दिल्ली, मुंबई, पुणे आदी शहरांमध्ये धूर आणि आवाज करणाऱ्या फटाक्यांवर निर्बंध आहेत. त्याचबरोबर यंदा 'ग्रीन क्रॅकर्स'ची मागणी वाढली आहे. त्यामध्ये धूर आणि आवाज कमी असतो. मुलांच्या सुरक्षिततेसाठी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी ग्रीन क्रॅकर्सना विशेष प्रोत्साहन दिले गेले आहे. पारंपरिक फटाक्यांबरोबरच मल्टी-शॉट रॉकेट्स, आकाशदीप आणि झगमगाट करणाऱ्या फटाक्यांना यंदा मोठी मागणी आहे. काही ठिकाणी पावसामुळे पुरवठ्यावर परिणाम झाला असला तरी ग्राहकांचा उत्साह कमी झाला नाही. फराळाच्या बाजारातही यंदा मोठा बदल बघायला मिळतो आहे. करंजी, चकली, लाडू, शंकरपाळे आदी पारंपरिक पदार्थ अजूनही लोकप्रिय आहेतच, पण फ्युजन पदार्थांची मागणीही झपाट्याने वाढली आहे. जसे की आता बाजारात चॉकलेट करंजी, चीज लाडू, ड्रायफ्रूट्ससह सजवलेले लाडू, पिस्ता रोल्स यासारखे पदार्थ ग्राहकांना आकर्षक वाटत आहेत. आरोग्याचा विचार करणाऱ्या लोकांसाठी कमी तेलातील, बेक केलेले कवा साखरमुक्त पदार्थ उपलब्ध आहेत. सोशल मीडियावरुन होम शेफ्स, लघुउद्योग आणि छोटे व्यावसायिक फराळविक्रीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. ऑनलाइन ऑर्डरिंगमुळे ग्राहकांना घरबसल्या फराळ मिळत असून त्याचा व्यापारी लाभ नोंद घेण्याजोगा म्हणावा लागेल.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे वाहनांच्या खरेदीतही यंदा कमालीचा उत्साह दिसतो आहे. दसऱ्यापासूनच या बाजारातील चहलपहल वाढली असून शहरी भागात इलेक्ट्रिक स्कूटर्स, कॉम्पॅक्ट ई-कार्स आणि नवीन मॉडेल्ससाठी ग्राहक मोठ्या संख्येने खरेदी करत आहेत. ग्रामीण भागात दुचाकी वाहनांचा ओघ जास्त असून नवीन डिझाईन्स आणि सुविधा पाहता त्यामध्ये खरेदीचा स्तर वाढलेला दिसतो आहे. सरकारकडून दिल्या जाणाऱ्या सबसिडीज, इंधनदरातील बदल आणि पर्यावरणपूरक वाहनांसाठी प्रोत्साहन यामुळे ग्राहक अधिक सजग आणि पर्यावरणपूरक पर्याय निवडताना दिसत आहेत. एकंदरच, नवीन ट्रेंड्समध्ये पारंपरिक आणि आधुनिकतेचा संगम दिसत असून हे बदलत्या समाजाचे आश्वासक चित्र असल्याचेही आपण म्हणू शकतो. भेटवस्तू, फराळ, फटाके, सजावटीच्या वस्तू, वाहन खरेदी अशा सर्वच क्षेत्रात नवकल्पना, पर्यावरणपूरकता, आरोग्यदायी उत्पादनांचा समावेश समाजाची वाढती समज दाखवून देत आहे. ग्राहकांच्या बदललेल्या सवयींना प्रतिसाद देण्यासाठी विक्रेते सतत नवे प्रयोग करत आहेत. वाढती ऑनलाइन खरेदी, सोशल मीडियाचा प्रचंड प्रभाव आणि कस्टमाइज्ड उत्पादनांची मुबलक उपलब्धता हे यंदाच्या दिवाळीच्या बाजारातील महत्त्वाचे घटक सांगता येतील.

✦✦✦

# दिवाळी, पोटपूजेचाही उत्सव

**दिवाळी हा प्रकाशाचा सण आहे तसेच शरीर उर्जावान ठेवणाऱ्या अन्नब्रह्माप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचीही ही संधी आहे. या काळातील बदलत्या ऋतूमधली आदर्श आहारपद्धती दिवाळीमध्ये देवाला दाखवल्या जाणाऱ्या नैवेद्यातून सांगितली जाते. त्यामुळे पुढचे काही महिने त्याचा अवलंब करायला हवा. याबरोबरच बदलती जीवनशैली लक्षात घेता दैनंदिन आहार ठरवतानाही काही बाबी लक्षात घ्यायला हव्या. त्यासंबंधी...**



विशेष

विष्णू मनोहर, प्रसिद्ध बल्लवाचार्य

दीपावलीनिमित्त सर्व वाचकांना मनःपूर्वक शुभेच्छा... हा सण दिव्यांचा आहे, नात्यांना उजाळा देण्याचा आहे तसाच तो नानाविध पक्वान्नांच्या सेवनाने तृप्त होण्याचाही आहे. त्यामुळेच खाणे आणि खुलवणे यात रमणाऱ्या माझ्यासारख्या व्यक्तीसाठी या सणाचे वेगळे महत्त्व असणे स्वाभाविक म्हणायला हवे. माणूस जगण्यासाठी खातो, हे खरे असले तरी बरेचदा उलटेही दिसते, कारण खाण्यासाठी जगणाऱ्यांची संख्याही कमी नाही. अर्थात त्यात वावगे काही नाही. अन्नाचा आस्वाद घेण्यासाठी रसिकता आवश्यक असते. मात्र आपल्या कार्यपद्धतीचा अभ्यास करत योग्य प्रकारचा आहार निवडणे ही काळाची गरज असल्याचे आता प्रत्येकाने समजून घ्यायला हवे. म्हणूनच आज पदार्थ, ते तयार करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती, सेवन करण्याची योग्य वेळ आदी विषयांच्या वळणावर न जाता चर्चा काही वेगळ्या विषयांच्या दिशेने नेऊ या. सध्याचा काळ व्यस्ततेचा आहे. कामाच्या धबडग्यात खाण्यापिण्याचे भान हरपण्याचा आहे. जीवनशैलीनुसार काहींचा आहारही बदलताना दिसतो. मात्र आहारातील हा बदल जास्त काळ टिकत नाही, हेदेखील मी इथे नमूद करु इच्छितो. 'नव्याचे नऊ दिवस...' या उक्तीचे



प्रत्यंतर इथे येते. आमच्या घरातील उदाहरणावरुन मी हे विधान करतो आहे.

आमचे एकत्र कुटुंब असून घरात एकूण सहा तरुण मुले आहेत. त्यांचे बालपण, तरुणपण आणि तिशीनंतरचे आयुष्य मी जवळून बघतो आहे. बालपणी घरात शिजेल ते अन्न त्यांना आवडायचे. पोळी, भाजी, पराठा असे सामान्य भोजन आणि फार फार तर बदल म्हणून पनीर, इडली यासारखे पदार्थ त्यांना मिळायचे. पण नंतर त्यांची आवड बदलली. पिझ्झा, बर्गर, वेगवेगळे पास्ता प्रकार त्यांच्या ताटात आले. वयाच्या वीस-बावीस वर्षांपर्यंत या घटकांची चलती राहिली. पण ही मुले अमेरिकेला गेली आणि तेथे हेच अन्न वारंवार खावे लागले, तेव्हा मात्र त्यातील मजा हरवली. त्यानंतर 'हेल्दी' खाण्याकडे त्यांचा कल वाढला. स्वाभाविकच वरण-भाताची आठवण येऊ लागली आणि मग कुकर कसा लावायचा, कणिक कशी भिजवायची हे विचारण्यासाठी आम्हाला फोन येऊ लागले. ही आमच्या घरातीलच नव्हे, तर परदेशी गेलेल्या वा कामानिमित्त दुसऱ्या शहरात राहणाऱ्या प्रत्येक युवक-युवतीच्या घरातील गोष्ट असेल. आज जवळपास ८० टक्के तरुणाई पुन्हा एकदा भारतीय भोजनपद्धतीकडे वळली आहे. शेवटी नव्याचा शोध घेणे, नवी चव चाखून बघणे, त्याचा आनंद घेणे याची गरज असतेच. काळानुरुप ते होतही असते. आजचा तुमचा शोध उद्याची परंपरा असते, असे मी नेहमी म्हणतो. कारण आजच्या पारंपरिक पाककृतींआधीही काही ना काही होतेच. त्यामुळे लोकांनी नव्या खाद्यसंस्कृतीची ओळख करुन घेण्यात गैर काहीच नाही. मी जंक फूड्या विरोधकही नाही. फक्त ते किती खायचे याचे भान असायला हवे. महिन्यातून एकदा ते खाल्ले तर हरकत नाही. पण त्याच्या प्रेमापोटी आरोग्याला उपकारक अन्नघटक बाजूला ठेवणे योग्य नाही.

बदलत्या जीवनशैलीचा एक परिणाम वाढत्या ताणतणावाच्या रुपाने आपण अनुभवत आहोत. दुसरीकडे पोटात जाणाऱ्या सकस, चविष्ट, सुग्रास अन्नामुळे तणावाची पातळी कमी होते, हेदेखील आपण जाणतो. म्हणूनच या दोहोचा संबंध जाणून घेण्याची गरज आहे, असे मला वाटते. प्रत्येकाचे काम वेगळे असते. कोणाला बसून काम करावे लागते तर कोणाचे शारीरिक हालचालीशिवाय काम होत नाही. तेव्हा आहाराचा विचार करताना प्रत्येकाने आपले काम, त्याचे स्वरुप आधी समजून घ्यायला हवे आणि त्याला पूरक आहार घ्यायला हवा. हे लक्षात घेऊन आम्ही काही खाद्यपदार्थ, डाएट प्लान तयार केला आहे. उष्मांक, प्रोटीन, व्हिटॅमिनचा पुरवठा कोणास किती हवा हे लक्षात घेऊन, त्यावर काम करुन या रेसिपी केल्या आहेत आणि त्या लोकांना आवडत आहेत. खेरीज आता बऱ्याच रेस्टॉरंटमध्येही 'पॉवर फूड' ला प्राधान्य दिल्याचे दिसत आहे. अशा पॉवर फूडमध्ये मखाना, वेगवेगळ्या बियांचा वापर करुन अन्नघटक तयार केले जातात. या पॉवर फूडचा आस्वाद घेण्यास हरकत नाही. पण केवळ हेच योग्य आणि आपले पारंपरिक जेवण अयोग्य असे समजण्याचे काहीच कारण नाही. त्यातही तेवढेच सत्व आहे. हे आपण नाही, तर अगदी अमेरिकेतील आहारतज्ज्ञांनीही मान्य केले आहे. भारतातील, विशेषत: महाराष्ट्रातील सात्विक थाळी हे जगातील सर्वोकृष्ट अन्न असल्याचे तेथील आहारतज्ज्ञ म्हणतात. पानामध्ये डावीकडील सगळ्या चटण्या, उजवीकडल्या भाज्या, पोळी-भाकरी-भात हे सगळेच घटक आरोग्यासाठी अत्यंत लाभकारक आहेत. म्हणूनच त्यांच्याकडे पाठ फिरवणे योग्य नाही.

बदलत्या जीवनशैलीमध्ये बाहेर खाण्याचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे, हे मान्य करावेच लागेल. आठवड्याच्या अखेरीस, सणानिमित्त वा एरवीही हॉटेलमध्ये जाणे होते. हा कदाचित काळाचा महिमा म्हणावा लागेल. पण तो स्विकारणे अपरिहार्य असेल तर किमान हॉटेल, रेस्टॉरंटची निवड तरी काळजीपूर्वक करायला हवी. केवळ एखाद्या ठिकाणची चव आवडते म्हणून तिथे वारंवार जाणे चूक ठरेल. हे करताना आधी उल्लेख केल्याप्रमाणे खिश्याची परवानगी असेल तर पॉवर फूड देणाऱ्या ठिकाणांना प्राधान्य द्यावे. खेरीज सध्या प्रत्येक हॉटेलची माहिती ऑनलाईन उपलब्ध असते. त्यामुळेच तेथे कोणते अन्नघटक मिळतात, ते कसे तयार केले जातात, आरोग्याच्या दृष्टीने त्याच्या सेवनाचे गुण-दोष काय, त्या ठिकाणाला ग्राहकांची पसंती कशी आहे, ग्राहकांनी त्यावर काय प्रतिक्रिया दिल्या आहेत हे सगळे एका क्लिकवर बघता येते. म्हणूनच याची खातरजमा करुनच हॉटेल, रेस्टॉरंटची निवड करायला हवी. तुम्हाला बऱ्याचदा पार्टीला जावे लागत असेल तर वेगळा विचार गरजेचा ठरतो. बरेचदा पार्टीवेळी सकस खाण्याकडे अंमळ दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती असते. लोक तिथल्या अन्नाची, वातावरणाची मजा घेऊ इच्छितात. मात्र ठराविक अन्नाप्रती आग्रही असणाऱ्या लोकांनी पार्टीला जाण्यापूर्वी घरी जेवणे योग्य ठरते. सध्या २० टक्के लोक असे बघायला मिळतात. ते घरी जेवतात आणि अगदी माफक खात पार्टीची मजा घेतात.

मी अमेरिकेत गेल्या चार-पाच वर्षांपासून रेस्टॉरंट चालवत आहे. तेथे माझी चार रेस्टॉरंट आहेत. तेव्हा तिथला अनुभवही वाचकांसमोर उलगडायला आवडेल. सुरूवातीचे काही दिवस आम्ही तिथे केवळ हेल्दी फूड देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र हा ट्रेंड तिथे अजिबात चालला नाही, कारण लोकांना आरोग्यदायी अन्नाबरोबर काही ना काही चटपटीतही हवे होते. हे लक्षात घेऊन मेन्यूमध्ये हा बदल करावा लागला. विशेषत: तरुणाई अशा फ्युजन प्रकाराला प्राधान्य देत असल्याचे लक्षात आले. त्यांना ताटामध्ये नव्या-जुन्या चवीचे मिश्रण हवे असते. पण कितीही प्रयोग केले, वेगवेगळे प्रकार चाखले तरी अनेकांच्या जेवणाचा शेवट दालफ्राय, जिरा राईसवर होतो हे ही आवर्जून सांगावेसे वाटते. ते खाल्ल्याशिवाय पोट भरल्यासारखे वाटत नाही. केवळ भारतीयच नव्हे तर आमच्या ग्राहकवर्गातील २० टक्के स्थानिक असतात. त्यांना आपली चव आवडते तेव्हा आनंद होतो. दुसरे म्हणजे आपले लोक जगभर पसरले असल्यामुळे आता आपले अन्नघटक अनेक देशांमध्ये पोहोचले आहेत. भारतीयांचे खूप जास्त प्रमाण असणाऱ्या अमेरिका, लंडन, जपान, चीन, दुबई अशा देशांमध्ये तर भारतीय हॉटेल्स अगदी सहज बघायला मिळतात. या ठिकाणी ग्राहकांच्या आवडीनुसार पदार्थ बनवले जातात.



माहोल दिवाळीचा आहे. हा ऋतूबदलाचाही काळ आहे. तेव्हा या काळातील आहाराबद्दल बोलायला हवे. खरे तर आपले सगळे सण बदलत्या ऋतूप्रमाणे आहार घेण्याचे सूचित करत असल्यामुळे ज्या त्या काळात शरीराला आवश्यक ठरणारे अन्नघटक पुरवण्याची सोय सणांनीच केली आहे. दिवाळीही त्याला अपवाद नाही. सुगीचा काळ असल्यामुळे या काळातील पदार्थांमध्ये हात थोडा सैल सोडलेला दिसतो. फराळाच्या पदार्थांमध्ये नानाविध घटकांचा उपयोग होतो. आता त्यातही फ्युजन बघायला मिळत आहे. एअर फ्रायरसारख्या यंत्रांनी तर जणू क्रांती घडवून आणली आहे. आता एअर फ्रायरमध्ये बेक केलेले पदार्थ दिवाळी फराळामध्ये समाविष्ट होत आहेत. कबहुना, हे लेबल लावून लोक फराळ विकत आहेत. त्याचबरोबर पारंपरिक फराळामध्ये आता विभिन्न देशांमधील, राज्यातील पदार्थही वाढत आहेत. जसे की, आता मध्यपूर्वेतील मिठाया आपल्याकडे सहजतेने दिसतात. अमेरिकेतील पाकाशी संबंध असणारे बेकरी पदार्थ आवडीने खरेदी केले जातात. चिवडा, लाडू, चकली, शेव या ठराविक पदार्थांबरोबर आता दिवाळीच्या दिवसात हॉटेलमध्ये अन्य पदार्थांचा मोठा बफे लागतो. आमच्या 'रसोई'मध्येच जवळपास १४० प्रकारच्या शेव, चिवडा, चकलीचा स्टॉल लावलेला आहे. हवे तर खा, नाही तर विकत घेऊन जा, असे आम्ही सांगतो. शेवटी दिवाळी हा खाण्याचाही उत्सव आहे. त्याचा भरभरुन आनंद घ्यायलाच हवा.

✦✦✦

# 'मिसेस युनिव्हर्स' जिंकत भारताची दिवाळी!




**एका विवाहित भारतीय महिलेला मिसेस युनिव्हर्सचा किताब जिंकताना पाहण्यासाठी भारताने बराच काळ वाट पाहिली. अलिकडेच शेरी सिंग हा आंतरराष्ट्रीय किताब जिंकणारी पहिली भारतीय ठरली. तिच्या विजयाने लाखो भारतीयांना अभिमान आणि आनंद दिला. हा विजय केवळ सौंदर्याचा नव्हता; तर आत्मविश्वास, कसब आणि भारतीय समाजातील बदलांचा होता. जणू दिवाळीचा आनंद द्विगुणीत झाला!**

खास बात

अश्विनी पारकर

देश जल्लोशात दिवाळी साजरी करत असला तरी शेरी सिंगच्याअ घरी दिवाळी काहीशी लवकरच आली. ऑक्टोबर २०२५ च्या एका सुंदर संध्याकाळी एका चिमुकल्याची आई आणि व्यावसायिक असलेल्या शेरी सिंग या भारतातीय सौंदर्यवतीला मिसेस युनिव्हर्स हा किताब देण्यात आला. हा क्षण टीव्हीवरुन अनुभवणाऱ्या भारतातीयांनी टाळ्या वाजवल्या आणि जल्लोष केला. अतिशय अभिमानास्पद अशा क्षणाची भारताने बरीच वर्ष वाट पाहिली होती. पण ही घटना फक्त एका मिसेस युनिव्हर्स या किताबापुरतीची मर्यादित नाही. हा मुकुट परिधान करण्यासाठी भारतीय विवाहित महिलेला इतकी वाट का पहावी लागली आणि हे यश यापुढेही साजरे व्हावे म्हणून कोणत्या बदलाची आवश्यकता आहे, याची कारणमिमांसा करणे आवश्यक आहे. आनंदोत्सवाची ही दिवाळी या आधीही साजरी करता आली असती, पण तसे घडले नाही. वर्षानुवर्षे, जागतिक सौंदर्यस्पर्धांसाठी योग्य प्रशिक्षण, पाठिंबा आणि प्रोत्साहन मिळवण्यात भारतीय महिलांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागले. शेरीच्या यशावरुन भारत किती पुढे आला आहे आणि योग्य संधी मिळाल्यास भारतीय महिलांमध्ये किती क्षमता आहे हे दिसून येते. आजचे सौंदर्य हे दिसण्यापेक्षा व्यक्तीची प्रतिभा, शिक्षण, दयाळूपणा आणि सामाजिक जाणीव यामध्ये जास्त सामावलेले आहे, हे तिची कामगिरी आपल्याला दाखवून देते. शेरी सिंगचा विजय भारताच्या प्रगतीचे आणि जगातील भारतीय महिलांच्या वाढत्या आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. मूळ मुद्दयाला हात घालण्याआधी मिसेस युनिव्हर्स म्हणजे काय हे जाणून घेऊ. मिस वर्ल्ड, मिस युनिव्हर्स या अविवाहीत कुमारी तरुणींच्या सौंदर्यस्पर्धा आहेत, तर मिसेस युनिव्हर्स ही विवाहित महिलांसाठी सौंदर्य आणि प्रतिभेची परिक्षा घेणारी स्पर्धा आहे. २००० च्या दशकात सुरू झालेल्या या स्पर्धेचा मुकुट २०२५ मध्ये पहिल्यांदा भारतीय स्त्रीच्या माथ्यावर विराजमान झाला आहे.

शेरीच्या विजयामागील कारणे विषद करताना इतर देश यासाठी काय करत होते, हे लक्षात घेणे महत्वाचे ठरते. अशा स्पर्धांसाठी महिलांना प्रशिक्षण मिळावे यासाठी अनेक देशांनी आधीच मजबूत व्यवस्था तयार केली आहे. विवाहित महिलांसाठी ती व्यवस्था तयार करण्यासाठी भारताला जास्त कालावधी लागला. त्यामुळे भारतात अनेक प्रतिभावान, सुंदर आणि समाजसेवी विवाहित महिला असतानाही इतर देशातील विवाहित महिलांच्या तुलनेत जगातील या सर्वोच्च स्थानावर पोहोचण्यासाठी त्यांच्यापर्यंत योग्य प्रशिक्षण, पैसा किंवा पाठिंबा पोहोचत नव्हता. ऐश्वर्या रॉय आणि सुश्मिता सेनमुळे भारत 'मिस वर्ल्ड' आणि 'मिस युनिव्हर्स'चा किताब जिंकून जगप्रसिद्ध झाला. त्यानंतर विजेत्या सौंदर्यवतींची रांग लागली. त्या विजेत्या मोठ्या चित्रपटस्टार आणि रोल मॉडेल बनल्या. पण त्यांच्या यशामागे त्यांच्या पाठीशी होते ते चांगले प्रशिक्षक, फॅशन तज्ज्ञ, मेकअप आर्टिस्ट आणि त्यांच्या टुर्स आणि प्रशिक्षणासाठी लागणारा खर्च उचलणारे प्रायोजक. मिसेस युनिव्हर्स स्पर्धेसाठी, या प्रकारची मदत खूप नंतर आली. आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी विवाहित महिलांना प्रशिक्षण देणारे लोक कमी होते. त्यामुळे भारतीय विवाहित महिलांनी अथक प्रयत्न करुनही इतर देशांसोबतच्या कठीण स्पर्धेत हार पत्करावी लागत असे.

सौंदर्यस्पर्धांचे नियमदेखील बदलत राहतात. पूर्वी विवाहित महिला आणि माता 'मिस युनिव्हर्स' स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकत नव्हत्या. पण आता त्या सहभागी होऊ शकतात. या नियम बदलांप्रमाणे स्पर्धेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या देशांनाही त्यांच्या प्रशिक्षणामध्ये अद्यावतता आणणे आणि निवडप्रणालीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. भारतासारख्या देशांमध्ये हे बदल हळूहळू होतात. त्यामुळे जिंकण्यासाठीही बराच कालावधी लागला. त्याचप्रमाणे भारतीय समाजाची अशा स्पर्धांबद्दल असलेली नीरस मानसिकताही एकूण दुर्लक्षिलेपणाला बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. या अशा सौंदर्य स्पर्धांमध्ये लोकांना फारसा रस नव्हता. अनेकांना या स्पर्धा अगदी आजही महत्त्वाच्या नाहीत, असे वाटते. सौंदर्यास्पर्धा म्हणजे केवळ बाह्यसौंदर्याचा देखावा असाही समज आहे. त्यामुळे अनेक प्रायोजक आणि आयोजक अशा स्पर्धांवर खर्च करणे टाळतात. अशा प्रकारे न मिळणारा आर्थिक पाठिंबा आणि एकूणच या क्षेत्राकडे पाहण्याचा कलुषित दृष्टीकोन यामुळे जागतिक स्तरावर या स्पर्धेमध्ये ठसा उमटवणे कठीण ठरत होते. तसेच या स्पर्धेसाठी केल्या जाणाऱ्या मतदानावर बऱ्याच गोष्टींचा प्रभाव असतो. आपल्या देशाचे आंतराष्ट्रीय संबंध कसे आहेत, ज्या देशात स्पर्धा आयोजित केली जाते तेथील स्पर्धकांची निवड करणाऱ्यांची मानसिकता कशी आहे हे समजून घेणेही महत्वाचे होते. पूर्वी भारताचे 'मिसेस युनिव्हर्स' स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मजबूत आंतरराष्ट्रीय संबंध नव्हते. त्यामुळेही हा किताब आपल्या देशापासून लांब राहिला. मात्र आता भारताची या क्षेत्रात होणारी आगेकूच या यशाचे एक कारण ठरते.

सध्या सोशल मीडियामुळे एक क्रांती झाली आहे. त्यामुळे मेकअप कसा करावा, रॅम्प वॉक करण्यापासून आपले हावभाव, आपल्या शरीराची ढब कशी असावी इथपासून आपले व्यक्तिमत्व कसे सुधारावे आणि सौंदर्यस्पर्धांसाठी लागणारी सगळी कौशल्ये कशी आत्मसाद करावीत, हे शिकता येते. अर्थात सोशल मीडियाने शेरीच्या विजयानंतर अनेक अफवाही पसरवल्या आहेत. शेरी सिंग जिंकल्यानंतर काही लोकांनी चुकीची माहिती ऑनलाइन पोस्ट करण्यास सुरुवात केली. या चुकीच्या माहितीमुळे प्रायोजक यापुढील स्पर्धांना पाठिंबा देण्यासाठी कचरतील. हे या स्पर्धांच्या पथ्यावर पडणारे नाही. तरीही हा विजय सकारात्मक आहे, कारण याआधीच्या अपयशातून भारत खूप काही शिकला आहे आणि २०२५ च्या यशाने भारताचा आत्मविश्वास वाढला आहे. १९९४, २०००, २०२१ आणि आता २०२५ मध्ये भारताने जागतिक स्तरावरचे अविवाहित सौंदर्यवतींचे मुकुट जिंकले, तेव्हा त्यामागे मोठा संघर्ष होता. प्रशिक्षक, फॅशन डिझायनर्स, मेकअप आर्टिस्ट, प्रायोजक, स्पर्धकांना पाठिंबा देणारी कुटुंबे यांची कुमक होती. तरीही आपण अशा स्पर्धा जिंकूच अशी अपेक्षा दर वेळी करणे चुकीचे आहे. आता स्पर्धेच्या मानांकनामध्ये केवळ सौंदर्य हा निकष नसून स्पर्धकांची प्रामाणिकता, मुलाखत कौशल्य, प्रतिभा, सामाजिक जाणीव, विशेष म्हणजे त्यांनी केलेली समाजसेवा याला महत्व दिले जाते. स्पर्धेचे निवडकर्ते आता समाजाला मदत करू इच्छिणाऱ्या वास्तविक जीवनातील नायिकांचा शोध घेतात. भारतातील स्पर्धा आयोजकांनीही उत्तम आत्मविश्वास असणाऱ्या सुशिक्षित महिलांची निवड करण्यास सुरुवात केली आहे.

शेरी सिंगचा विजय खास आहे. हा केवळ एका सौंदर्यस्पर्धेबद्दल नाही, तर भारतीय विवाहित महिलेचा विजय आहे. आपण समाज म्हणून प्रगल्भ होत राहीलो तर अशा यशाला गवसणी घालू शकतो,



हीच शिकवण या विजयातून मिळते. शेरी सिंगने स्पर्धेदरम्यान मानसिक आरोग्य, स्त्रियांचे प्रश्न यावरही प्रकाश टाकला. भारतातील मानसिक आरोग्याबद्दलची अनास्था लक्षात घेता एका भारतीय, त्यातही विवाहित महिलेने याबद्दल व्यक्त होण्यातच ती एक माणूस म्हणून किती सजग आहे हे अधोरेखित होते. मोठ्या व्यासपीठावरील एका विवाहित महिलेच्या यशामुळे आता इतर अनेक विवाहित महिलांसाठी संधीचे नवीन दरवाजे उघडले आहेत. स्वप्नांना वय किंवा वेळेची मर्यादा नसते; त्यांना फक्त धैर्य, संयम आणि कधीही हार न मानण्याची जिद्द हवी असते, हे शेरी सिंगने हे सिद्ध केले. त्यामुळे या निमित्ताने मिळणारा संदेश सोपा आहे. आपण प्रयत्न करत राहतो आणि शिकत राहतो तेव्हा यश मिळतेच. त्याला थोडा जास्त वेळ लागला तरीही... शेरी सिंग हा मिसेस युनिव्हर्स जिंकणारी पहिली भारतीय महिला आहे. तिने 'मिसेस इंडिया २०२५'चा किताबही जिंकला आहे. व्यावसायिक असलेली शेरी एका मुलाची आई असून तिचे पती रिअल इस्टेट व्यावसायिक आहेत. हा किताब जिंकण्यासाठी शेरीने बराच काळ संघर्ष केला. या संघर्षाबाबतही ती व्यक्त झाली. तब्बल १२० विवाहित महिला स्पर्धकांमधून शेरीने हा किताब जिंकला. ही कामगिरी सजगतेची, सक्षमतेची साक्ष देणारी आहे आणि म्हणूनच दिवाळीचा एक वेगळा आनंदोत्सव साजरा होत असेल तर आश्चर्य ते काय!

✦✦✦

# प्रकाशातून परिपूर्णतेकडे नेणारी सांस्कृतिक यात्रा म्हणजे दिवाळी..!



भारतीय संस्कृतीची परंपरा ही पर्व-पर्वण्यांनी सजलेली आहे. या पर्वांमध्ये दिवाळी म्हणजे केवळ उत्सव नव्हे, तर आत्मोन्नतीचा प्रवास आहे. दीपप्रज्वलन करून जीवनाचा अंधःकार घालवणे, समाजजीवनातील बंध दृढ करणे, श्रमांचा सन्मान करणे, नात्यांतील ऊब वाढवणे आणि देवतेच्या स्मरणातून मूल्यांची शिकवण घेणे या सर्वांचा संगम म्हणजे दिवाळी,दीपावली होय.

**दिवाळीची उत्पत्ती : कोकणातील आरंभ**

लोकपरंपरांनुसार कोकण प्रांतात दिवाळीचे मूळ स्वरूप आढळते. शरद ऋतूतील पिकाची कापणी झाल्यावर शेतकऱ्यांच्या घराघरात भरभराट येई. पीकघरात धान्य भरले, अंगणात गाई-गुरे खूश झाली, तर आनंदोत्सव साजरा होणे साहजिकच होते. या आनंदाला धार्मिक रंग देऊन दीपोत्सवाची सुरुवात झाली.

दीप लावा, अंधार पळवा हा संदेश कोकणातून संपूर्ण भारतात पोहोचला. पुढे पुराणकथा, पौराणिक आख्यायिका, सामाजिक संस्कार यामुळे दिवाळीचे रूप अधिक वैविध्यपूर्ण झाले.

**धनत्रयोदशी : आरोग्यसंपन्नतेचा दिवस**

दिवाळीची सुरुवात धनत्रयोदशी पासून होते.आयुवेर्दाचार्य धन्वंतरी यांचा समुद्र मंथनातून अमृतकुंभासह उदय झाला, अशी आख्यायिका आहे. म्हणूनच या दिवशी आरोग्य व औषधोपचार यांचे महत्त्व मान्य केले जाते.

या दिवशी नवे धान्य, धातूची भांडी, सोने-चांदी विकत घेण्याची परंपरा आहे. हे केवळ धनप्राप्तीचे प्रतीक नाही, तर आरोग्य हाच खरा धनसंचय या विचाराचे द्योतक आहे. व्यापाऱ्यांसाठी हा दिवस विशेष मानला जातो. लेखापुस्तकांची पूजा करून, व्यवहारातील प्रामाणिकपणाचा संकल्प केला जातो. धनत्रयोदशी आपल्याला सांगते की संपत्तीची खरी मोजणी नाण्यांत नसून निरोगी आयुष्य, मेहनतीचा घाम आणि सदाचारात आहे.

**नरक चतुर्दशी : अंधःकाराचा पराभव**

या दिवशी श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला, अशी कथा आहे.नरकासुर म्हणजे केवळ राक्षस नव्हे, तर मनातील अज्ञान, दुष्ट विचार, मत्सर यांचे प्रतीक आहे. पहाटे लवकर उठून उटणे लावून अभ्यंगस्नान करण्याची परंपरा आहे. यामुळे शारीरिक शुद्धीसोबतच मानसिक प्रसन्नता मिळते. घराघरात दिव्यांच्या रांगोळ्या, फुलांची सजावट केली जाते.

नरक चतुर्दशीचा खरा अर्थ आहे मनातील नरक जाळून टाकणे आणि सद्गुणांचा प्रकाश पेटवणे.

**लक्ष्मीपूजन : श्रम आणि संपत्तीचे पूजन**

दिवाळीतील सर्वात महत्त्वाचा दिवस म्हणजे लक्ष्मीपूजन. व्यापारी वर्ग या दिवशी जुनी खाती बंद करून नवे हिशेब सुरू करतो.घराघरात लक्ष्मी देवीची पूजा केली जाते. पण खरी लक्ष्मी म्हणजे सोन्याची नाणी नव्हे; ती म्हणजे प्रामाणिक श्रम, शुद्ध कमाई आणि घरातला शांततेचा दिवा.

या दिवशी दीपमाळा लावून देवीला आमंत्रण दिले जाते. प्रत्येक खिडकीत, अंगणात दिवे लावले जातात. लक्ष्मीपूजन हा केवळ धनपूजनाचा विधी नसून नीतिमान उपार्जन आणि सदुपयोग या संस्कारांचा उत्सव आहे.

**बलिप्रतिपदा : बळीराजाचा गौरव**

लक्ष्मीपूजनानंतरचा दिवस म्हणजे बलिप्रतिपदा किंवा दीपावली पाडवा.बळीराजा हा प्रजेला न्याय देणारा, दानशूर आणि दयाळू राजा होता. विष्णूने वामनावतार धारण करून त्याला पाताळात पाठवले, पण त्याच्या प्रजास्नेहामुळे वर्षातून एकदा पृथ्वीवर येण्याची परवानगी दिली. म्हणूनच लोक या दिवशी म्हणतात, इडा पिडा जावो, बळीचं राज्य येवो.

या दिवशी वसुबरस व गोवर्धन पूजा केली जाते. गोधनाचे पूजन करून शेतकरी त्यांच्या उपकारांची कबुली देतात. बलिप्रतिपदा आपल्याला स्मरण करून देते की खरी सत्ता ही प्रजेच्या हितासाठी असावी. दान, समानता व न्याय या मूल्यांचा हा दिवस आहे.

**दीपावली पाडवा : दांपत्य नात्याचा उत्सव**

पाडव्याच्या दिवशी स्त्रिया पतीला औक्षण करतात, तर पती पत्नीला भेटवस्तू देतो. यामुळे पती-पत्नीमधील स्नेहबंध दृढ होतात. या दिवशी दांपत्याने एकमेकांप्रती कृतज्ञता व्यक्त करून परस्परांचा सन्मान करावा, ही खरी शिकवण आहे.

**भाऊबीज : स्नेहाचे पवित्र बंधन**

दिवाळीचा शेवटचा दिवस म्हणजे भाऊबीज.बहिणीने भावाला औक्षण करून दीघार्युष्याची प्रार्थना करणे, भावाने बहिणीला भेटवस्तू देणे ही परंपरा आहे.या दिवसामागे यम-यमुनाची कथा सांगितली जाते.

यमुनाने भावाला औक्षण करून त्याला दीघार्युष्याची कामना केली. भाऊबीज आपल्याला भावंडांतील प्रेम, परस्परांची साथ आणि कौटुंबिक ऐक्य टिकवून ठेवण्याची प्रेरणा देते.

**दिवाळी सुरू करण्यामागील उद्देश**

दिवाळीतील प्रत्येक दिवसाचे वेगळे महत्त्व असले तरी तिचा सामूहिक उद्देश एकच आहे आत्मिक प्रकाश प्रज्वलित करणे. अज्ञानाचा अंधःकार दूर करणे. संपत्ती व श्रमाचा सन्मान करणे. न्याय, समानता व प्रजाहित रुजवणे. कौटुंबिक ऐक्य बळकट करणे. यामुळेच दिवाळी ही केवळ धार्मिक किंवा सामाजिक घटना नसून जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राला दिशा देणारी सांस्कृतिक शिदोरी आहे.

**आधुनिक काळातील दिवाळी : बदलते स्वरूप**

आज दिवाळीचा चेहरा बदलला आहे. फटाक्यांचा गडगडाट, महागड्या खरेदीची धावपळ, दिखाऊ सजावट यामध्ये तिचा मूळ संदेश हरवतो आहे. पण आपण लक्षात ठेवले पाहिजे की,खरी दिवाळी फुलांच्या रांगोळीत, गंधी उटण्यात, स्नेहभेटीत आणि दीपप्रज्वलनात आहे. दिवाळी म्हणजे आनंद वाटण्याचा, नाते दृढ करण्याचा आणि जीवनातील अंधार घालवण्याचा उत्सव आहे.

**प्रकाशातून उन्नतीकडे**

दिवाळी ही प्रकाशयात्रा आहे. कोकणातील शेतीसंस्कृतीपासून सुरू झालेली ही परंपरा आज जगभर पसरली आहे. तिचा गाभा मात्र तोच आहे.

तमसो मा ज्योतिर्गमय

अंधःकारातून प्रकाशाकडे नेणारा हा दीपोत्सव प्रत्येकाच्या जीवनात नवा उमेद, नवी प्रेरणा, नवा आनंद निर्माण करतो.

दीपावलीच्या शुभेच्छा!

मनातील अंधार नाहीसा होवो,

घराघरात आरोग्य, आनंद, समृद्धी व ऐक्य नांदो,

आणि प्रत्येकाच्या जीवनात खऱ्या अर्थाने बळीचं राज्य अवतरू दे. अशा या पवित्र दीपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

■ ■


गजानन हरणे

वारकरी समाजसेवक

खडकी, अकोला.

9822942623




## मतदारयादीतील घोळ चव्हाट्यावर


सुकृत खांडेकर

मुंबई.


गेल्या वर्षी २०२४ मधे विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर भाजपा, शिवसेना ( शिंदे ) व राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार ) अशा महायुतीला विक्रमी बहुमत मिळाले.

२८८ जागांच्या विधानसभेत २३५ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले. लोकसभा निवडणुकीत राज्यात महायुतीला मोठा फटका बसला होता, मग अवघ्या चार सहा महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला एवढे आश्चर्यकारक यश कसे मिळाले हे एक गूढ होते.

राज्यात महायुतीला प्रचंड यश मिळाल्यावरही फारसा कुठे जल्लोश झाला नाही, जंगी विजयी मिरवणुका निघाल्या नाहीत, आपण एवढ्या मतानी कसे निवडून आलो याचे अनेक उमेदवारांना आश्चर्य वाटले. निकालानंतर काँग्रेस, उबाठा सेना, राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार ) या पक्षांना नैराश्याने घेरले होते. मतदार याद्यांतील घोळ मात्र आता चव्हाटयावर येऊ लागला आहे.

काँग्रेसचे माजी मंत्री व माजी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात हे विधानसभेवर आठ वेळा तरी निवडून आले. संगमनेर मतदारसंघात त्यांचा जनाधार भक्कम आहे. सहकाराच्या माध्यमातून त्यांनी सारा मतदारसंघ जोडला आहे. दरवेळी ८० ते ९० हजार मतांनी निवडून येणाऱ्या बाळासाहेबांच विधानसभा निवडणुकीत लाखाने पराभव कसा होऊ शकतो?

वसई विरार मतदारसंघातून बहुजन विकास आघाडीचे सर्वेसर्वा हितेंद्र ठाकूर हे यापुर्वी सहा वेळा आमदार म्हणून निवडून आले. वसई विरार महापालिकेत तर त्यांचे पूर्ण वर्चस्व आहे. वसई विरार या पट्यात त्यांचे नेते व कार्यकर्ते यांचे अफाट जाळे आहे, मतदारसंघात त्यांचा घरोघरी थेट संपर्क आहे मग त्यांचा अवघ्या साडेतीन हजार मतांनी पराभव कसा होऊ शकतो ?

ही दोन उदाहरणे केवळ वानगी दाखल दिली आहेत. विविध राज्यात विधानसभा निवडणुकीत विशेषतः महाराष्ट्र, हरियाणामधे मतांची चोरी झाला या मुद्द्यावरून राहुल गांधी गेल्या तीन महिन्यांपासून राष्ट्रीय पातळीवर आवाज उठवत आहेत. आता महाराष्ट्रातील प्रमुख विरोधी पक्ष नेत्यांनी एकत्र येऊन सदोष मतदार यादीविरोधात मुंबईत आवाज उठवला आहे.

सत्ताधारी पक्षाचा एक आमदार जाहीर कार्यक्रमात आपण निवडणुकीत वीस हजार मते बाहेरून आणली असे बेधडकपणे कसा सांगू शकतो?

मतदार यादीत वयांमधे तफावत आहे, अनेकांची नावे दुबार आहे,चुकीचे पत्ते आहेत, छायाचित्रे गायब आहेत. बाहेरील राज्यातून आलेले विद्यार्थी महाराष्ट्रात मतदार कसे झाले?

महापालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा निवडणुकीत व्हिव्हीपीएटी असणार नाही असे निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे, मग हजारो कोटी रुपए खर्च करून ती खरेदी कशाला केली ?

आपण दिलेले मत कुणाला दिले हे इव्हिएमवर मतदाराला समजणार नाही. व्हिव्हिपीएटी नसेल तर पुरावे नष्ट होतील. मुळात अनेक स्थानिक स्वराज्य संस्थामधे गेली चार ते पाच वर्षे निवडणूक झालेली नाही आणि आता सदोष मतदार यादीवर निवडणूक घेण्याचा निवडणूक आयोगाचा अट्टाहास कशासाठी ? मुंबईत एक वॉर्ड एक नगरसेवक अशी निवडणूक होणार आहे. मग अन्य महापालिकांमधे एक प्रभाग तीन नगरसेवक कशासाठी ?

बहुसदस्य प्रभाग पध्दती रद्द करण्याची मागणी विरोधी पक्षांनी केली आहे. मुरबाडमधे एका घरात ४०० मतदार आहेत, बडनेरामधे एका घरात ४५० मतदार आहेत, कामठीमधे घराला क्रमांकच नाही पण तेथे ८६७ मतदारांची नोंद आहे, नालासोपारा येथे सुषमा गुप्ता या नावाची सहा वेळा मतदार म्हणून नोंद आहे मतदार यादीत नावे कोण घुसवतो व कोण काढून टाकतो ?

निवडणूक आयोगाचा सर्व्हर दुसरा कोणी ऑपरेट करीत आहे काय हा माजी प्रदेशाध्यतक्ष व माजी मंत्री जयंत पाटील याचा प्रश्न मार्मिक आहे. मतदार यादीत वडिलाचे वय लहान व मुलीचे वय जास्त अशी नोंद आहे, हे दुरूस्त करायचे नाही का ? निवडणूक आयोगासमोर दोन दिवस विरोधी पक्षांनी खूप आदळ आपट केली, त्यानंतर तरी मतदार यादीत सुधारणा होणार आहे का ?

सर्वाधिक व्यवहार डिजिटलवर होत असताना निवडणुकीची मतदार यादी डिजिटलवर का उपलब्ध नाही? राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर नेम धरून आरोपांची राळ उडवली पण पुढे काहीच झाले नाही. मग शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, जयंत पाटील (एनसीपी), बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील (शेकाप ), जितेंद्र आव्हाड, आदींनी विचारलेल्या प्रश्नानंतर मतदार यादीत सुधारणा होईल काय? जोपर्यंत सदोष मतदारयाद्या दुरूस्त होत नाहीत तोपर्यंत निवडणुका घेऊन नका, अशी भूमिका विरोधी नेत्यांनी मांडली आहे.

जनता मात्र संभ्रमात आहे.

■ ■

## जग एआयला आता मानतेय जादूची कांडी

कर्मचारी संख्या कमी होतेय, तरीही एआयमुळे चिंता नाही, श्रमशक्तीतील घट अमेरिकेच्या विकासाच्या क्षमतेला पाचव्या भागापेक्षा जास्त कमी करेल. तरीही या धोक्यावरची प्रतिक्रिया हळूहळू कमकुवत होत आहे.कारण एआयमुळे मानवी श्रमाची गरज कमी होईल.



अमेरिकेच्या अर्थ व्यवस्थेसाठी वाढत्या धोक्यांनंतरही तेथील मोठ्या कंपन्या आणि गुंतवणूकदार निश्चिंत दिसत आहेत. टेरिफ असोत, ढासळणारी इमिग्रेशन नीती, संस्थांची झीज, कर्ज किंवा सतत वाढत जाणारी महागाई असो, त्यांना काहीही अस्वस्थ करत नाही. कारण त्यांना पूर्ण खात्री आहे की आर्टिफिशियल इंटेलिजन्स इतकी मोठी शक्ती आहे की ती या सर्व आव्हानांना तोंड देऊ शकते.

अलीकडच्या काळात हा एआय-आशावाद आणखी वाढला आहे. एआयमध्ये गुंतवणूक करणाऱ्या कंपन्या अब्जावधी डॉलर्स लावत आहेत. या वर्षी अमेरिकेच्या जीडीपी वाढीमध्ये तिचा आश्चर्यकारकपणे ४० टक्क्यांहून अधिक वाटा आहे. आणि काही विश्लेषकांचे मत आहे की हा अंदाजही एआयवरील खर्चाला पूर्णपणे दर्शवत नाही, वास्तविक वाटा याहूनही जास्त असू शकतो.

२०२५ मध्ये आत्तापर्यंत अमेरिकन शेअर्समध्ये झालेली ८० टक्के वाढ एआय कंपन्यांचीच राहिली आहे. यामुळे अमेरिकेच्या विकासाला वित्तपुरवठा करण्यास आणि त्याला गती देण्यास मदत मिळत आहे, कारण एआय-आधारित शेअर बाजार जगभरातून पैसे खेचतो आणि श्रीमंतांकडून होणाऱ्या ग्राहक खर्चातील वाढीला प्रोत्साहन देतो.

अमेरिकेतील ८५ टक्के शेअर्स लोकसंख्येच्या सर्वात श्रीमंत १० टक्के लोकांकडे असल्याने, जेव्हा शेअर बाजारात तेजी येते तेव्हा त्यांच्या संपत्तीवर सर्वात जास्त परिणाम होतो. त्यामुळे ताज्या आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, अमेरिकेची ग्राहक अर्थव्यवस्था बऱ्याच अंशी श्रीमंत लोकांच्या खर्चावर टिकून आहे. शीर्ष १० टक्के कमाई करणाऱ्यांचा ग्राहक खर्चात अर्धा वाटा आहे, जो आकडेवारीची नोंद ठेवल्यापासूनचा सर्वाधिक आहे.

एआयबद्दल एवढा उत्साह नसता तर अमेरिकेची अर्थव्यवस्था ठप्प पडली असती. जगातील दुसऱ्या कोणत्याही देशाने इमिग्रेशनचे असे बूम-अँड-बस्ट (चढ-उतार) चक्र पाहिले नाही, जे सध्या अमेरिकेत सुरू आहे. २०२० नंतर निव्वळ इमिग्रेशन जवळपास चारपट वाढून २०२३ मध्ये ३० लाखांहून अधिक शिखरावर पोहोचले होते, परंतु ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील विरोध-प्रदर्शनांनी हा आकडा झपाट्याने खाली आणला. या वर्षी सुमारे ४ लाख नवीन प्रवासी येण्याची अपेक्षा आहे आणि येत्या वर्षांमध्येही हाच कल राहू शकतो.

गोल्डमन सॅक्सच्या विश्लेषणानुसार, श्रमशक्तीतील ही घट अमेरिकेच्या विकासाच्या क्षमतेला पाचव्या भागापेक्षाही जास्त कमी करेल. तरीही या धोक्यावरची प्रतिक्रिया देखील हळूहळू कमकुवत होत आहे. कारण एआयमुळे मानवी श्रमाची गरज कमी होईल.

अमेरिकेतील सरकारी तूट आणि कर्ज इतर विकसित बाजारपेठांच्या तुलनेत वेगाने वाढत आहे. जीडीपीच्या जवळपास १०० टक्के असलेले अमेरिकेचे सरकारी कर्ज दुसऱ्या महायुद्धानंतरच्या आपल्या उच्चांकाजवळ आहे आणि याच्या सध्याच्या गतीने हे ओझे वाढतच जाऊ शकते. जोपर्यंत एआय आर्थिक वाढ आणून परिस्थिती सुधारत नाही. त्या परिस्थितीत अमेरिकेच्या कर्जाचे ओझे स्थर होऊ शकते.

जागतिक बाजारपेठा याच सुखद परिस्थितीची अपेक्षा करत आहेत. बॉन्ड गुंतवणूकदारांनी अलीकडे जपान, फ्रान्स आणि ब्रिटनसह अशा देशांना काट्याची टक्कर दिली आहे, ज्यांची तूट अमेरिकेपेक्षा खूप कमी आहे.

या सर्व देशांमध्ये सरकारी बॉन्डची विक्री झाली आहे. यापैकी केवळ अमेरिकेतच या वर्षी १० वर्षांच्या सरकारी बॉन्ड यील्डमध्ये घट दिसून आली आहे. एआयला इतक्या वेगवेगळ्या धोक्यांवर उपाय म्हणून जादूची कांडी म्हणून पाहिले जाण्याचे मुख्य कारण म्हणजे यामुळे उत्पादकतेत लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याकडून अधिक उत्पादन मिळाल्यास जीडीपीला चालना मिळून कर्जाचा बोजा कमी होईल. यामुळे श्रमाची मागणी कमी होईल. कंपन्यांना किंमत न वाढवता पगार वाढवता येऊन टेरिफच्या धोक्यासह महागाईचे धोके कमी होतील.

अलीकडच्या वर्षांत अमेरिकेत उत्पादकता उर्वरित विकसित जगाच्या तुलनेत वेगाने वाढली आहे. उत्पादकतेच्या चमत्काराच्या शक्यतेने देशांतर्गत आणि विदेशी गुंतवणूकदारांच्या या विश्वासाला आणखी मजबूत केले आहे की, हा फरक वाढत जाईल. त्यांना खात्री आहे की अमेरिका एआय इनोव्हेशन, पायाभूत सुविधा आणि स्वीकारामध्ये अशी अग्रणी स्थिती बनवत आहे, ज्याची बरोबरी कोणीही करू शकत नाही.

या कथानकात डॉलरची एक विसंगत कथा आहे. परंतु अनेक विश्लेषक त्याची अलीकडील घसरण विदेशी गुंतवणूकदारांनी अत्याधिक महाग चलनात गुंतवणूक केल्यानंतर आपले गुंतवणूक अधिक सामान्य स्तरांवर सुरक्षित ठेवण्याचा परिणाम मानतात. परदेशी लोकांनी दुसऱ्या तिमाहीत अमेरिकेच्या शेअर्समध्ये विक्रमी २९० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आणि आता त्यांच्याकडे बाजाराचा जवळपास ३० टक्के हिस्सा आहे - दुसऱ्या महायुद्धा नंतरच्या इतिहासातील सर्वात जास्त हिस्सा.

युरोपीय आणि कॅनेडियन अमेरिकन वस्तूंवर बहिष्कार टाकत आहेत, पण अमेरिकेच्या शेअर्समध्ये मोठ्या प्रमाणात खरेदी करत आहेत - विशेषतः तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गजांमध्ये. एक प्रकारे, अमेरिकेला एआयची मोठी पैज मानली गेली आहे.

याचा अर्थ असाही आहे की, एआयला आता अमेरिकेसाठी चांगली कामगिरी करावीच लागेल, अन्यथा अमेरिकेची अर्थव्यवस्था आणि बाजारपेठ त्या आधाराला गमावून बसतील, ज्यावर तेसध्या उभे आहेत.

■ ■ ■

## राष्ट्रांमध्ये परस्पर सहकार्य असेल तरच जग चालू शकेल!

एक काळ असा होता, जेव्हा आर्थिक आयोजनासाठी देश-राज्य ही महत्त्वाची संस्था होती. प्रगतीला चालना देण्यात राष्ट्रीय अभिमानाचीही महत्त्वाची भूमिका होती. पण आता सामूहिक उद्दिष्टांवर जागतिक सहकार्याची वेळ आली आहे.

हा कठीण काळ आहे. असमानता वाढत असताना अनेक देशांमधील राजकारणी गरिबांना लाभ होणारे कार्यक्रम आणि सेवा कमी करत आहेत. ते स्थलांतरित आणि निर्वासितांविरुद्ध भीती आणि रागदेखील निर्माण करत आहेत. वैयक्तिक स्वातंत्र्याचे रक्षण करणे, समृद्धी वाढवणे आणि नागरिकांचे संरक्षण करणे हे त्यांचे कथित उदात्त हेतू केवळ स्वतःला आणि त्यांच्या श्रीमंत मित्रांना समृद्ध करण्याच्या अजेंडाचा भाग किंवा एक देखावा आहेत.

राजकारणाच्या पद्धतीत या घसरणीची अनेक कारणे आहेत. परंतु सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे अर्थशास्त्राच्या पद्धतीत झालेली घसरण. अर्थशास्त्राचे वर्णन अनेकदा वैज्ञानिक प्रणाली म्हणून केले जाते. परंतु वैज्ञानिक निष्कर्ष आपल्या मूल्यांवर आणि निर्णयांवरदेखील प्रभाव पाडतात आणि वैज्ञानिक वस्तुनिष्ठतेचे दावे आपल्या नैतिक संवेदनशीलतेला धक्का देणाऱ्या कृतींना न्याय देण्यासाठी वापरले जाऊ शकतात.

खरे तर मुख्य प्रवाहातील अर्थशास्त्र विशेषतः दीर्घकाळापासून प्रचलित नवउदारमतवादी विचारसरणी, जी वाढ, कार्यक्षमता आणि मुक्त बाजारपेठांवर भर देते. केवळ लोभ, शोषण आणि असमानतेचे केवळ समर्थनच करत नाही तर त्यांना प्रोत्साहनदेखील देते.

नोबेल विजेते अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांच्या क्षमता दृष्टिकोनवर आधारित २०१२ च्या अभ्यासात असे आढळून आले की शिक्षण लोकांना अधिक काळजी घेणारे आणि मदतगार बनण्यास मदत करते, परंतु अर्थशास्त्र ज्या पद्धतीने शिकवले जाते ते स्वार्थाला सामान्य किंवा इच्छित नैतिक तत्त्व म्हणून प्रोत्साहन देऊ शकते.

आणखी एक नोबेल विजेते अर्थशास्त्रज्ञ, केनेथ ॲरो यांचा युक्तिवाद असा आहे की जोवर स्पर्धक कंपन्या आणि व्यक्ती त्यांच्या जबाबदाऱ्यांचे पालन करत नाहीत तोपर्यंत बाजारपेठा कार्य करू शकत नाहीत. ते विश्वास आणि सहकार्यावर अवलंबून असतात.

ॲरो यांनी स्वातंत्र्य आणि समानतेला विरोधाभासी मानण्याच्या मुख्य प्रवाहातील अर्थशास्त्रातील प्रवृत्तीलादेखील आव्हान दिले. नवउदारमतवादी युक्तिवाद असा आहे की कोणत्याही प्रमाणात असमानता नैसर्गिक आहे आणि ती कमी करण्यासाठी कोणताही हस्तक्षेप स्वातंत्र्य नष्ट करतो. परंतु अनेक संदर्भांमध्ये स्वातंत्र्य आणि समानता जवळजवळ समानार्थी आहेत.

समानतेला कमकुवत करणाऱ्या कृती - जसे की संप किंवा आर्थिक जबरदस्तीचे सूक्ष्म प्रकार - कामगारांच्या स्वातंत्र्यावर प्रतिबंध करतात. दरम्यान, एका लहान अभिजात वर्गाकडून अर्थव्यवस्थेचे शोषण हे दर्शवते की, औपचारिक लोकशाही आणि स्वातंत्र्य बनावट आहे.

ॲरो यांनी लिहिले की, ज्या संस्था असमानता निर्माण करतात त्या मानवांच्या समान प्रतिष्ठेचा अपमान करतात. तत्त्वज्ञानी यशया बर्लिन यांनी याचा सारांश दिला. ते म्हणाले, लांडग्यांना स्वातंत्र्य म्हणजे बहुतेकदा मेंढ्यांसाठी मृत्यू. आज हा इशारा विशेषतः स्पष्ट आहे, जेव्हा निहित स्वार्थांकडे त्यांच्या निवडलेल्या राजकारण्यांना आणि कारणांवर प्रभाव पाडण्यासाठी प्रचंड संसाधने आहेत तसेच जनमतावर प्रभाव पाडण्यासाठी अभूतपूर्व डिजिटल साधने आहेत.

दुसरे नोबेल विजेते अर्थशास्त्रज्ञ जोसेफ स्टिग्लिट्झ यांनी निरीक्षण केल्याप्रमाणे एक व्यक्ती, एक मत हे तत्त्व एक डॉलर, एक मताने बदलले आहे.

पण आर्थिक स्वार्थ हा समस्येचा फक्त एक पैलू आहे. अतिरेकी राष्ट्रवाददेखील वाढत्या असमानतेला हातभार लावत आहे. एक काळ असा होता, जेव्हा देश-राज्य आर्थिक जीवनाचे आयोजन करण्यासाठी एक प्रमुख संस्था होती. प्रगतीला चालना देण्यात राष्ट्रीय अभिमानाची भूमिका होती. परंतु आता सामूहिक उद्दिष्टांवर जागतिक सहकार्याची वेळ आली आहे. परस्पर फायदेशीर व्यापार व्यवस्थांपासून ते समतापूर्ण आणि समावेशक हवामान कृतीपर्यंत. बाजारपेठांसारख्या बहुपक्षीय कृती परस्पर विश्वास आणि सहकार्यावर अवलंबून असतात.

परस्पर सहकार्यावरील विश्वास बळकट करून आंतरराष्ट्रीय कामगार संघटना आणि आंतरराष्ट्रीय न्यायालय यासारख्या बहुपक्षीय संघटना जगातील राष्ट्रांना स्वतःहून कितीतरी जास्त साध्य करण्यास मदत करू शकतात. परंतु अशा संस्थांना बळकट करण्यासाठी आपल्या नैतिक कंपासचे पुनर्परीक्षण करणे आवश्यक आहे. केवळ स्वार्थावर लक्ष केंद्रित करणे किंवा आपल्यासारखे पाहणाऱ्या, बोलणाऱ्या किंवा प्रार्थना करणाऱ्यांपुरती आपली करुणा मर्यादित ठेवणे हे तर्कसंगत मानण्याऐवजी आपण मानवतेला अधिक महत्त्व दिले पाहिजे.

-------------


कौशिक बसु

जागतिक बँकेचे माजी मुख्य अर्थतज्ज्ञ


■ ■ ■

## दिवाळी : उजळलेली घरं, पण अंधारलेलं मन!

भारतीय संस्कृतीतील प्रत्येक सण ही केवळ धार्मिक प्रथा नसून, ती समाजाच्या चेतनेचे प्रतिबिंब असते. दिवाळी हे त्या सर्व सणांमधले सर्वाधिक लोकप्रिय, सर्वाधिक प्रतीकात्मक आणि सर्वाधिक अर्थपूर्ण पर्व आहे. परंतु आजच्या काळात हा सण आर्थिक उपभोगवादाचा आणि सांस्कृतिक आडमुठेपणाचा उत्सव बनू लागला आहे.

फटाक्यांचा आवाज वाढतोय, पण संवाद कमी होतोय; घरं उजळतात, पण माणसं मात्र अधिक एकाकी होत आहेत. या विरोधाभासावर विचार करणे आज आवश्यक आहे. दिवाळीचा मुळ अर्थ आहे. अंधःकारावर प्रकाशाचा विजय. अंधार म्हणजे अज्ञान, अन्याय, भ्रष्टाचार, असमानता आणि द्वेष; तर प्रकाश म्हणजे ज्ञान, न्याय, करुणा, आणि विवेक. आपल्या समाजात आज हे दोन्ही घटक पुन्हा एकदा आमनेसामने उभे आहेत.

आपण डिजिटल युगात पोहोचलो आहोत, पण विचारांच्या अंधारातून अजून बाहेर आलो नाही. भ्रष्टाचाराच्या धुरात सत्य हरवतंय, आणि धर्माच्या नावाखाली द्वेषाचा फटाका फोडला जातोय. अशा वेळी दिवाळी आपल्याला आठवण करून देते. खरा प्रकाश म्हणजे विवेकाचा प्रकाश.

दिवाळीच्या दिवसांत बाजारपेठा उजळतात, पण त्याच वेळी समाजातील लाखो हात रिकामे राहतात. एका बाजूला जाहिरातींनी, ऑफर्सनी आणि विलासात जगणाऱ्या वर्गाची दिवाळी होते; तर दुसऱ्या बाजूला रोजंदारी गमावलेल्या, शेतकरी संकटात सापडलेल्या आणि बेरोजगारीच्या अंधारात जगणाऱ्यांची दिवाळी निःशब्द असते. प्रकाशाचा हा असमतोल आपल्याला समाजातील आर्थिक अन्यायाची जाणीव करून देतो.

खरं तर, दिवाळीचा सण आपल्याला सामाजिक समतेचा प्रकाश पसरवण्याची प्रेरणा द्यायला हवा. पण आज हा प्रकाश काहींच्या घरातच साठला आहे.



आजचा भारत आर्थिक, तांत्रिक आणि राजकीयदृष्ट्या पुढे गेला असला तरी लोकशाहीचा दीप मंदावलेला जाणवतो. राजकारणात विचारांचा अंधार आणि मतांच्या विक्रीचा बाजार उजळलेला दिसतो. संविधानाच्या मूल्यांना दुय्यम स्थान देत असताना दिवाळीचा सत्याच्या विजयाचा संदेश अधिक अर्थपूर्ण वाटतो.

आपण साजरे करतोय स्वातंत्र्याच्या प्रकाशातला सण, पण स्वातंत्र्याच्या मूल्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होतंय. म्हणून दिवाळी आज फक्त उत्सव नाही; ती लोकशाहीतील विवेकाची चाचणी आहे.

दिवाळी म्हणजे फक्त भौतिक सुखाचा उत्सव नव्हे, तर तो संस्कृतीच्या सातत्याचा आणि नवतेच्या मिलाफाचा क्षण आहे. आज आपण पश्चिमेकडील उपभोग संस्कृतीचं अंधानुकरण करताना पारंपरिक मूल्यांना विसरतोय. दिवाळीचा मूळ हेतू आनंद वाटणं हा होता, दाखवणं नव्हे. आपल्या सणांच्या आत्म्याला परत मिळवणं हे आजचं सर्वात मोठं आव्हान आहे. आपल्या संस्कृतीचा आत्मा सहभाजनात आहे, स्पर्धेत नाही. दिवाळीच्या दिव्यांचा प्रकाश काही दिवस टिकतो; पण विचारांचा प्रकाश टिकवला, तर संपूर्ण समाज उजळतो.

या वर्षी आपण प्रत्येकाने एक संकल्प करू या. अंधानुकरणाऐवजी विचार करणे, खर्चाऐवजी करुणा वाढवणे, धर्माच्या नावावर द्वेष न पसरवणे आणि समाजात समतेचा दीप पेटवणे. दिवाळी हा सण नाही, ती आपल्या अंतरात्म्याची परीक्षा आहे.




प्रविण बागडे

नागपूर.

9923620919


आपण खरंच प्रकाशाच्या बाजूने आहोत का? प्रत्येक वर्षी दिवे लावून आपण म्हणतो, अंधार जावो, प्रकाश येवो. पण आजचा काळ विचारतो तो अंधार नेमका कुठे आहे? जर तो आपल्या अंतःकरणात, आपल्या समाजव्यवस्थेत, आपल्या राजकीय संस्कृतीत शिरला असेल, तर फक्त दिवे पुरेसे नाहीत.

त्याकरिता विचारांचाही दीप पेटवावा लागेल. विचार, संवेदना आणि जबाबदारी यांनी उजळलेली दिवाळी, हीच खरी प्रकाशपर्वाची व्याख्या. आपण सर्वांनी ती अंगीकारावी, हीच शुभेच्छा !

फटाके संपतात, पण विचारांचा प्रकाश कधीही मावळू नये; कारण समाज वाचतो तो सणांनी नाही, तर विवेकाने.

■ ■ ■

# गुणी प्रियदर्शिनी

'दशावतार'च्या यशामुळे प्रियदर्शिनी इंदलकर पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. 'हास्यजत्रा' मुळे घराघरात पोचलेली ही गुणी अभिनेत्री सौंदर्य आणि अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर राज्य करते आहे. 'फुलराणी', 'नवरदेव बीएससी अॅग्री', 'सोयरीक', 'रुखवत', 'चीकी चीकी बूमबूम' आदी चित्रपटातून आणि'शांतीत क्रांती', 'फर्जी' यासारख्या वेब सिरिजमधून तिने प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे.

प्रियदर्शिनी शिक्षणाला महत्त्व देणाऱ्या घरातून पुढे आली आहे. ती म्हणते की, अभिनयात करियर करण्यासाठी तिला घरातून पाठिंबा होताही आणि नव्हताही. ती पुढे म्हणते, 'माझ्या घरातील सगळे खूपच प्रॅक्टिकल आहेत. विशेषतः माझे बाबा प्रॅक्टिकल विचार करणारे आहेत. मी खूप मोठी अभिनेत्री होईन असे स्वप्न वगैरे बघणे ठीक आहे. पण तसे नाही झाले, तर आपल्याकडे प्लॅन बी पाहिजे हे मी जाणते. या क्षेत्रात काम मिळाले नाही तर नोकरी मिळण्यासाठी टेक्निकल डिग्री पाहिजे. त्या डिग्रीने कुठे तरी नोकरी मिळून जाईल...' प्रियदर्शिनीचे बाबा आणि आई दोघेही इंजिनीअर आहेत. म्हणूनच प्रियदर्शिनीने इंजिनिअरिंग केले. यात ती प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली. शिक्षण पूर्ण करुन पदवी घेतल्यानंतरच तिने कामे शोधायला सुरुवात केली. नुकत्याच 'एम एचजे अनप्लगड' या पॉडकास्टमध्ये तिने लहान असताना झालेल्या एका भीषण अपघाताचा अनुभवही शेअर केला आहे. एकंदरच सौंदर्य आणि संवेदनशीलता याच्या बळावर प्रियदर्शनी पुढे जाणार, असे म्हणायला हरकत नाही.



# भारताची शेरी सिंग झाली मिसेस युनिव्हर्स

'मिसेस इंडिया २०२५' जिंकणाऱ्या भारताच्या शेरी सिंगने आता 'मिसेस युनिव्हर्स'चा मुकुट जिंकला आहे. फिलीपिन्सची राजधानी मनिला इथे पार पडलेल्या 'मिसेस युनिव्हर्स' स्पर्धेत शेरी सिंगने भारताचे प्रतिनिधित्व केले होते. या स्पर्धेत तिने केवळ सौंदर्यानेच नाही तर शांत आणि आत्मविश्वासपूर्ण स्वभाव, प्रभावी वक्तृत्व आदी गुणांनी जगाचे लक्ष वेधून घेतले. याशिवाय महिला सक्षमीकरण आणि मानसिक आरोग्य यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या विचारांनी तिने परीक्षकांना प्रभावित केले. ग्लॅमर आणि भावनांनी भरलेल्या समारंभात तिला हा सर्वोच्च सन्मान मिळाला. यंदा मिसेस युनिव्हर्स स्पर्धेत स्पर्धकांमध्ये तीव्र स्पर्धा होती. अंतिम स्पर्धकांमध्ये मार्गारीटा, आयलंड, यूएसए, नैऋत्य आशिया, कॅलिफोर्निया, बल्गेरिया, म्यानमार, पॅसिफिक, बुरियाटिया, आफ्रिका, यूएई, दुबई, जपान, उत्तर फिलीपिन्स, युरेशिया, युक्रेन, लक्झेंबर्ग, मध्य युरोप, मध्य पूर्व आणि ईशान्य युरोपातील विवाहित सुंदरींनी भाग घेतला होता.





# 'बिगबॉस'च्या घरातून...

सलमान खानचा वादग्रस्त शो 'बिग बॉस १९' हळूहळू पकड घेत आहे. घरातील सदस्य एकमेकांशी भांडणे आणि हाणामारी करण्यात कुठेच मागे नाहीत. निर्मातेही शोला अधिक मनोरंजक बनवण्यासाठी आगामी एपिसोडचे प्रोमो व्हिडिओ शेअर करत असतात. नुकतीच 'बिग बॉस'च्या घरात वाइल्डकार्ड एंट्री मिळालेल्या मालती चहरने आल्यापासूनच घरात धमाल उडवून दिली आहे.

मालती चहरमुळे घरात भांडणे आणि तणाव वाढल्याचे दिसते आहे. अलीकडच्या एपिसोडमध्ये तिने एक ड्रामा केला आहे. तिने आरोप केला की, तान्या मित्तलने एका कॅप्टनसी टास्क दरम्यान अमाल मलिकच्या फोटोला चुंबन दिले. त्यासंदर्भात घरातले इतर सदस्यही रिॲक्ट झाले असून वाद वाढत आहे. त्यामुळे मालती सध्या 'बिगबॉस'च्या घरात चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. विशेष म्हणजे प्रसिद्ध कॉमेडियन जॉनी लिव्हर यांची मुलगी जेमी लवकरच 'बिग बॉस १९' मध्ये येण्याची घोषणा झाली आहे. तिला 'वीकएंड का वार' साठी खास पाहुणी म्हणून निमंत्रण दिले गेले गेल्याचे ऐकिवात आहे. तेव्हा आता जेमी आणि बिगबॉसच्या घरातली मंडळी काय करतात त्याची चर्चा चाहत्यांमध्ये रंगली आहे.



# आशाताईंचे नाव वापरण्यास घातली न्यायालयाने बंदी

जगप्रसिद्ध गायिका आशा भोसले यांचे नाव, आवाज आणि ओळख याचा त्यांच्या परवानगीशिवाय वापर करण्यावर मुंबई उच्च न्यायालयाने बंदी घातली आहे. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, एआय टूल्सच्या मदतीने सेलिब्रिटींच्या आवाजाची नक्कल करणे हा त्यांच्या व्यक्तिगत स्वातंत्र्याचा भंग आहे. आवाज ही केवळ ओळख नव्हे तर एखाद्याच्या सार्वजनिक आणि वैयक्तिक ओळखीचा महत्त्वाचा भाग आहे. असे असताना आशाताईंना अनेक ठिकाणी त्यांचे नाव आणि ओळख चुकीच्या पद्धतीने वापरली जात असल्याचे दिसून आले आणि तडक न्यायालयात धाव घेतली. या तक्रारीमध्ये त्यांनी काही गोष्टी नमूद केल्या आहेत.

कंपनी माइक यांनी त्यांचा आवाज क्लोन करून वितरित केला आहे. अमेझॉन आणि फ्लिपकार्टने त्यांच्या छायाचित्रांसह पोस्टर्स आणि काही वस्तू परवानगीशिवाय विकल्या आहेत. गूगलवर एका यूट्यूब कंटेंटमध्ये त्यांच्या आवाजाची एआय नक्कल केली गेली आहे. एका कलाकाराने त्यांच्या फोटोचा वापर करून कपड्यांची विक्रीदेखील केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आशाताईंनी हे पाऊल उचलले आहेत. आता यापुढे एआय प्लॅटफॉर्म्स, ई-कॉमर्स साइट्स आणि इतर संस्था त्यांचे नाव, आवाज आणि छायाचित्रे संमतीशिवाय वापरू शकणार नाहीत. अर्थातच या निर्णयाचा फायदा इतर सेलेब्रिटींनाही होणार यात काहीच शंका नाही.



# खरे की खोटे?

सलमान खान, अनिल कपूर आणि फरदीन खान अभिनीत 'नो एंट्री' हा २००५ मधील सर्वाधिक कमाई करणाऱ्या विनोदी चित्रपटांपैकी एक होता. आता दोन दशकांनंतर याच नावाचा कोरा करकरित चित्रपट येत आहे. अर्थातच यावेळी त्यात नवीन कलाकार बघायला मिळणार आहेत. आधीच्या 'नो एंट्री'चे दिग्दर्शन अनीस बज्मी यांनी केले होते आणि त्यात सलमान, अनिल कपूर, फरदीन खान, बिपाशा बसू, सेलिना जेटली, लारा दत्ता तसेच ईशा देओल यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. गेल्या वर्षी बोनी कपूर यांनी आपण 'नो एंट्री २' वर काम करत असल्याचा खुलासा करुन त्यात दिलजीत दोसांझ, वरुण धवन आणि अर्जुन कपूर यांचा समावेश असेल, असे स्पष्ट केले होते. पण आधी दिलजीत दोसांझने चित्रपट सोडला आणि आता वरुण धवननेही हा प्रकल्प सोडल्याचे वृत्त आहे. तारखांच्या समस्यांमुळे वरुणने चित्रपट सोडला असल्याचे समजत असले तरी स्वतः बोनी कपूर यांनी मात्र सदर वृत्तावर प्रतिक्रिया दिलेली आहे. उलट त्यांनी 'नो एंट्री २' मधून वरुण धवनच्या बाहेर पडण्याच्या बातम्या पूर्णपणे फेटाळून लावल्या आहेत. त्यांनी एक निवेदन जारी केले असून वरुण अजूनही चित्रपटाचा भाग असल्याचे म्हटले आहे. दिलजीत दोसांझने काही मतभेदांमुळे चित्रपट सोडला. परंतु यावर स्पष्टीकरण देताना बोनी कपूर यांनी तारखेच्या समस्येमुळे पंजाबी अभिनेता चित्रपटाचा भाग होऊ शकत नसल्याचे निवेदनात स्पष्ट केले आहे.



# झीनत अमान यांना जीवनगौरव पुरस्कार

ज्येष्ठ अभिनेत्री झीनत अमान यांना फिल्मफेअर २०२५ मध्ये जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. उत्कृष्ट अभिनय आणि चित्रपट क्षेत्रातील समर्पणासाठी ओळखला जाणारा हा पुरस्कार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या अभिनेत्री झीनत अमान काळ्या रंगाच्या पोशाखात खूपच सुंदर दिसत होत्या. पुरस्कार स्वीकारल्यानंतर त्यांनी फिल्मफेअरचे आभार मानले. त्या म्हणाल्या की, तारुण्यात त्यांना पहिला पुरस्कार मिळाला होता आणि आता ५० वर्षांनंतर जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला आहे. ७० आणि ८० च्या दशकात झीनत अमान यांनी चित्रपटात आधुनिक, आत्मविश्वासू आणि बिनधास्त स्त्रीचे प्रतिनिधित्व केले. त्यांच्या अभिनयाने आणि काहीशा बोल्ड लुकने प्रेक्षकांची आणि समीक्षकांची दृष्टी बदलून टाकली.

'हरे रामा हरे कृष्णा', 'सत्यम शिवम सुंदरम', 'डॉन', 'हिंदुस्तान की कसम' यासारख्या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका आजही स्मरणात आहेत. केवळ ग्लॅमरपुरते त्यांचे योगदान मर्यादित नव्हते तर त्या आपल्या व्यक्तिमत्त्वातून स्त्रियांच्या स्वातंत्र्याची नवी भाषा घेऊन आल्या. या सत्काराने त्यांच्या कामाला सुयोग्य दाद दिली गेली आहे, असे म्हणता येईल.



# तुलना तर होणारच



कन्नड सुपरस्टार ऋषभ शेट्टी यांची दिग्दर्शक आणि अभिनेता म्हणून भूमिका असणारी 'कांतारा' फ्रँचायझी २०२२ मध्ये लाँच झाली. या पौराणिक चित्रपट फ्रँचायझीचा प्रीक्वल असणारा दुसरा भाग 'कांतारा-अ लेजेंड चॅप्टर १' नुकताच प्रदर्शित झाला. 'कांतारा चॅप्टर १' ला प्रेक्षक आणि समीक्षकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यामुळे कमाई उत्तम झाली. तेव्हा आता 'कांतारा' आणि 'कांतारा चॅप्टर १' चा तौलनिक अभ्यासही करु या. यातून कमाई आणि नफ्याचे गणित समोर येऊ शकेल.

'कांतारा' तीन वर्षांपूर्वी कन्नड आणि इतर दक्षिण भारतीय भाषांमध्ये प्रदर्शित झाला होता. तेव्हा त्याचे बजेट फक्त १६ कोटी होते. तथापि, दक्षिणेत 'कांतारा' च्या उत्कृष्ट कथेने सर्वांची मने जिंकली आणि उत्तर भारतीय प्रेक्षकांकडून पसंती वाढली. त्यानंतर काही दिवसांनी 'कांतारा' हिंदीमध्ये प्रदर्शित झाला आणि चित्रपटाने कमाईच्या बाबतीत इतिहास रचला.'कांतारा' ने २०२२ मध्ये हिंदी पट्ट्यात देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर तब्बल ७९.२५ कोटींची कमाई केली तर जगभरातील हा आकडा ४०० कोटींपेक्षा जास्त होता. या आधारे 'कांतारा' च्या नफ्याचा विचार करता ऋषभ शेट्टीच्या या चित्रपटाने १६ कोटींच्या बजेटमध्ये अंदाजे २००-२३० टक्के जास्त कमाई करून इतिहास रचल्याचे दिसते. या तुलनेत 'कांतारा-अ लेजेंड चॅप्टर १' चे बजेट आणि संकलन या दोन्हीमध्येही लक्षणीय वाढ झालेली दिसली.

# ओटीटीवर नवे काय?

'भागवत चप्टर वन राक्षस' हा झी ५ वर प्रदर्शित झालेला क्राइम थ्रिलर प्रकारातील हिंदी चित्रपट सध्या चर्चेत आहे. यात अर्शद वारसीने इन्स्पेक्टर विश्वास भगवत ही भूमिका साकारली असून जितेंद्र कुमार हा शांत, अभ्यासू स्वभावाचा दिसणारा पण अंतर्मनात काही गूढ दडवून ठेवलेला प्रोफेसर समीर म्हणून दिसणार आहे.

कथा उत्तर प्रदेशातील रॉबर्टगंज या गावात सुरू होते. तिथे एक मुलगी अचानक बेपत्ता होते आणि तपासादरम्यान आणखी काही महिलाही रहस्यमयरित्या गायब झालेल्या असल्याचे समोर येते. या तपासाची सूत्रे हातात घेऊन इन्स्पेक्टर भागवत हळूहळू प्रकरणाच्या मुळाशी जातो आणि त्याला मानवी मनातील हिंस्त्र तसेच विकृत बाजूंचा शोध लागतो. यात गुन्हा, नैतिकता, न्याय आणि मानसशास्त्रीय रोमांच यांचा मिलाफ असून एकंदरीत चित्रपट 'असुर' सारख्या रहस्यमय वेब सिरीजची आठवण करून देतो.

